
# वे टू.... लाइव्हलीहुड

## (उपजीविकेची दिशा)

| संजीव उन्हाळे |



उपजीविका या विषयाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन ग्रामीण विकासाच्या सर्व योजनांमध्ये उपजीविका साधनांची संधी व विकास हा घटक येणे आता अपरिहार्य आहे. हे लक्षात घेऊन उपजीविका म्हणजे काय, उपजीविकेचे स्वरूप, व्याप्ती, स्थानिक नैसर्गिक संसाधनांशी घातलेली सांगड, उपजीविका साधनांचे संवर्धन व शाश्वत विकास, उपजीविकांचे वर्गीकरण, सबसेक्टर विश्लेषण पद्धती, इत्यादी बाबींचा उहापोह या पुस्तकामध्ये केला आहे. हे पुस्तक अभ्यासक, प्रत्यक्ष काम करणारे कर्मचारी व तांत्रिक अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते यांना उपयुक्त ठरेल.

DILASA

दिलासा जनविकास प्रतिष्ठान

बी-३, सुदर्शन पार्क, एमआयडीसी विभागीय कार्यालयासमोर, वेदांतनगर, औरंगाबाद-४३१००५

☎(०२४०) २३२०४४४, २३६३७४१, फॅक्स (०२४०) २३६३७४१, ईमेल : dilasango@gmail.com

वे टू....
# लाइव्हलीहुड
## (उपजीविकेची दिशा)

● संजीव उन्हाळे ●

दिलासा जनविकास प्रतिष्ठान

बी-३, सुदर्शन पार्क, एमआयडीसी विभागीय कार्यालयासमोर, वेदांतनगर, औरंगाबाद-४३१ ००५
☎(०२४०) २३२०४४४, २३६३७४१, फॅक्स (०२४०) २३६३७४१, ईमेल : dilasango@gmail.com

वे टू....
लाइव्हलीहुड
(उपजीविकेची दिशा)

■ **लेखक**
**संजीव उन्हाळे**

■ **मुखपृष्ठ व संगणकीय जुळणी**
**रवि बोराडे**
दिलासा जनविकास प्रतिष्ठान,
औरंगाबाद

■ **मुद्रक व प्रकाशक**
**दिलासा जनविकास प्रतिष्ठान**
बी-३, सुदर्शन पार्क, वेदांतनगर,
औरंगाबाद
दूरध्वनी : (०२४०) २३२०४४४, २३६३७४१
ईमेल : dilasango@gmail.com
वेबसाईट : www.dilasango.org

■ **प्रकाशन दिनांक**
१३ डिसेंबर २०१३

© **दिलासा जनविकास प्रतिष्ठान, औरंगाबाद**

(Dilasa)F:Publication\Livelihood-Book-Final-13-12-2013.cdr

वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य
शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१
कार्यालय : ०२०-२६०५००२०
मोबाईल : ९६८९६६६७७७
ई-मेल : vsnlpune@gmail.com

## प्रस्तावना

पाणलोट विकासासंदर्भात विशेषतः महाराष्ट्र राज्यात आतापर्यंत विविध मार्गदर्शिका / पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत. पाणलोट विकासाच्या कामात महाराष्ट्र राज्य पूर्वीपासून अग्रेसर राहिले आहे. महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीचा विचार केला असता कोरडवाहू शेती (८२%), सिंचनाचे प्रमाण (१८%) तसेच विविध भागातील शेती पद्धती यासाठी पाणलोट विकासाच्या माध्यमातून ग्रामीण विकास करण्याचा प्रयत्न वेळोवेळी अनेक योजनांच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

केंद्र शासनाकडील रोजगार निर्मितीच्या विविध योजनांच्या माध्यमातून पाणलोट विकासाच्या कामात पूर्वीपासूनच प्राधान्य देण्यात आले आहे. सन २००८ मध्ये केंद्र शासनाने एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम सुरू करण्यासाठी स्वतंत्र मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार संपूर्ण देशात पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाची अंमलबजावणी चालू आहे. या नवीन कार्यक्रमात उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्ती आणि स्थानिक पातळीवरील लोकांच्या गरजा विचारात घेऊन उपजीविकेची साधने उपलब्ध करून देण्यासाठी एकूण प्रकल्प मूल्याच्या १९% निधी स्वतंत्रपणे राखून ठेवण्यात आला आहे.

''**वे टू लाइव्हलीहुड (उपजीविकेची दिशा)**'' या पुस्तिकेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील भूमिहीन, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी तसेच ग्रामीण कारागीर या सर्वांचे जीवनमान उंचाविण्यासाठी उपजीविका कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी मदत होईल असा मला विश्वास आहे. या पुस्तिकेच्या प्रकाशनासाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा!

**ठिकाण :** पुणे

**दिनांक :** ४ डिसेंबर २०१३

**(गणेश चौधरी)**
अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी

# अनुक्रमणिका

**उपजीविका : स्वरूप आणि व्याप्ती** (होय, पैसा झाडाला लागतो)................१
**पाणलोटातून शाश्वत उपजीविका विकास** (जिवंत झरे).......................७
**उपजीविकेच्या साधनांचा शाश्वत विकास** (जीवन उन्नतीचा मार्ग)............११
**उपजीविकांचे वर्गीकरण** (पैशांची शिडी)..........................................१९
**उपजीविकेच्या साधनांकडून साध्याकडे** (सुगीच्या वाटा)......................२५
**सब सेक्टर विश्लेषण पद्धती** (सुगी आपल्या हाती)...............................३५
**उपजीविका विकासासाठी पीआरए** (गावाचा एक्सरे)...........................४०
**उपजीविका कार्यक्रमासाठीची जीवन कौशल्ये** (सुखाचे रस्ते)...............४५
**विंविध योजना एकत्र सांधणे** (सुखी सांगड)......................................४८
**प्रकल्प अहवाल आणि नवीन स्वयंरोजगाराचा शोध** (गाव पांढरीचे खळे)...५३
**जीवनाधाराचे मिशन** (संधीच्या नव्या वाटा).......................................५९
**नावीन्यपूर्ण उद्योगाचा पायंडा** (उद्यमशीलतेची ऊर्मी)..............................६१
**शेतीमाल प्रक्रिया उद्योग- शाश्वत उपजीविकेकडे** (अशाश्वततेतून समृद्धीकडे)..७१
**उपजीविका कृती आराखडा** (वाटचाल अंमलबजावणीकडे).........................७५

# उपजीविका : स्वरूप आणि व्याप्ती
## अर्थात
## होय, पैसा झाडाला लागतो

**स्वातंत्र्यानंतर** विविध पंचवार्षिक योजनांद्वारे आपल्या खंडप्राय, विविधतेने नटलेल्या व समस्यांचेही वैविध्य असलेल्या भारत देशामध्ये विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला गेला. आज आपला देश जगातील एक प्रमुख आर्थिक केंद्र, मोठी बाजारपेठ बनला असून २०२५ पर्यंत ती जगातील महासत्ता बनेल असे भाकीत अनेक जण सप्रमाण वर्तवत आहेत. तरीही सर्वंकष दारिद्र्य निर्मूलन, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या कमी करणे, उपजीविकेची शाश्वत साधने ग्रामीण भागात विकसित करणे, ग्रामीण जनतेची क्रयशक्ती वाढविणे व सर्वसमावेशक विकास साधणे ही आव्हाने आजही देशापुढे आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात शाश्वत उपजीविका साधनांचा विकास या कळीच्या मुद्यावर या पुस्तिकेत संक्षिप्त स्वरूपात काही विचार मांडत आहे.

### दारिद्र्य नव्हे, दरिद्री व्यवस्थापन

*India is not a poor country;*

*It is poorly managed country*

भारत हा काही गरीब देश नाही तर या देशाचे व्यवस्थापन दरिद्री आहे असे म्हटले जाते. उपजिविकेच्या साधनांचा विचार करीत असताना या वाक्याचे प्राधान्याने चिंतन करणे आवश्यक आहे. जगातील ३६ टक्के गरीब लोक भारतात राहतात. ४० टक्के मुलांचे कुपोषण होते. त्यात तीन वर्षांखालील ४० टक्के मुले ही कुपोषित म्हणजे कमी वजनाची असतात. या देशामध्ये जात, धर्म यावरून ताणतणाव होतात. खरे तर या सगळ्यांच्या मुळाशी या देशातील दारिद्र्य आहे. पण या देशाच्या संपन्न नैसर्गिक साधनसंपत्तीचे नाते उपजीविकेच्या साधनांशी जोडण्याचा प्रयत्न शासकीय स्तरावर फारसा झाला नाही.



दुसरी विरोधाभासात्मक परिस्थिती अशी की, ज्या ठिकाणची साधनसंपत्ती, जैवविविधता, वनश्री आणि खनिज संपत्ती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे तोच प्रदेश दारिद्र्याने गांजलेला आहे. ज्या भागातील जैव विविधता अत्यंत संपन्न आहे त्याच भागात या देशातील गरीब माणूस राहतो हे भारताच्या नकाशाकडे पाहिले तर सहज लक्षात येते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या साधनसंपत्तीचे ना कधी मूल्यांकन केले गेले, ना कधी या साधनसंपत्तीपासून व्यापार, उदीम वाढविण्याचे प्रयत्न झाले. हे विपर्यस्त चित्र भारतामध्ये जितके प्रकर्षाने दिसते तितके इतरत्र फारसे पाहायला मिळणार नाही. नैसर्गिकदृष्ट्या संपन्न असलेल्या विदर्भातच मोठ्या प्रमाणावर आत्महत्या घडतात. तर साधनसंपत्तीच्या बाबतीत उत्कर्ष बिंदूपर्यंत पोहोचलेल्या बिहारमध्ये दारिद्र्याचे दर्शन घडते. जर अशा प्रदेशामध्ये नैसर्गिक साधनसंपत्ती आणि उपजीविकांची साधने यांचा संबंध जोडण्याचा थोडासाही प्रयत्न केला तर तो प्रदेश प्रगतिपथावर जाऊ शकतो, हे बिहार राज्य सिद्ध करू पाहत आहे. वस्तुतः प्रत्येक गावाला नैसर्गिक साधनसंपत्तीची आगळी-वेगळी देणगी असते. या साधनसंपत्तीतूनच विकासाची वाट सापडू शकते. फक्त प्रश्न एवढाच आहे की, गावामध्ये उपलब्ध असलेल्या वनस्पती आणि पीक-पाणी यावर प्रक्रिया करण्याचा, त्यास बाजारपेठ मिळवून देण्यासाठी सहेतूक प्रयत्न केले जात नाहीत.

### खरा वाटा खेड्यांचा

एका बाजूला हे चित्र आहे तर दुसऱ्या बाजूला खेड्यांमधील परिस्थिती झपाट्याने सुधारत आहे. देशाच्या एकंदर बाजारपेठेच्या उलाढालीमध्ये ५२ टक्के वाटा हा खेड्याचा आहे. घरोघरी मोबाईल आले आहेत. या खेड्यांमुळेच ऑटोमोबाईलपासून इतर अनेक उद्योग ऊर्जितावस्थेत आलेले दिसतात. कॉर्पोरेटमधील सगळी मंडळी ग्रामीण भागाकडे त्या ठिकाणची वाढती लोकसंख्या आणि एकंदर क्रयशक्तीच्या दृष्टीने मोठी बाजारपेठ म्हणून पाहतात. पण या बाजारपेठेच्या केंद्रस्थानी असलेला खेड्यातला माणूस मात्र ६० वर्षांनंतरही उपजीविकेच्या साधनांचा अजून शोध घेत आहे. उपजीविकेच्या या साधनाला उद्यमशीलतेची कधी जोड दिली गेली नाही. उद्योगाची प्रतिष्ठा कधीही दिली गेली नाही.

केवळ गरीबांना मदत करण्यासाठी सबसिडीची योजना म्हणून या उपजीविकेच्या उपक्रमाकडे पाहिले गेले. त्यामुळे या विषयाकडे ज्या गांभीर्याने पाहायला पाहिजे होते तितके लक्ष दिले गेले नाही.

## साचेबद्ध विकास

मुळामध्ये उपजीविकेची साधने देत असताना हा एक एकसुरी 'मागणी आधारित' कार्यक्रम समजला गेला. ही उपजीविकेची साधने देऊन आपण त्यांना उपकृत करीत आहोत ही भावना ठेवण्यात आली. त्यामुळे उपजीविकेच्या उपक्रमांची 'मागणी तसा पुरवठा' करणे म्हणजेच हा कार्यक्रम यशस्वी ठरला असे मानण्यात आले. पण जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि इतर यंत्रणांनीसुद्धा हा कार्यक्रम गेल्या पाच दशकांपासून राबवूनही ठाशीव असे काहीही घडले नाही. मूळ गल्लत अशी झाली की, ज्या माणसांना आपण उपजीविकेची साधने देत आहोत, त्या व्यक्तीचे बलस्थान केवळ तो दारिद्र्य रेषेखाली आहे एवढेच पाहिले जाते. त्याच्याकडे कोणते कौशल्य आहे, कोणती साधने आहेत आणि गावाकडे नैसर्गिक कोणता ठेवा आहे, याच्याकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही. एक साचातली उपजीविकेची साधने देण्यात आली. त्यामुळे शेळी वाटप, मेंढी वाटप, गाई वाटप इथपासून किराणा दुकान, डेअरी, कुक्कुटपालन हीच उपजीविकेची साधने आहेत असा पक्का समज करून घेऊन तोच कार्यक्रम म्हणून राबविला गेला.

## कौशल्य हा मूलाधार

मुळामध्ये ज्या माणसासाठी उपजीविकेच्या कार्यक्रमाचा हा मोठा सोपस्कार केला जातो, त्या माणसाकडे काय कौशल्य आहे आणि त्या कौशल्याच्या अनुषंगाने गावामध्ये कोणत्या प्रकारची साधनसंपत्ती उपलब्ध आहे याचा एकजिनसी विचार केला गेला नाही. या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपजीविकेच्या साधनांना वेगळ्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. सहभागीय मूल्यमापन किंवा पीआरएची पद्धती आपल्याकडे सर्व रोगाला एकच औषध या पद्धतीने राबविले जाते. नैसर्गिक साधन संपत्ती, नकाशा, सामाजिक नकाशा, चपाती नकाशा, गावाचा इतिहास, लक्ष्य केंद्रित गटचर्चा, हंगामाचे नियतकालिक, या



पीआरएच्या पद्धती पाणलोट विकासाच्या कार्यक्रमाला ज्या पद्धतीने जोडले जातात, तशीच जोड उपजीविकेच्या साधनांचा विचार करताना देणे योग्य वाटत नाही. उपजीविकेच्या साधनांचा शोध घेण्यासाठी वेगळा पीआरए करण्याची गरज आहे. म्हणजे नैसर्गिक साधनसंपत्तीच्या भौतिक गोष्टीपेक्षा त्या गावात राहणाऱ्या माणसाचे बलस्थान काय आहे आणि गेल्या अनेक वर्षांच्या गावकीच्या संस्कारांतून त्याला कोणते कौशल्य प्राप्त झाले आहे या दोन गोष्टींच्या आधाराने उपजीविकेच्या कार्यक्रमाची बांधणी करणे आवश्यक आहे. एखाद्या छोटेखानी उद्योगाची आवड, त्याला स्थानिक पातळीवर उपलब्ध संधीचा विचार करून कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. कौशल्य विकासाचे प्रशिक्षण जितके व्यावहारिक दिले जाईल तितके ते परिणामकारक होईल. बऱ्याच वेळा पदवीचा आणि ज्ञानाचा निकटचा संबंध आहे असे समजून हे कौशल्य त्या तरुणामध्ये आहेच असे गृहीत धरले जाते. वस्तुतः पदवीचा आणि ज्ञानाचा संबंध असतोच असे नाही. अंगभूत कौशल्य ही त्यापेक्षा वेगळी गोष्ट असते. पण प्रत्येकामध्ये काही तरी वेगळेपण, काही तरी वेगळी खुबी असते, तथापि, त्या गुणांची आणि त्याची ओळख झालेली नसते. त्यामुळे उपजीविकेच्या साधनांचा ठोकळेबाजपणे विचार न करता, वेगळे पर्याय समोर ठेवले तर व्यक्ती कौशल्याला तर संधी मिळेलच पण उपजीविकेच्या स्थायित्वासाठी हेच कौशल्य मूलाधार ठरू शकेल. हे सर्व जमलं तर कोणीही म्हणेल 'होय, पैसा झाडाला लागतो'.

## सबसिडी नको हवी 'कष्टाची शिडी'

या उपजीविकेच्या कार्यक्रमातून लाभार्थीला कोणती वस्तू दिली आणि त्यामध्ये किती अनुदान प्राप्त झाले यापेक्षाही ज्या व्यक्तीसाठी हा कार्यक्रम राबविला ती किती स्वावलंबी झाली आणि त्यातून त्या व्यक्तीचा आत्मसन्मान किती वाढला हा सर्वांत कळीचा मुद्दा आहे. हा कार्यक्रम खऱ्या अर्थाने यशस्वी करून उद्योगाची उभारणी मार्केटिंगपर्यंत करायची असेल तर सबसिडीपेक्षा 'कष्टाच्या शिडीला' महत्त्व दिले पाहिजे. त्यामुळे उद्यमशीलतेचे नावीन्य हे उपजीविकेच्या साधनांचे आत्मबळ मानले पाहिजे. एकसारखा

उद्योग कोणतीही भौगोलिक, ऐतिहासिक आणि लोक कौशल्याचा विचार न करता राबविला गेला तर तो यशस्वी होणार नाही. मुळामध्ये प्रत्येक गावाला निसर्गाने त्याची स्वतःची एक वेगळी ओळख दिलेली असते. प्रत्येक गावाला करवंद, लिंब, चिंच, पळस यापासून काही तरी वेगळी साधनसंपत्ती निसर्गाने निर्माण करून ठेवलेली असते. उपजीविकेच्या साधनांची व्यवस्था म्हणजे काय तर गावामध्ये उपलब्ध असलेल्या या नैसर्गिक संपत्तीचा उद्यमशीलतेशी दुवा जोडणे म्हणजेच उपजीविकेची त्या गावाची व्यवस्था निर्माण करणे होय. त्यामुळे उपलब्ध पीक रचनेपासून पिकावरील प्रक्रियेपर्यंत उपजीविकेच्या साधनांची साखळी निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

## कौशल्याची उपजीविकेशी सांगड

कौशल्यामध्येसुद्धा पारंपरिक कौशल्ये आणि जीवनकौशल्ये यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येक गावामध्ये काही तरी पारंपरिक उत्पादने असतात. त्याचा एक वेगळा वारसा असतो आणि त्यातून त्या समाजाला पारंपरिक कौशल्य प्राप्त झालेले असते. या अनुषंगाने बेअरफूट बंकर रॉय या नावाने जगप्रसिद्ध झालेल्या संजीत बंकर रॉय यांचा अनवाणी कार्यकर्ते घडविण्याचा अनोखा उपक्रम लक्षात घेण्यासारखा आहे. डेहराडूनच्या डून स्कूलमध्ये आणि दिल्लीच्या सेंट स्टीफन कॉलेजमध्ये शिकलेले बंकर रॉय खरं तर आयएएस होणार होते परंतु १९६० मधील बिहारच्या दुष्काळाने त्यांच्या आरामदायी जीवनशैलीमध्ये प्रचंड बदल घडविला आणि ते एका वेगळ्याच समाजोपयोगी कार्यात रमले. प्रचंड दारिद्र्य व दूरवर खेड्यात राहणे यामुळे मुलामुलींना औपचारिक शालेय शिक्षण मिळणे केवळ अशक्य आणि अशा मुलांची संख्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे हे लक्षात घेऊन त्यांनी अनवाणी तंत्रज्ञ घडविण्याचे अवघड काम सुरू केले. बेअरफूट डॉक्टरच्या धर्तीवर त्यांनी आपल्या कॉलेजमध्ये अनवाणी अभियंते, वास्तुरचनाकार, शिक्षक, वैद्यकीय चाचण्या करू शकणारे तंत्रज्ञ, परिचारिका, माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ, लेखातज्ज्ञ, मार्केटिंग व्यवस्थापक असे अनेक बेअरफूट कार्यकर्ते घडवायला सुरुवात केली. मागासवर्गीय समाजातील आणि दुर्गम भागांत राहणाऱ्या अशिक्षित अथवा



अर्धशिक्षित स्त्री, पुरुष, मुले यांनाच त्यांनी आवर्जून आपल्या या प्रशिक्षणासाठी कॉलेजमध्ये प्रवेश दिला. एकदा प्रशिक्षित झाल्यानंतर हे सर्व अनवाणी तंत्रज्ञ कार्यकर्ते भारतभर ग्रामीण भागामध्ये काम करू लागले. त्यांनी हिमालयातील १३६ दुर्गम खेड्यांत सौर ऊर्जेवरील उपकरणे लावण्यापासून ते पाईपमधून पाणीपुरवठा योजना राबविण्यापर्यंत अनेक कामे देशभरात केली. आज भारतात तेरा राज्यांमध्ये अशी वीस बेअरफूट कॉलेजेस कार्यरत आहेत. औपचारिक शासकीय शिक्षण पद्धतीच्या ऐवजी ग्रामीण जनतेमधील उपलब्ध कौशल्य व ज्ञान यांचा उपयोग करून तंत्रज्ञ व व्यावसायिक निर्माण करणे हीच भारताची आजची गरज आहे असे बंकर रॉय यांना वाटते व त्यांनी तसे त्यांच्या अनोख्या उपक्रमाद्वारे सिद्ध केले आहे असे म्हणावयास काही हरकत नाही.

लोकांच्या गरजा आणि उपलब्ध कौशल्यांना अधिक प्रभावशाली कसे करता येईल याचा मूलगामी विचार उपजीविकेच्या साधनांची मांडणी करताना करणे आवश्यक आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार न करता एकदमच इमू पालन, मशरूम कल्चर असे उद्योग सुरू केले तर ते यशस्वी होऊ शकत नाहीत. पण केवळ पारंपरिक कौशल्याच्या आधाराने उद्यमशीलता उभी राहू शकत नाही. बदलत्या जगाचा आणि त्यामधील व्यवहाराचा अनुभवही आवश्यक आहे. त्यासाठी लोकांची जीवनकौशल्ये विकसित होणे गरजेचे आहे. संवादाचे कौशल्य आणि त्या जोडीला बाजारपेठेची सक्षम जाण निर्माण होण्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. उपजीविकेसाठी उभारलेले अनेक व्यवसाय हे कर्मदरिद्री व्यवस्थापनाने कोलमडून पडतात आणि इच्छाशक्ती नसल्यामुळे ते भरभराटीला येत नाहीत. या सगळ्यांच्या मुळाशी एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे गावातील उपलब्ध साधनसंपत्तीची जोड तितक्याच सक्षमतेने पुढे न्यायची असेल तर कौशल्य विकास करणे आवश्यक आहे. केवळ कोणत्या व्यवसायातून किती फायदा मिळतो, किती कर्ज मिळते, किती सबसिडी मिळते आणि सध्या कोणत्या उपजीविकेच्या व्यवसायाची शासन दरबारी चलती आहे यापेक्षा हे सर्व पेलण्यासाठी लागणारे कौशल्य उभी करणारी व्यवस्था निर्माण करणे म्हणजेच उपजीविकेच्या साधनांची पायाभरणी करणे होय.

# पाणलोटातून शाश्वत उपजीविका विकास
## अर्थात
## जिवंत झरे

**ग्रामीण** शेती व्यवस्थेमध्ये उपजीविकेची साधने ही जमीन पाणी आणि जैविक संपत्ती याच्याशी जोडलेली आहेत. पाणलोट विकास कार्यक्रम हे ग्रामीण भागातील उपजीविका सुरक्षिततेचे वाहन आहे. चिरस्थायी ग्रामीण उपजीविकेसाठी लोककेंद्रित कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. रोजगाराची पारंपरिक साधने आणि त्या भागातील लोकांचा आर्थिक कार्यक्रम यातून दारिद्र्य निर्मूलनाची टिकाऊ योजना हाती घेता येऊ शकते. पण त्यासाठी पाच भांडवली साधन संपत्तीचा - पंचकोनांचा - विचार होण्याची गरज आहे. पाणलोट विकासातून १) भौतिक, २) आर्थिक, ३) नैसर्गिक, ४) मानव संसाधन आणि ५) सामाजिक अशा पाच प्रकारचे भांडवल निर्माण होते. या संचिताच्या आधारावरच उपजीविकेच्या सुरक्षिततेची स्थायी इमारत उभी असते. पाणलोटातून निर्माण होणारे ही पाच प्रकारची साधनसंपत्ती उपजीविका विकासासाठी परस्परावलंबी आहे.

### १) भौतिक भांडवल

या संदर्भात पाणलोटाद्वारे भौतिक साधनसंपत्ती निर्माण केली जाते. पाणलोट विकासाच्या कार्यक्रमांतून होणारी बांधबंदिस्ती, नाला बंडिंग, सिमेंट बांध, सलग समपातळी चर याच्यातून नुसत्या विहिरी जिवंत होत नाहीत तर बदलत्या पीक रचनेचा वेगळा मार्ग सापडतो. डोंगराच्या वर झाडाचे संरक्षण करण्यातून नुसते पर्यावरणाचे संतुलन होत नाही तर वेगळ्या जैव विविधतेची निर्मिती होते. उजाड माळरान किंवा पाणलोटाच्या उपचार न झालेल्या गावातील जमिनीच्या किमती आणि पाणलोटाच्या उपचार झालेल्या गावातील जमिनीच्या किमती याच्यामध्ये महद अंतर आहे. ज्या गावात माथ्यापासून पायथ्यापर्यंत शास्त्रीय पद्धतीने पाणलोटाचे उपचार केले जातात त्या ठिकाणच्या जमिनीच्या किमती आपोआपच वाढतात. यापेक्षाही पिण्याचे पाणी गावातील



मंडळींना सहजपणे उपलब्ध होते. खेड्यातील आयाबायांचे पाणी आणण्याचे कष्ट कमी होतात. पाणलोटाच्या क्षेत्रातील विहिरींची पातळी वाढणे हे सुद्धा त्या गावाच्या उपजीविका साधन विस्तारासाठी मिळालेले मोठे भागभांडवल आहे. याशिवाय बांधावर निर्माण होणारे गवत, चारा याच्यातून कॉमन पूल रिसोर्सेस तयार होतात आणि उपजीविकेच्या साधनाला बळकटी देण्यासाठी कारणीभूत ठरतात. थोडक्यात पाणलोट विकासातून जणू 'जिवंत झरेच' वाहू लागतात.

### २) मानव संसाधनांचे भांडवल

पाणलोटाच्या कार्यक्रमातून मानवी संसाधनांमध्ये मोठे फेरबदल घडून येतात. पाणलोट उपचारामुळे शिक्षण, आरोग्य आणि इतर कौशल्यांची वृद्धी होते. पाणलोटाचा कार्यक्रम चांगल्या पद्धतीने राबविल्यानंतर त्या गावातील लोक शिक्षणावर आणि आरोग्य चांगले राहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करतात. मानव विकासाच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. ग्रामीण भागातील लोकांचे लोंढे सध्या रोजगारासाठी जवळच्या शहरांकडे धाव घेतात. नागरी आणि अर्धनागरी भागात मिळेल त्या जागी ही मंडळी रोजगारासाठी स्थलांतरित होतात. हे स्थलांतर थांबविण्याचे मोठे काम पाणलोट विकासातून केले जाते. पाणलोटाच्या गावामध्ये बचत गट, शेतकरी गट यांचे मोठे जाळे विणले जाते. त्यातून त्यांचा नुसता विकास कार्यक्रमात सहभाग वाढत नाही तर निर्णय प्रक्रियेमध्ये सुद्धा सहभाग वाढतो. मुळामध्ये हा झालेला बदल तात्पुरत्या स्वरूपाचा नसतो तर अत्यंत दूरगामी प्रमाणात त्याचे चांगले फायदे पाहायला मिळतात.

### ३) आर्थिक भांडवल

पाणलोटाच्या माध्यमातून गावाचे सारे अर्थकारण बदलते. असे म्हटले जाते की, १२० मिमी पाऊस पडल्यानंतरही जे गाव स्वाभिमानाने स्वबळावर उभे राहते त्याला यशस्वी पाणलोट असे म्हणावे. पाणलोटाच्या कार्यक्रमातून दर एकरी उत्पादन तर वाढतेच परंतु भूमीहीनांना चांगला रोजगार मिळतो. लोकांची गुंतवणूक दृश्य स्वरूपात बदलल्याचे दिसते. केवळ नवीन घर नवीन मोटरसायकल किंवा मोबाईल सेटचा वापर यातूनच मोठे

आर्थिक बदल होतात असे नाही तर उपजीविकेच्या दृष्टीने चांगले पाणलोट उपचार झालेल्या गावातील माणूस हा स्वतःला जास्त सुरक्षित समजतो. प्रत्येकाचे घरटी उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढते. ज्या ठिकाणी एक पीक कसे बसे खरिपाचे घेतले जाते त्या ठिकाणी रबीच्या पिकाबरोबर उन्हाळी पीकसुद्धा काही पाणलोटात घेतल्यामुळे आर्थिक उत्पन्नात मोठा बदल घडतो. केवळ गुणात्मक बदल नव्हे तर बचत, उत्पन्न आणि इतर लोक व्यवहारात सुद्धा मोठा संख्यात्मक बदल दृश्य स्वरूपात दिसतो. त्यामुळेच शैक्षणिक दर्जा आणि आरोग्य सेवा यामध्ये यशस्वी पाणलोटातील माणसे व्यवस्थित गुंतवणूक करू शकतात.

### ४) नैसर्गिक भांडवल

पाणलोट क्षेत्र विकासामुळे केवळ भूमी व जलसंपत्तीचाच विकास होतो असे नाही तर त्याबरोबरच चाऱ्याची वाढ होते. याचा परिणाम पशु उत्पादन वाढण्यासाठी होतो. जमिनीचा वाढलेला भाव, जमिनीचा वाढलेला चांगला दर्जा जो पाणलोटाच्या कामामुळे साध्य होऊ शकेल. नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास पाणलोटापूर्वीचा व पाणलोटानंतरचा अशा पद्धतीने परिणामकता पाहता येऊ शकते. पाणलोटाची अनौपचारीकरित्या मिळालेली माहिती ही गुणात्मकदृष्ट्या महत्त्वाची असते. तर पूर्वीची जमीन, पाणी, पिकाची स्थिती, अन्य उत्पादनाची स्थिती विविध आकडेवारीच्या स्वरूपात फरकाने दाखवली जाते. कुटुंबाच्या संपत्तीचे गुणानुक्रम ठरविल्यामुळे एकंदर गावाचे उत्पन्न समजायला मदत होते. पाणलोटानंतर भूजलामध्ये झालेल्या वाढीचा मुख्य परिणाम गावातील प्रत्येक कुटुंबामध्ये झालेला दिसतो. त्याचे परिणाम दोन प्रकारचे होतात म्हणजे पिण्याच्या पाण्याचा चांगला दर्जा व पाणी आणण्यासाठीचा लागणारा वेळ. महिलांचा पाणी आणण्यासाठीचा लागणारा वेळ व पाणी आणण्याच्या अतिरिक्त श्रमांपासून होणारी मुक्ती हा त्यातील अत्यंत कळीचा मुद्दा आहे. महिलांना पाणी आणण्यासाठी होणारे श्रम त्यांच्या अप्रत्यक्षरीत्या आजारपणाला जबाबदार ठरतात. पाणी घराच्या जवळपासच उपलब्ध झाले तर महिलांचे श्रमापासून होणारे आजार कमी होतात. भूजल पातळी वाढल्याचा थेट परिणाम सिंचन



विहिरींच्या पाण्याच्या पातळी वाढीतून शेतकऱ्यांना ताबडतोब दिसून येतो. एखाद्या वर्षी जर कमी पाऊस झाला तरी सिंचन विहिरींची स्थिती चांगली राहिली तर पाणलोटाचा दृश्य परिणाम लोकांना चांगलाच जाणवतो. औरंगाबाद तालुक्यातील सन २००२ मध्ये सुमारे १२० मिमी इतकेच सरासरी वार्षिक पर्जन्यमान झाले होते. पण पाणलोट पूर्ण झालेल्या गावांमध्ये ना पिण्याच्या पाण्याची कमतरता होती ना रबी पिकांमध्ये कुठली कमतरता दिसत नव्हती. चाऱ्याचा प्रश्न तर अजिबातच भेडसावत नव्हता. उलट आजूबाजूच्या सुमारे बारा गावांचे लोक चाऱ्यासाठी पाणलोटाच्या गावाकडे धाव घेत होते. म्हणजे पशुधन वाचविण्यासाठीचा सगळ्यात महत्त्वाचा चारा उपलब्ध केला तो फक्त पाणलोटानेच.

### ५) सामाजिक भांडवल

एखाद्या गावाची सामाजिक प्रगती किंवा बदलही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. केवळ एखादा छोटा अभ्यास किंवा अहवाल करून यातून हा सामाजिक बदल आकडेवारीच्या स्वरूपात दिसू शकतो. पण लोकांचे अंतर्मन जाणण्याकरिता त्याला गुणात्मक दृष्टिकोनाची गरज असते. मुळामध्ये जात, धर्म, पंथ इत्यादींमध्ये विभागले गेलेले गाव पाणलोटाच्या कामाने एकत्र येते. कोणत्या ठिकाणी बांध बांधला म्हणजे कोणत्या विहिरी जिवंत होतात आणि शेतातील सांडवा कोणत्या ठिकाणी असावा याचे लोकशहाणपण मोठे असते. पण ते दाखविण्याची संधी कधी मिळालेली नसते.

पाणलोट या सर्व खेड्यातील मंडळींना आपल्या नेतृत्व गुणांना वाट करून देणारी एकमेव उपचार पद्धती आहे. त्यामुळे पाणलोट विकास ही एक वेगळी जीवनपद्धती आहे. संकुचित विचारांच्या पलीकडे जाऊन झाड, जमीन, पाणी यांची सोयरीक जोडणारे आणि एकंदर गावाचा, लोकांच्या उपजीविकेचा विचार करण्यास प्रवृत्त करणारी पाणलोट ही गुरुकिल्ली आहे. त्यामुळे पाणलोटातून केवळ दाखविण्यापुरती बांधीलकी तयार होत नाही तर प्रत्येक गोष्टीत सामीलकीचा भाव तयार होतो. आणि या सामीलकीतूनच एक वेगळे अर्थकारण पुढे येते. हे अर्थकारण निर्माण करण्याचा पाया हा पाणलोटाचे सामाजिक भांडवल आहे.

# उपजीविकेच्या साधनांचा शाश्वत विकास
## अर्थात
## जीवन उन्नतीचा माग

**उपजीविका** संवर्धनाचा कार्यक्रम म्हणजे अन्नवाटप नव्हे की गरजू व्यक्तीला मदत करण्याची शासकीय अनुदान योजना. उपजीविका विकासाची साधने ही नैसर्गिक साधनसंपत्तेतून उभी करून लोकांचा शाश्वत विकास करणे यामध्ये अपेक्षित आहे. स्वावलंबनातून स्वयंरोजगार निर्माण करणारी ही एक आर्थिक चळवळ आहे. उपलब्ध मानवी आणि नैसर्गिक संसाधने वापरून केलेली कृती आहे. नगदी किंवा वस्तू स्वरूपात पुरेसे आर्थिक स्थैर्य देणारा एक स्रोत आहे. घरातील वैयक्तिक आणि कौटुंबिक गरजा भागविण्याचे साधन म्हणजे उपजीविकेचा संवर्धन कार्यक्रम आहे. मुळामध्ये शाश्वत आर्थिक प्राप्ती आणि सन्मानाचे आयुष्य प्रत्येक व्यक्तीला प्राप्त होणे हे या उपजीविकेच्या कार्यक्रमातून अपेक्षित आहे. स्थानिक संसाधने वापरून, लोकशहाणपणाने स्थानिक लोकांचेच कौशल्य विकसित करून शिवारातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा परिणामकारक वापर करणे हे या कार्यक्रमाचे मूळ उद्दिष्ट आहे. तो एक 'जीवन उन्नतीचा मार्ग' आहे.

मुळामध्ये ६० टक्के लोकसंख्या विपन्नावस्थेत ठेवून कोणताही देश सुपर पॉवर बनू शकत नाही. सध्याच्या उपभोगवादी व्यवस्थेमध्ये कोणत्याही देशाचा विकास व्हायचा असेल तर शाश्वत उपजीविकेच्या साधनांचा मूलगामी विचार करण्याची गरज आहे. आपल्या देशामध्ये महात्मा गांधींनी या प्रश्नाचा ज्या जाणीवेने विचार केला तो इतरत्र फारसा झाला नाही. जणू काही एकविसाव्या शतकातील समोर येणाऱ्या प्रश्नांची त्यांना जाणीव होती आणि त्यामुळेच त्यांनी ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेची मांडणी केली. शाश्वत उपजीविका निर्माण करणे ही गरज आहे पण त्याला अधाशीपणाचे स्वरूप नको आहे. उपभोगवादी वृत्तीचा तर लवलेशही नसला पाहिजे. वसाहतवादी ब्रिटिश राज्य व्यवस्थेचा अनुभव घेतल्यानंतर गांधीजींनी जी ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली त्यामध्ये त्यांनी



सातत्याने विकेंद्रित व्यवस्था, स्थानिक संस्थात्मक बांधणीला अधिक महत्त्व दिले. खऱ्या आणि सातत्याच्या लोकसहभागातूनच हे घडू शकेल असे त्यांनी मांडले.

एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम २००८ पासून देशात सुरू झाला. २००५ व २००१ मधील अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम, २००३ मधील हरियाली या कार्यक्रमाच्या आधाराने एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाची बांधणी करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये केवळ पाणलोट प्रकल्पातून नवनव्या उपचार पद्धती राबविणे या वरकरणी भौतिक गोष्टींपेक्षा पाणलोटातील कुटुंबांच्या आर्थिक उन्नतीचा प्राधान्यक्रमाने विचार करण्यात आला. आतापर्यंत आलेल्या उपजीविका सुधारणा विकासाचे सर्व कार्यक्रम हे केवळ दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून राबविण्यात आले. एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हा एकमेव असा कार्यक्रम आहे की ज्यामध्ये उपजीविका सुधारण्याच्या विषयाची सैद्धांतिक मांडणी करण्यात आली. पाणलोट क्षेत्रातील नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, विकास व व्यवस्थापन याबरोबरीनेच कृषी उत्पादनांत वाढ करणे आणि त्याबरोबरीने पाणलोटातील लोकांची उपजीविका सुधारण्याकडे विशेष लक्ष देण्यात आले.

### उपजीविकेचा साकल्याने विचार

कार्यक्रमाच्या तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात उपजीविका सुधारण्याच्या यशस्वी उपाययोजना इतर गावांत पोहोचविण्याच्या दृष्टीने काही विशेष प्रयत्न करावेत असे म्हटले आहे. त्या अर्थाने उपजीविका सुधारण्याचा हा कार्यक्रम पथदर्शक ठरावा अशी अपेक्षा आहे. ज्या गावामध्ये उपजीविका सुधारण्याच्या दृष्टीने यशस्वी उपक्रम राबविले गेले आहेत. त्यांच्या यशोगाथा, चित्रफिती, अनुभव कथन इतर गावांना पुढे येण्यासाठी प्रवृत्त करतील आणि त्यासाठी आवश्यक ती साहित्य निर्मिती केली जावी असे म्हटले आहे. उपजीविका सुधारणा उपाययोजनांची मोठी यादी कोणालाही, कशीही, कधीही उपलब्ध करून देता येईल. परंतु स्थानिक पातळीवर, स्थानिक परिस्थितीत एखादा नवा वस्तुपाठ घालून देता येतो का हा खरा कळीचा मुद्दा आहे. मनुष्यबळामध्ये कौशल्य निर्माण करणे

आणि त्यांच्या क्षमतांचे वर्धन करणे या महत्त्वाच्या गोष्टींचा ऊहापोह यामध्ये करण्यात आला आहे.

एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाचे तीन टप्पे आहेत. पहिला प्रकल्पपूर्व टप्पा, दुसरा उपाययोजना अंमलबजावणीचा टप्पा आणि तिसरा या प्रकल्पातून बाहेर पडण्याचा टप्पा. या तीनही टप्प्यामध्ये कृषी उत्पादन वाढ आणि उपजिविका सुधारण्याकडे आवश्यक असणाऱ्या गोष्टीचा प्राधान्यक्रमाने विचार करण्यात यावा असे म्हटले आहे. त्यामुळे तीनही टप्प्यांमध्ये या कार्यक्रमाला सारखे महत्त्व देण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यामध्ये प्रचलित कृषी पद्धतीत बदल घडवून उत्पादन वाढ करणे हे जसे उद्दिष्ट आहे अगदी त्याच प्रमाणे ज्या कुटुंबाकडे नैसर्गिक संसाधने नाहीत अशा लोकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आपल्याला काय पर्याय देता येतील याची चर्चा होणे आवश्यक आहे. हे पर्याय लोकांच्या समोर मांडले तरच या कुटुंबाचा सहभाग वाढेल, त्याची जाणीव जागृती वाढू शकेल. मुळामध्ये या अगोदरच्या पाणलोटाच्या योजनांमध्ये कोणते पाणलोट उपचार घेता येतील यावरच प्रकल्प अहवालात भर देण्यात आला. या नव्या प्रकल्प नियोजनात मूलतः स्थानिक संसाधनांचा अभ्यास करून आवश्यक ती माहिती गोळा करणे ही आवश्यक गरज आहे. ही माहिती आली तरच ज्यांच्याकडे जमीन नाही त्या कोणत्या कुटुंबाचे पुनर्वसन करायचे आहे आणि ते कसे करायचे आहे याबद्दलचा मार्ग सापडू शकेल. सहभागी ग्रामीण मूल्यावलोकन, गटचर्चा सामाजिक आर्थिक सर्वेक्षण या सर्व गोष्टींचा आधार घेऊन ही तपशीलवार चर्चा आणि लोकांच्या विचारांचे आदान-प्रदान घडल्यानंतरच या उपजीविका सुधारण्याच्या कार्यक्रमाला वेगळी दिशा मिळू शकेल.

## पाणलोटाचा थेट संबंध

केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये पाणलोट विकास कार्यक्रमांतून शाश्वत ग्रामीण उपजीविकेची निश्चित साधने निर्माण गावस्तरावरील विशेष गट, रोजगार निर्मिती आणि पारंपरिक पद्धती याच्या पलीकडे जाऊन दारिद्र्य निर्मूलनाचा वेगळा कार्यक्रम राबविण्यासाठी पाणलोट विकास कार्यक्रम नव्या वाटा



चोखाळू शकते. झाड, जमीन पाण्याचे नाते बांधण्याच्या बरोबरीने बदलती पीक रचना, पाण्याचा चिरस्थायी स्रोत आणि जैविक संपत्ती याच्या आधाराने गावाच्या वृद्धीचे वेगळे अर्थकारण पाणलोटाच्या कार्यक्रमातून येते पण त्यासाठी शाश्वत उपजीविका कार्यक्रमाची जोड आवश्यक आहे. पाणलोटातून एखाद्या गावात दुग्ध पालन वाढले तर त्यातून सगळ्या गावाचे अर्थकारण तर बदलतेच पण प्रत्येकाला उपजीविकेचे साधन मिळेल. गावामध्ये मोठ्या प्रमाणावर भाजीपाला घेणे असो की शेडनेटसारख्या माध्यमाचा वापर करून बारमाही भाजीची उपलब्धता करणे असो यातून एखाददुसऱ्या व्यक्तीच्या उपजीविकेचा मार्ग धुंडाळला जात नाही तर संपूर्ण समूहाच्या उपजीविकेचा सामाजिक समरसतेच्या, सामाजिक सामीलकीच्या भावनेने विचार केला जातो. त्यातून शाश्वत उपजीविकेची निर्मिती होते. तथापि, या शाश्वत उपजीविकेसाठी स्थानिक पातळीवरील सुविधा वाढणे, वाहतूक व्यवस्था, चांगली बाजारपेठ, प्रक्रिया उद्योग या सर्व भौतिक घटकांचासुद्धा विचार होणे गरजेचे आहे. शाश्वत उपजिविका सुधारण्याच्या बाबत बँकांच्या मंडळींची जाणीव जागृती करणे आवश्यक आहे. पारंपरिक दारिद्र्य निर्मूलनाच्या शासकीय योजनामधील ही नवीन योजना नाही तर लोकसहभागावर आधारित आणि समूहांनी अंगीकारलेली ही उद्यमशील जीवनपद्धती आहे. याच्याबद्दल वेगळे जागरण घडणे आवश्यक आहे. आर्थिक घटकांच्या बाबतीत कर्ज, लघुकर्ज, स्वयंसाहाय्यता गट, जॉईंट लाएबिलिटी ग्रुप याबाबतची नव्याने मांडणी करणे आवश्यक वाटते.

## चौकटीतला विचार

इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट स्टडीजने शाश्वत उपजीविकेची एक चौकट विकसित केलेली आहे. लोकांच्या उपजीविकेवर परिणाम करणारे घटक आणि त्यांचे परस्पर संबंध या चौकटीतून प्रदर्शित होतात. मूलतः उपजीविकेचे नियोजन करीत असताना या चौकटीचा फार उपयोग होतो. या चौकटीतून पाणलोट क्षेत्रामध्ये असलेल्या सध्याच्या समस्या कळतात आणि या समस्यांची एकमेकांशी असलेला संबंधही माहीत होतो. याशिवाय उपजीविकेवर परिणाम करणारे घटक आणि त्याची प्रक्रिया लक्षात येते या

चौकटीच्या माध्यमातून अनुषंगिक घटकांशी संवाद साधता येतो.

या चौकटीचे चार महत्त्वाचे घटक आहेत. १) समस्यांचा वेध घेणे, २) त्यांचा उपजीविकेच्या मालमत्तेशी असलेला संबंध, ३) बदलती रचना आणि त्याला अनुरूप प्रक्रिया, ४) उपजीविकेतून साध्य काय होणार याचा एकंदर आवाका येणे.

**१) समस्यांचा वेध :**

लोक ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणी नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध असते परंतु बाह्य वातावरणातील अनेक धक्के त्यांना सोसावे लागतात. याशिवाय त्या गावाच्या काही विशिष्ट चालीरीती, रूढी, परंपरा असतात. काही हंगामी, तात्कालिक स्वरूपाचे प्रश्न असतात आणि या सर्व गोष्टींचा विचार करूनच समस्यांची उकल करणे आवश्यक असते. एका बाजूला अमेरिकेसारख्या देशामध्ये मंदीची लाट असतानासुद्धा ती पेलण्याचे सामर्थ्य ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये आहे, हे भारताने सिद्ध केले आहे असे केंद्रीय कॅबिनेट सचिव चंद्रशेखर यांनी म्हटले आहे. पण परिस्थितीतील प्रचंड दोलायमानतेमुळे ग्रामीण जनतेला स्थैर्य लाभत नाही. आरोग्याचे प्रश्न, विशेषतः कधी अति पाऊस, कधी अवकाळी तर कधी दुष्काळी ही स्थिती, आलेल्या पिकांचे बाजारभावात होणारे जीवघेणे चढउतार आणि पिकांवर पडणारे रोग आणि किडी याशिवाय जनावरांना होणारे रोग हे नेहमीचे मानसिक धक्के शेतकरी सहन करीत असतो. उपजीविकेच्या साधनांचा विचार करताना या आपत्ती निवारणासाठी, हे धक्के सहन करण्यासाठी त्यांचे मनोबल वाढणे अधिक महत्त्वाचे आहे. याशिवाय तंत्रज्ञानातील बदल सगळी शेतीव्यवस्था बदलून टाकतात. एकेकाळी शेतातले बियाणे शेतात तयार होत होते. आता बीटीच्या आक्रमणानंतर ही सर्व बियाणे बाद ठरली आहेत. तंत्रज्ञानामध्ये जे बदल होतात त्याच्याशी अवगत असणे बऱ्याच वेळा जमत नाही. याशिवाय शासनाचे धोरण, नैसर्गिक साधनांच्या वापरातील बदल याबद्दलचे ट्रेंड सातत्याने बदलत असतात. उपजीविकेच्या साधनांचा विचार करताना या ट्रेंडचा मागोवा घेणे महत्त्वाचे ठरते. याशिवाय शेतमालाच्या किंमती, रोजगाराची उपलब्धता, या सर्वच गोष्टींबाबत कमालीची अस्थिरता, दोलायमानता असते. त्यामुळे कुठलाही नवीन प्रयोग



करण्यासाठी खेड्यातला माणूस धजत नाही. खेड्यामध्ये चांगली नैसर्गिक साधनसंपत्ती आहे याची जाणीव त्यांना असते. पण थोडीशी प्रक्रिया केली तर मोठ्या प्रमाणावर मूल्यवर्धन होते याची माहिती नसते.

मुळामध्ये तंत्रज्ञान विकासाचा आपला मनोरा उलटा आहे. शेतीवर आधारित सर्व व्यवस्था असतानासुद्धा सर्व तंत्रज्ञान हे शहरीकरणाकडे झुकलेले आहे. म्हणायला एकविसावे शतक आहे पण तंत्रज्ञानापासून शेतकऱ्यांची वंचना होते, त्याची त्यांना माहिती नसते, ही गोष्ट मान्य केली पाहिजे. या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकसंस्थांनी यामध्ये असलेली दरी उपजीविका साधनांच्या या संधीच्या निमित्ताने भरून काढणे आवश्यक वाटते.

नुसत्या समस्या माहीत होऊन उपयोग होत नाही तर या समस्यांचे विश्लेषणही तितकेच महत्त्वाचे आहे. एखादे पीक किती शेतकरी किंवा त्यांचे गट घेतात, उपजीविकेच्या दृष्टीने त्याचे किती महत्त्व आहे. त्यापासून मिळणारे उत्पन्न किती, या उत्पादनाला बाजारपेठ कुठे आहे. तसेच या बाजारपेठेतील चढउतार कसे असतात, या चढउतारांची माहिती कशी मिळवावी, उद्योगासाठी कर्ज देणाऱ्या संस्था उपलब्ध आहेत का? कर्ज मिळविण्यासाठी काय प्रक्रिया करावी लागते अशा अनेक प्रश्नांचा धांडोळा असतो. या प्रश्नातून मार्ग काढणे आणि समस्यांचे विश्लेषण नेटकेपणाने करणे ही बाब शाश्वत उपजीविका विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

**२) उपजीविकेच्या मालमत्तेशी समस्यांचा संबंध :**

उपजीविकेच्या मालमत्तेचा पंचकोन आपण पाहिला. हा पंचकोन पाहिल्यानंतर खेड्यासारखे कोणी समृद्ध भांडवलदार नाही असे वाटते. पण उपजीविकेच्या मालमत्तेचा पंचकोन सातत्याने बदलत असतो. या पंचकोनाची रचना त्रिमिती स्वरूपाची असते. म्हणजे थ्री डायमेन्शनल असते. त्यामध्ये वेळेचे तिसरे परिमाण हे महत्त्वाचे ठरते. म्हणजे पंचकोनाचा एखादा कोन काही वेळानंतर बदलणार याचे भान ठेवणे आवश्यक असते. दररोजच्या जीवनमानामध्ये येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी त्याचे नाते उपलब्ध

मालमत्तेशी जोडणे आवश्यक आहे. म्हणजे निर्माण होणारे धक्के हंगामी गोष्टी आणि ट्रेंड यांच्याशी खुबीने संबंध जोडून सांगड घालणे आवश्यक आहे. या प्रत्येक भांडवलाला मिळणारा अर्थस्रोताचा विचारही करणे महत्त्वाचे ठरते.

**३) बदलती रचना आणि त्याला अनुरूप प्रक्रिया :**

शाश्वत उपजीविकेच्या चौकटीला मदत करणाऱ्या संस्था, संघटना, धोरणात्मक बाजू या गोष्टींचा विचार करण्यासाठी त्यासाठी असलेली बदलती रचना आणि प्रक्रिया समजावून घेणे आवश्यक आहे. केवळ एखाद्या उद्योगाबाबतच्या मनोराज्यात रमणे योग्य होणार नाही तर त्यासाठी आवश्यक असणारे भांडवल कसे उपलब्ध होईल हा कळीचा मुद्दा आहे. एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमातून उपलब्ध असलेल्या निधीतून उपजीविकेच्या उपक्रमाचा शोध घेणे शक्य आहे. त्याची रुजुवात करण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध आहे. परंतु तरीही त्या उपजीविकेच्या पद्धतीला विकसित होण्यासाठी बँकांची आणि आर्थिक संस्थांच्या मदतीची गरज आहे. या सर्व गोष्टींकडे कसे जाता येईल यासाठी बँकेची संरचना समजून घेणे आवश्यक आहे. जॉईंट लाएबिलिटी ग्रुपसारखी (म्हणजे गटातील एका शेतकऱ्याची हमी दुसऱ्याने घेणे) रचना उपयोगात आणता येते.

उपजीविकेच्या या साधनाकडे केवळ शासनावर अवलंबून राहणे योग्य ठरणार नाही तर त्यासाठी खासगी, सहकारी या सर्व गोष्टींची मदत घेणे आवश्यक आहे. एका बाजूला शासकीय संरचना समजावून घेणे, त्यातील विकेंद्रीकरणाचा फायदा कसा करून घेता येईल याबद्दल चर्चा करणे जसे आवश्यक आहे त्याचप्रमाणे बँकेच्या व्यवस्थेची सुद्धा नीट माहिती घेणे आवश्यक आहे. बँकांचे राष्ट्रीयीकरण हे खेड्यापाड्यांना मदत करण्यासाठी झाले आहे. प्रत्येक गावाची सर्व्हिस एरिया बँक असते. पण शासकीय योजनांतून केवळ अनुदानासाठी जे कर्ज वाटप झाले त्यातून बँकांचा एनपीए वाढला. बँकांच्या दृष्टिकोनामध्ये मनोबदल करून आणणे हे उपजीविका साधनांच्या वृद्धीसाठी आवश्यक आहे. उपजीविकेची ही साधने केवळ अनुदानासाठी किंवा सवलतखोरी वृत्तीसाठी नाहीत तर




त्यातून खऱ्या अर्थाने क्षमता वर्धन होऊन शाश्वत विकास झाला पाहिजे ही भावना आर्थिक संस्थांपर्यंत पोहोचणेसुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे.

परिवर्तनाच्या रचना या धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा असतात तर प्रक्रिया या रचना आणि लाभार्थी यांना जोडणारा व त्यांच्यात समन्वय साधणारा दुवा म्हणून कार्य करतात. प्रक्रियांमुळे धोरणांचे संचालन होते. अशा प्रक्रिया महत्त्वाच्या परंतु जरा कठीण असतात. प्रक्रिया वेगवेगळ्या पातळीवर वेगवेगळ्या प्रकारच्या असतात असे नाही तर त्या एकमेकांशी निगडीत व एकमेकांत गुंतलेल्या असतात. त्यामुळे त्यातील क्लिष्टता वाढते.

**४) उपजीविकेतून साध्य :**

उपजिविकेचे साध्य म्हणजे उपजिविका पद्धतीची निष्पती होय. वेगवेगळ्या परिवर्तनाच्या रचना व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर डोळ्यांपुढे ठेवलेले ध्येय किंवा उद्दिष्ट म्हणजेच 'उपजीविका साध्य' प्रत्यक्षात दिसते. यामध्ये उत्पन्नातील वाढ, अन्न सुरक्षा, विविध समस्या कमी होणे आणि त्यांची व्याप्ती व तीव्रता कमी होणे, एकूणच आर्थिक व सामाजिक सुस्थिती येणे इत्यादी गोष्टींचा समावेश होतो.

# उपजीविकांचे वर्गीकरण
## अर्थात
## पैशांची शिडी




**उपजीविकेचे** अनेक मार्ग व प्रकार प्रचलित आहेत. सर्वसामान्यपणे उपलब्ध असलेली नैसर्गिक संसाधने व कौशल्य यावर आधारित उपजीविकेचे प्रकार प्रामुख्याने आपल्या भागामध्ये आढळतात. त्याशिवाय माणसाच्या बदलत्या गरजा लक्षात घेता अनेक नवनवीन वाटा निर्माण होत आहेत. उपजीविकांचे खालील वर्गीकरण किंवा विविध प्रकार पाहिल्यानंतर लक्षात येईल की ही सगळी 'पैशांची शिडी' आहे.

### १) शेती आधारित उपजीविका

भारत हा कृषिप्रधान देश असल्याने फार पूर्वीपासून भारतीय जनता ही शेती या नैसर्गिक संसाधनावर आधारित अनेक उपक्रम



पारंपरिक पद्धतीने उपजीविकेच्या विकासासाठी करीत आहे. आजच्या युगात कमी होत जाणारी शेतजमीन व तिची तुलनेने कमी उत्पादकता लक्षात घेता आधुनिक तंत्रज्ञान, नवीन पिके व लागवड पद्धती विकसित होत आहेत. जेणेकरून वाढत्या लोकसंख्येच्या गरजांची पूर्तता करता येईल.

आपली शेती अधिक फायदेशीर करण्यासाठी फुलशेती, फळशेती, सेंद्रिय शेती, कंपोस्टिंग, गांडूळखत निर्मिती, बीज उत्पादन, बांधावर वृक्ष लागवड, औषधी आणि सुगंधी फुलांची लागवड, रेशीम उत्पादन अशा प्रकारे पीक रचनेत बदल आणि मातीचे आरोग्य सुधारण्यासाठीचे प्रयत्न या गोष्टींचा शेती आधारित उपजीविकेमध्ये समावेश केला जाऊ शकतो.

### २) बिगरशेती आधारित उपजीविका

बिगरशेती आधारित उपजीविका उपक्रम नावाप्रमाणे शेतीवर आधारित नसलेला असतो. यात प्रामुख्याने साधन निर्मिती व निर्मित साधनांची देखभाल यासारख्या बाबींचा समावेश होतो. बऱ्याचदा अशा प्रकारच्या उपक्रमांमध्ये किंवा उद्योगांमध्ये प्रशिक्षण अथवा कौशल्याची गरज भासते. यासाठी अनेक शासकीय व अशासकीय प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत.

बिगरशेती आधारित उपजीविकेची अनेक साधने आहेत. परंतु त्याचा फारसा गांभीर्याने विचार केला गेला नाही. खेड्यामध्ये विद्युत मोटारी जळण्याचे प्रमाण वाढलेले आहे. तेव्हा मोटार रिवायंडिंग, सुतारकाम, मोबाईल दुरुस्ती, घायपाताचे दोरखंड बनविणे, रोपवाटिका अशा अनेक प्रकारची कामे बिगरशेती उपजीविका कार्यक्रमांतून घेता येतात.

### ३) सेवा आधारित उपजीविका :

सदरील उपजीविकेची साधने आपल्या गावांमध्ये व शहरांमध्ये पूर्वीपासूनच अस्तित्वात होती. पूर्वी प्रामुख्याने शेतीसाठी लागणाऱ्या सेवा व सुविधा यावर आधारित

उपजीविका निर्मिती होत होती. बदलत्या काळात यात शेतीला धरूनच अनेक सेवा व्यवसाय वृद्धिंगत होत आहेत व आजमितीस सेवा व्यवसाय हा देशाच्या एकूण उत्पन्न वाढीमध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका वठवत आहे.

खेड्यांमध्ये आता शहरांसारख्या अनेक सेवासुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. खत, बी-बियाणे, कीटकनाशके यांच्या दुकानांपासून या शेतातून त्या शेतात पाणी व्यवस्थापन करण्यासाठी रेनगन असे अनेक सेवा आधारित उद्योग घेता येतात. खेड्यामध्ये मोबाईल दुरुस्तीपासून रसपानगृह, धाबा, फिरते रेस्टॉरंट, हेअर कटिंग सलून, ब्युटी पार्लर, कोचिंग क्लास, इंजिन-पंप दुरुस्ती, भांडी आणि मंडप, फोटोग्राफी, स्कूटर आणि मोटारसायकल दुरुस्ती, ड्रायक्लिनिंग, रेफ्रिजरेटर, शिवणयंत्रे आदी अनेक उपक्रम साधारण गावापासून मोठ्या गावापर्यंत वाढलेले दिसतात.

## ४) पशुसंवर्धनाधारित उपजीविका

शेतकऱ्याने शेतीला जोडून अनेक उपजीविकेची साधने निर्माण केलेली आहेत. याला आपण सामान्यपणे जोडधंदा या नावाने संबोधतो. दुग्ध उत्पादन, शेळी, मेंढीपालन, कुक्कुटपालन अशा प्रकारच्या पारंपरिक जोडधंद्यामध्ये अलीकडे नवीन भर पडत आहे व त्यास तंत्रज्ञानाची जोड देण्यात येत आहे.

उपजीविकेचे हे हमखास महत्त्वाचे साधन आहे. पण दुर्दैवाने त्याची मराठवाडा आणि विदर्भ या भागात फारशी वाढ झाली नाही. दूग्ध, कुक्कुटपालन, शेळी-मेंढी पालन, वराह पालन, ससेपालन असे अनेक उद्योग सुरू करता येतात. अलीकडच्या काळात ससेपालनाला अर्थसाहाय्य देण्यापासून ते ससे विकत घेण्यापर्यंत काही कंपन्या पुढे आल्या आहेत. इमूपालन हा व्यवसायसुद्धा काही शेतकरी मोठ्या अभिमानाने हातात घेतात. तथापि, पशुवैद्यकीय सेवांचा अभाव आणि पशुखाद्यांचा तुटवडा असे काही महत्त्वाचे प्रश्न आहेत. याबद्दल ग्रामस्तरावरील लोकांना प्रशिक्षण दिले गेले तर पशुसंवर्धनातून उपजीविका या व्यवसायाला चांगले दिवस येतील.



## ५) प्रक्रिया उद्योगावर आधारित उपजीविका

स्थानिक स्तरावर प्राथमिक प्रक्रिया व विक्री हे अपेक्षित आहे. यामध्ये पारंपरिक ज्ञानात व पद्धतीत आधुनिक तंत्रज्ञानाची भर पडत आहे. निव्वळ प्रतवारी व पॅकेजिंग यामुळेसुद्धा शेतमालाचे मूल्यवर्धन होते व शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ होते.

उपजीविकेसाठी खेड्यातील माणसाने मोठा उद्योग उभा करावा किंवा कारखाना काढावा असे कधीच अपेक्षित नसते. परंतु हळद असेलतर हळदीवर प्रक्रिया केल्याने त्याची किंमत वाढते. तूर असेल तर चांगली छोटीशी दालमिल हाती घेतली आणि डाळ विकली तर त्याच्यामध्ये शेतकऱ्यांना मोठा फायदा होऊ शकतो. एरवी भाज्यांचे भाव उतरले तर ते जनावराला खाऊ घालण्याशिवाय शेतकऱ्यापुढे उपाय राहत नाही. परंतु अवघ्या ६० हजार रुपयांमध्ये निर्जलीकरणाची म्हणजे डिहायड्रेशनची मशीन घेतली तर त्यातून मोठा फायदा मिळविता येतो. विशेषतः अद्रक, लसूण, भोपळा, कारले यावर ही प्रक्रिया केली तर त्याला चांगली मागणी आहे.

## ६) पारंपरिक कौशल्यांवर आधारित उपजीविका

खेड्यातील महिलांकडे त्यांचे पारंपरिक असे मोठे कौशल्य आहे. वाढत्या शहरीकरणामध्ये या पारंपरिक कौशल्याला चांगली बाजारपेठ आहे. खेड्यांमधील बाई ज्या मेहनतीने चिकापासून कुरडई बनवते किंवा खारवड्या घालते याची ग्रामीण चव न्यारी आहे. पण केवळ पाहुण्यारावळ्यांना वानवळा देण्यापलीकडे या कौशल्याचा वापर केला गेला नाही. दिलासा महिला गृह उद्योगाने अशा प्रकारच्या इथेनिक किंवा पारंपरिक कौशल्याला



बाजारपेठ मिळवून देण्याचा मोठा प्रयत्न केला आणि त्यातून उपजीविकांसाठी एक मोठी संधी आहे हे लक्षात आले.

### ७) व्यापाराधारित उपजीविका

खेड्यामध्ये लहान-मोठ्या व्यापाराला चांगला वाव आहे. शहरांमधील पेप्सीचा प्रॉडक्ट खेड्यात चालत नसेलपण कोहिनूर नावाचे शीतपेय जोरात चालते. गोळ्या-बिस्किटांच्या दुकानापासून कटलरी, पापड उद्योग, खत बी-बियाणे विक्री, स्टेशनरी विक्री, बांगडीचे दुकान, जवळच्या बाजारात भाजीपाला विकणे, मसाला पापड, लोणची विक्री, वर्तमानपत्रांची एजन्सी, रेशन दुकान, रॉकेलविक्री, खास मिठाई बनवून त्यांची विक्री,



अशा व्यापाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. मराठवाड्यामध्ये कुंथलगिरीचा पेढा, जळकोटवाडीची चटणी आणि मस्साजोगचे पोहे ही व्यापाराधारित उपजीविकेची चांगली उदाहरणे आहेत.



### ८) नावीन्यपूर्ण उपजीविका प्रयोग

याशिवाय प्रत्येक गाव त्या गावामध्ये असलेल्या सुविधांवर आधारित अनेक नावीन्यपूर्ण प्रयोग हाती घेऊ शकते. म्हणजे ज्या भागात चांगली सीताफळे असतात ती रस्त्यावर टोपल्याने विकण्यापेक्षा त्याला चांगले पॅकिंग देणे, ज्या भागात पळस जास्त फुलतो त्यापासून रंग करणे, शेडनेटमध्ये अवघ्या दहा गुंठ्यांत सामूहिक पद्धतीने शेती करून त्याची जोड एका मार्केटिंग नेटवर्कला देणे असे अनेक प्रयोग हाती घेता येतात. मुळामध्ये मार्केटिंगशी जोड हा उपजीविकेच्या कार्यक्रमातला मोठा अडसर आहे आणि यासाठी ठिकठिकाणी नावीन्यपूर्ण प्रयोग चालू आहेत. त्याचा गोषवारा व यशोगाथा लोकांच्या समोर मांडणे गरजेचे आहे.

या सर्व प्रकारच्या उपजीविकेच्या साधनांचा आपण अधिक तपशिलाने विचार करूया.

# उपजीविकेच्या साधनांकडून साध्याकडे
## अर्थात
## सुगीच्या वाटा

### १) शेती आधारित उपजिविका

शेतीच्या सध्याच्या दुष्टचक्रातून मुक्तता करण्यासाठीच उपजीविकेच्या वेगवेगळ्या साधनांची गरज आहे. केवळ शेतीच्या उत्पादनावर कुटुंब चालू शकत नाही. जर त्याला उपजीविकेच्या साधनांची जोड दिली गेली तरच शेतकऱ्यांचे जिणे सुसह्य होऊ शकते. शासनाचे धोरण, पाण्याचा बेसुमार उपसा, या उपशामुळे जमिनीच्या सुपीकतेचा होणारा ऱ्हास आणि अमर्याद रासायनिक खतांच्या वापरामुळे मातीचे बिघडलेले आरोग्य याची परिणती म्हणून दर एकरी उत्पादनात घट, बाजारपेठेचा अभाव, अपुरा पतपुरवठा या सगळ्या दृष्टचक्रात शेतकरी सापडला आहे. त्यामुळे उपजीविकेसाठी वेगळी पीक रचना हाती घेणे हे गरजेचे आहे.

**आवळा, बोर, डाळिंब, काजू**

आपल्याकडे नॅशनल हॉर्टिकल्चर मिशनची स्थापना झाली. पण त्याची फळे सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. फळांची झाडे वाढविणे हे उपजीविकेचे हमखास उत्पन्नाचे साधन आहे. त्यातील अगदी दुष्काळी भागापासून प्रत्येक ठिकाणी टिकाव धरणारे फळझाड म्हणजे आवळा. अत्यंत हलक्या जमिनीपासून भारी जमिनीपर्यंत कोठेही आवळ्याचे उत्पादन होऊ शकते. शिवाय त्यामध्ये आंतरपीक घेता येऊ शकते. याशिवाय आवळ्यापासून कॅन्डी, मुरब्बा, लोणचं, सुपारी अशी अनेक उत्पादने घेता येतात. आवळ्याच्या प्रत्येक मोठ्या झाडापासून दरवर्षी ७५ ते १०० कि.ग्रॅ. उत्पन्न मिळते. बागायतीची सोय असेलतर हेच उत्पादन २०० कि.ग्रॅ.पर्यंत जाऊ शकते. दहा बाय दहा मीटर या प्रमाणे शंभर झाडांची संख्या घेऊन एका हेक्टरमध्ये जमीन तयार करण्यापासून सरासरी ६३ हजार रुपये खर्च येतो.



गुजरातमध्ये बायफने वाडी प्रकल्पाअंतर्गत उपजीविकेच्या साधनांमध्ये फळझाड लागवडीपासून त्याच्या उत्पादनापर्यंत सर्व काळजी घेतली आहे. अवर्षण प्रवण भागामध्ये बोर हे सुद्धा एक महत्त्वाचे फळझाड आहे. पण बोरीच्या झाडांची लागवड फारशा गांभीर्याने केली जात नाही. बडिंग केलेल्या बोरीसाठी ५.५ बाय ५.५ मीटर अंतर ठेवून ६० बाय ६० बाय ६० सें.मी. आकाराचे खड्डे लागवडीपूर्वी एक महिना अगोदर खणून चांगले तापवून घ्यावेत. आणि त्यानंतर त्याच्यावर वाळवीचा प्रतिबंध होऊ नये म्हणून बीएक्ससी पावडर व वीस किलो शेणखत मातीसह मिसळून टाकावे. बोरीच्या झाडामध्ये छाटणी पद्धतीला जास्त महत्त्व आहे. या बोरीची चांगली काढणी केली तर कोरडवाहू भागात ऐंशी किलोग्रॅम प्रतिझाड किमान उत्पन्न येते आणि सरासरी उत्पन्न दीडशे किलोग्रॅम प्रतिझाड राहिलेले आहे. पण बोरीच्या झाडाकडे फारसे गांभीर्याने पाहिले गेले नाही. प्रतीएकरी ३६ हजार रुपये खर्च येत असून बँकेतून सुद्धा शेतकऱ्याने पंधरा टक्के स्वगुंतवणूक केली तरी कर्ज मिळू शकते. अलीकडच्या काळात डाळिंबाची लागवड मोठ्या प्रमाणावर वाढलेली दिसते. मराठवाड्यात अनेक ठिकाणी मोसंबीला पर्याय म्हणून डाळिंब लागवड झालेली आहे. गणेश ढोलका, जोदकर लोकल, भगवा सीडलेस हे डाळिंबाचे मुख्य वाण असून ठिबक सिंचनाची जोड डाळिंबाला दिली तर जोरदार उत्पन्नाची अक्षरशः हमी आहे. गणेश या वाणामध्ये दाट लागवडीने एका हेक्टरात एक हजार झाडे बसतात आणि प्रत्येक झाडाला पन्नास चांगली फळे मिळतात. डाळिंब बाग तीस वर्षांपर्यंत उत्पन्न देऊ शकते. कोकणासारख्या भागामध्ये काजूची लागवडही महत्त्वाची ठरू शकते. वेंगुर्ले १, ४, ६,७,८ या जातीचे उत्पादन चांगले येत असले तरी अलीकडच्या काळात पीक संरक्षण ही महत्त्वाची बाब बनली आहे. काजूच्या बोंडांपासून पेय तयार करणे काजू स्क्वॅश, काजूच्या बोंडांपासून सिरप, काजूचा जॅम एवढेच नव्हे तर काजूच्या टरफलांपासून तेल अशी अनेक जोड उत्पादने मिळू शकतात.

**गवती चहा, सफेद मुसळी आणि पुदिना लागवड**

अलीकडे गवती चहा वापरण्याचे प्रमाण वाढले असून या पिकास जास्त पाऊस लागतो. तो पाऊस एकदम पडणारा नसावा आणि निचरा होणारी जमीन या पिकासाठी आवश्यक

असते. गवती चहाची लागवड बियांपासून किंवा गवती चहाच्या फुटव्यापासून होते. बियांपासून करावयाची असल्यास हेक्टरी २.५ किलो बियाणे लागतात. गवती चहापासून उर्ध्वपातन पद्धतीने तेल काढले जाऊ शकते. गवती तेलाचा बाजारभाव सध्या पाचशे रुपये किलो असून गवती चहाची पावडर मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. सफेद मुसळीचे झाड पारंपरिकरीत्या औषधी झाड असून त्याच्या मुळाचा वापर औषधामध्ये केला जातो. याच पद्धतीने कोरफड, मोगली एरंड अशा अनेक औषधी वनस्पती करता येऊ शकतात. अनेक शक्तिवर्धक आयुर्वेदिक औषधी तयार करण्यास या वनस्पतीच्या मुळांना खूप चांगली मागणी आहे. वस्तुतः मोठ्या प्रमाणावर मागणी असूनही या औषधी वनस्पती घेतल्या जात नाहीत. पुदिना या पिकाची लागवड सुगंधी तेल आणि तेलापासून तयार केलेल्या थंडाईसाठी सुद्धा वापरला जातो. अनेक प्रकारचे मिंट यापासून तयार केले जातात. पानमसाले, तंबाखू, दंतमंजन, टूथपेस्ट, पेनबाम यामध्ये मुक्तपणे वापर केला जातो. अगदी लिंबोळ्या गोळा करणे हेसुद्धा उपजीविकेचे एक परिणामकारक साधन आहे. अनेक व्यापारी उन्हाळ्याच्या दिवसात लिंबोळ्यांना चढा भाव देतात पण दुर्दैवाने याकडे उपजीविकेचे एक महत्त्वाचे साधन म्हणून पाहिले जात नाही.

**हरितगृह आणि शेडनेट**

उद्यानविद्या क्षेत्रामध्ये महाराष्ट्र अग्रेसर असून पारंपरिक लागवडीतून उच्चतंत्रज्ञानावर आधारित व्यावसायिकतेकडे नवीन पिढीला नेण्यासाठी शेडनेट हे चांगले माध्यम आहे. दहा गुंठ्याच्या शेडनेटसाठी प्रथम तालुका कृषी अधिकाऱ्याकडे नाव नोंदविले जाते. कृषी विभागाच्या सर्व प्रक्रियांचा काटेकोरपणे अवलंब केला तर १ लाख ३२ हजारांचे अनुदान मिळू शकते आणि एका शेडनेटसाठी पावणेतीन लाखांचा खर्च होतो. अलीकडच्या काळात बँका हरितगृहाला कर्ज देण्यास उत्सुक आहेत. तथापि, दिलासासारख्या काही संस्थांनी अनेक शेडनेट एकत्रित उभा करून त्यातून ढोबळी मिरचीचे उत्पादन घेतले आणि या सर्व शेतकऱ्यांनी एकत्रितपणे बाजारपेठ शोधण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना चांगले यश आले. हरितगृहामध्ये गुलाबाची लागवड केली तर उत्पादन वेगळ्या पद्धतीने वाढू शकते.



## २) बिगर शेती आधारित उपजीविका

पाणलोटाच्या या कार्यक्रमामध्ये ज्यांच्याकडे शेती नाही अशा भूमिहीन मंडळींना सुद्धा बिगर शेती आधारित उपजिविकेची साधने निर्माण केली जावीत असे अपेक्षित आहे. जैविक कीटकनाशकाचा कारखाना सुरू करता येऊ शकतो. एकात्मिक कीड नियंत्रणामध्ये जैविक कीटकनाशकाचा वापर हा परिणामकारक रित्या करणे गरजेचे आहे. मागील दशकापासून जैविक कीटकनाशकांची मागणी जबरदस्त वाढत आहे. त्यामुळे ट्रायकोड्रमा, ग्लिओक्लॉडियम, पिसीलोम्यूसिस, सिडोमोनास, ट्रायकोग्रमा, एनपीव्ही आणि बॅसिलस या सूक्ष्म जिवांची निर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ लागली. या जीवांचा उपयोग किडी व रोग नियंत्रित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. अलीकडच्या काळामध्ये जैविक कीटकनाशके ही काळाची गरज बनली असून त्याला चांगली मागणी आहे. रासायनिक कीटकनाशकांचा अवाजवी वापर थांबविण्यासाठी हा उपक्रम हाती घेणे गरजेचे आहे. याशिवाय नॅडेफ कंपोस्ट खत, जैविक खतांचे उत्पादन अशी वेगळी उपजीविकेची साधने धुंडाळता येतात. रायझोबीअर, अ‍ॅझोटो बॅकलर, असोफिलिरियम अशी अनेक जैविक खत निर्माण करण्यासाठी शासनाच्या वतीने मदत केली जाते. याच्यासाठी थोडीशी महागडी यंत्रसामुग्री लागली तरी एक शाश्वत उद्योग म्हणून त्याला उभारता येते. या शिवाय रोपवाटिकेचा उद्योगसुद्धा चांगला आहे. पाणलोटामध्येच सलग समतल चर घेतल्यानंतर मोठ्या प्रमाणावर रोपांची मागणी असते. एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमाअंतर्गत बऱ्याच ठिकाणी रोपांची गरज पडणार आहे. ही गरज लक्षात घेऊन रोपवाटिकांचे सुविहित नियोजन केले गेले तर वेगवेगळ्या मोठ्या संधींचे दालन उभे राहू शकते. गांडूळ शेतीला सुद्धा शेतीशी जोडता येते. बिगर शेतीतून मोटार रिवायंडिंग हे चांगले उपजीविकेचे साधन उभे राहिले आहे. अलीकडच्या काळात विजेची अनियमितता लक्षात घेता मोटारी जळण्याचे प्रमाण वाढले असून याचे प्रशिक्षण चांगले देण्यात आले तर मोटार रिवायंडिंगसारखा चांगला उद्योग नाही. याशिवाय क्रशर, कडबा कुटी, कॉटन पिकिंग मशिन हे देखील चांगले उपजीविकेचे साधन बनू शकते.

अलीकडच्या काळात कापूस वेचणे महागडे झाल्यामुळे चिनी बनावटीच्या नऊ-दहा हजार रुपयांच्या, बॅटरीवर चालणाऱ्या कॉटन पिकिंग मशीनपासून चांगले उत्पादन घेता येऊ शकते.

**३) सेवा आधारित उपजीविका -**

खेड्यांचे सुद्धा अलीकडच्या काळात बऱ्याच मोठ्या प्रमाणावर शहरीकरण झाले आहे. शिवारामध्ये एक तरी ढाबा असतो. संगणकाचे वर्ग लावण्याची ग्रामीण मुलांची अदम्य इच्छा असते. गवंडी कामालासुद्धा खूप प्राधान्य दिले जाते. अनेक चांगले गवंडी खेड्यातून तयार होऊनच शहरांकडे धाव घेतात. गावातील लोकांना खते, बी-बियाणे आणि कीटकनाशके यांची मोठी गरज असते. बी-बियाणांच्या कंपन्यांपासून सर्वांचे जाळे खेड्यापर्यंत पोहोचले आहे. शिवाय खत आणि बी-बियाणांचे पैसे लोक रोखीने देतात. त्यामुळे प्रामाणिकपणे भांडवल खेळविले तर त्याचे दुकान चांगले चालू शकते. गाव तेथे एस.टी. ही नुसती घोषणा राहिली असून आता प्रत्येक गावाला किमान तीन, चार प्रवासी वाहतूक करणारी वाहने लागतात. ही खासगी प्रवासी वाहतूक हे सुद्धा खेड्यातील उपजीविकेचे एक महत्त्वाचे साधन बनले आहे.

गावातील लग्न आणि इतर समारंभांसाठी भांडी, मंडप आणि इतर गोष्टी भाड्याने देण्याचा उद्योगसुद्धा चांगला चालू शकतो. पाणलोटाच्या भागामध्ये आपण मृदसंधारणाचे काम करतो त्यामुळे या भागामध्ये विटा बनविण्याच्या उद्योगाला प्राधान्य दिले जाऊ नये. कारण त्यामुळे गावाची बरीच मोठी सुपीक माती विटांसाठी वापरली जाते. पण पूर्वीची बलुतेदारी म्हणजे एक सेवा उद्योगच होता. यापैकी सुतार, लोहार, कुंभार, चांभार, न्हावी ही मंडळी अजूनही ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये टिकून आहेत. या बलुतेदारांना या कार्यक्रमातून प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

**४) पशुसंवर्धनाधारित उपजीविकेचे साधन**

पशुपालन हे शेतकऱ्याच्या उपजीविकेचे हमखास साधन आहे. परंतु दुर्दैवाने ज्या गांभिर्याने त्याकडे पाहायला पाहिजे होते तितके पाहिले गेले नाही. भाकड गाईऐवजी संकरित गाई लोकांनी पाळल्या तरच खऱ्या अर्थाने चराई बंदी होऊ शकते. चारा आणि



इतर गोष्टी पाणलोटातून मिळत असतात. अनेक ठिकाणी डेअरीची व्यवस्था आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भ हे दोन्ही भाग दुग्ध उत्पादनामध्ये मागे आहेत. दुधापासून पनीर, खवा आणि इतर अनेक पदार्थांची निर्मिती केली जाते. पाणलोटातून उभा राहिलेल्या अनेक आदर्श डेअरी आहेत. ज्या गावाला डेअरीची व्यवस्था नाही त्या ठिकाणच्या लोकांनी खवा निर्मितीकडे लक्ष पुरविले. तथापि, या प्रश्नांकडे दारिद्र्य निर्मूलनाची सवलतीची योजना असे न पाहता आपल्याला उत्पादन देणारे चांगले साधन आहे असे पाहिले गेले तर किमान दोन गाईंमध्ये शेतकऱ्याला चांगले उत्पादन मिळू शकते. दुग्ध सरिता या योजनेतून गायीचा चांगला गोठा, फ्रीज, फॅन इतर सर्व गोष्टींसाठी कर्ज मिळण्याची व्यवस्था आहे. ब्रॉयलर कोंबडीपालन हे सुद्धा एक चांगले उपजीविकेचे साधन आहे. ब्रॉयलर पक्ष्यांची मागणी सतत वाढत असून शेतकरी जर लहान सहान गोष्टींची काळजी घेणारा असेल तरच कोंबडी पालन टिकू शकते. तथापि, मराठवाड्यासारख्या अवर्षणप्रवण भागामध्ये उस्मानाबादी शेळीचे पालन अत्यंत व्यावसायिक पद्धतीने केले जाऊ शकते. स्टॉलफिडिंग म्हणजे एकाच जागी शेळी पालन केले तर त्याचे उत्पादन वाढते. गरीब घराला जर हमखास उत्पन्न मिळवून द्यायचे असेल तर शेळीपालन हा एक चांगला व्यवसाय आहे. उस्मानाबादी पन्नास शेळ्या आणि दोन बोकड हा एक प्रकल्प गृहीत धरण्यात आला असून त्याला बँकेकडून पावणे दोन लाखांचे कर्ज वाटप होऊ शकते.

व्यावसायिक वराह पालनसुद्धा मोठ्या गावांमध्ये घेता येऊ शकते. पण त्याच्या शास्त्रीय पद्धतीने एकत्रित डुकरांचे शेड उभे करून त्यांचे व्यवस्थापन करण्याची मानसिकता आपल्याकडे नाही. गावाजवळ असलेल्या मोठ्या तलावात कोळंबी शेती, मत्स्य शेती केली जाऊ शकते. मत्स्य विभागाकडे जर संपर्क साधला तर मत्स्य बीज उपलब्ध करण्यात येते. तथापि, पशुसंवर्धनामध्ये गेल्या दोन वर्षांपासून ससेपालन आणि इमू पालनाला फार महत्त्व आले आहे. नाशिकची एक कंपनी सशांचा पुरवठा करण्यापासून त्याच्यासाठी निवारा उभा करण्यापर्यंत काळजी घेते. वेळोवेळी आरोग्यसेवाही पुरविते आणि पुन्हा ससे विकत घेण्याची हमी देते.

## ५) प्रक्रिया उद्योगांवर आधारित उपजीविका

खेड्यातील शेतमालांवर त्याच ठिकाणी प्रक्रिया झाली पाहिजे ही ग्रामस्वराज्याची संकल्पना महात्मा गांधींनी मांडली. त्यामुळेच त्यांनी खेड्याच्या पातळीवर सूतकताई सुरू केली. वस्तुतः प्रक्रिया उद्योग उभा करणे ही काळाची गरज आहे. जर प्रक्रिया उद्योग परिणामकारक उभे राहिले नाहीत तर क्रमाक्रमाने आपली शेती कमी होईल. या घडीला लोकसंख्येच्या नैसर्गिक वाढीप्रमाणे जमिनीच्या वाटण्या होतात आणि प्रत्येकाला अगदी गुंठ्याने जमीन राहते. जमिनीची वाढ मात्र होण्याची शक्यता नाही. उलट गावठाणापासून रस्ते, तलावापर्यंत लागणाऱ्या सर्वसामान्य सुविधांसाठी जमिनीचे प्रमाण वाढत गेल्याने प्रक्रिया उद्योगांशिवाय दुसरा पर्याय नाही.

महाराष्ट्रामध्ये चांगली कृषी विद्यापीठे आहेत पण या कृषी विद्यापीठाने आपले तंत्रज्ञान या खेड्यापर्यंत फारसे पोहोचविले नाही. वानगीदाखल सांगायचे झाले तर कृषी विद्यापीठाने संशोधन केलेले तूर डाळ मशीन परिणामकारक आहे. पण प्रत्यक्षामध्ये खेड्याखेड्यांत हे डाळीचे मशीन पोहोचले असते तर डाळीची टंचाईही भासली नसती आणि शासनाला डाळवर्गीय पीक वाढविण्याची योजना हाती घ्यावी लागली नसती. ज्या भागात चांगला मका पिकतो त्या ठिकाणी तर अनेक प्रक्रिया उद्योग हाती घेता येतात. काही नसले तरी किमान चांगले पशुखाद्य तरी निर्माण करता येते. या ठिकाणी प्रक्रिया उद्योग म्हणजे मोठी कंपनी काढणे, किंवा त्याला वेगळा ब्रॅण्ड मिळवून देणे अपेक्षित नाही. तर जो शेतमाल मिळतो त्याचे मूल्यवर्धन कसे करता येईल या प्रश्नाचे उत्तर केवळ अशा प्रकारच्या इंटरमिजिएट प्रोसेसिंग युनिटमधूनच देता येऊ शकते.

खवा, पनीर बनविण्याच्या मशिनपासून डिहायड्रेशन मशिनपर्यंत प्रत्येक गोष्ट आपल्याला प्रक्रियेपर्यंत नेता येते. कृषी तंत्रज्ञानाच्या संदर्भात भारतामध्ये भोपाळची संस्था अग्रगण्य आहे. या आणि इतर संस्थांनी विकसित केलेल्या अनेक यंत्रांची माहिती खेड्यापर्यंत पोचली नाही, या कार्यक्रमाच्या माध्यमातून ही माहिती पोचणे अपेक्षित आहे.



## ६) पारंपरिक कौशल्य आधारित उपजीविका

प्रत्येक गावाचे निसर्गाने नैसर्गिक साधनसंपत्तीचे वेगळेपण करून जसे ठेवले आहे तसे खेड्यातील निरक्षर माणूस का असेना पण त्याच्याकडे निसर्गदत्त असे वेगळे कौशल्य त्याला प्राप्त झाले आहे. खेड्यातील लोणची शहराच्या मोठ्या कंपन्यांच्या लोणच्यापेक्षा वेगळ्या चवीची असतात. मडक्यातील खाराची चव एकदा शहराच्या माणसाने घेतली तर तो पुन्हा शहरी लोणच्याच्या भानगडीत पडणार नाही. सिल्लोड तालुक्यातील महिलांनी वेगळा असा पोंगा पापड काढला आहे. हा पापड अक्षरशः पोंग्यासारखा फुगतो. कुरडया करण्याचे कौशल्य मोठ्या यंत्रांना कधीच प्राप्त होणार नाही. यांत्रिकीकरणाच्या पलीकडे जाऊन लोकांनी हे कौशल्य गेल्या अनेक पिढ्यांच्या ग्रामीण चवीतून निर्माण केले आहे. पण त्याला कधीही आपण उपजीविकेचे साधन बनवावे हा विचार त्यांच्या मनाला भावला नाही. पण वाढते शहरीकरण लक्षात घेता अशा प्रकारच्या पारंपरिक कौशल्याला चांगली मागणी आहे. शेवटी शहरामध्ये राहण्यासाठी आलेला माणूस हा मूळचा खेड्यातलाच असतो. त्यालाही कधी तरी खारोडी, कुरडई खावाशी वाटते. मग या कौशल्याला उपजीविकेच्या साधनांमध्ये बदलले तर त्यात गैर काय आहे, हा विचार महिला बचत गटांना पटविणे आवश्यक आहे. लिज्जत पापडाचे एक उदाहरण नेहमी नेहमी दिले जाते पण एकाच जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या अफलातून चवीचे अनेक पापड मिळू शकतात. अशा प्रकारचे पारंपरिक उद्योग महाराष्ट्राच्या अनेक ठिकाणी उभे राहिलेले दिसतात. शेवटी या पारंपरिक उद्यमशीलतेला प्रोत्साहन दिले तरच त्यातूच एखादा नवीन मोठा उद्योग आकाराला येऊ शकतो.

## ७) व्यापाराधारित उपजीविका

ग्रामीण पातळीवर छोटामोठा व्यापार उद्योग उभा करणे ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांचे स्वरूप व व्याप्ती छोटी असली तरी देशभरातील त्यांची संख्या प्रचंड आहे. या दृष्टीने व्यापारावरील आधारित उपजीविकांचे महत्त्व व गरज वैशिष्ट्यपूर्ण आहे. खेड्यामध्ये किंवा शिवारात गोळ्याबिस्किटांचे दुकान, कापडाचे दुकान, कटलरीचा

व्यवसाय, रॉकेल विक्री, पुस्तके, स्टेशनरी आणि वर्तमानपत्रांची विक्री, बांगडीचे दुकान, मोठ्या देवालयाच्या समोर फुले, हार आणि नारळाची विक्री, भाजीपाला विक्री, तयार पादत्राणांची विक्री, तयार कपड्याची विक्री, मिठाईचे दुकान, रद्दी आणि भंगारची खरेदी-विक्री, लोखंडी आणि लाकडी फर्निचर अशी अनेकविध व्यापारी पद्धतीची उपजीविकेची साधने हाती घेता येतात. जागतिकीकरणानंतर खेडे हे बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी व्यापाराचे मोठे दालन झाले आहे. मोटारसायकलपासून मोबाईलपर्यंत अनेक गोष्टी विकण्याचे ते एक मार्केट झाले. पण या बदलत्या व्यापाराचा ग्रामीण भागातील मंडळींना फारसा फायदा झाला नाही. ग्रामीण भागातील गरजा बदलल्या पण व्यापार मात्र ग्रामीण भागातील मंडळींच्या हातात राहिला नाही.

खेड्यातील माणसाने केवळ किराणा दुकान चालवावे एवढीच मर्यादित धारणा अजूनही कायम आहे. वस्तुतः बचतीचे प्रमाण खेड्यामध्ये जास्त असते. पैसाही खेड्यामध्ये आहे पण त्याचे चांगले व्यापारामध्ये रूपांतर करण्यात आले नाही. केवळ आठवडी बाजाराच्या भुसार मालाची विक्री या पलीकडे काही घडले नाही. बी-बियाणांपासून खतापर्यंत सर्व व्यापार अजूनही शहरी मंडळींच्या हातात आहे. जर खेड्यातील मंडळींनी स्वतःच्या उत्पादक संस्था निर्माण करून हा व्यापार आपल्या गावाकडे खेचून आणला तर सर्वसामान्य शेतकऱ्याचा तर फायदा होईलच पण खतापासून बी-बियाणांपर्यंत असलेल्या सर्व इनपूटमध्ये होणारे दलालीकरण थांबविता येईल. यासाठी व्यापार म्हणजे मोठी जोखीम आहे असे समजता कामा नये. मुळामध्ये खेड्यातील मंडळींना अशा प्रकारचा व्यापार करण्यासाठी खेळते भांडवल उपलब्ध करून देण्याची बँकेची फारशी परिणामकारक व्यवस्था नाही. त्या तुलनेत शहरी मंडळींना खेळत्या भांडवलापासून बँकेच्या कर्जापर्यंत सर्व गोष्टींची सुविधा सहजपणे होते. खेड्यामध्ये राहतो तो केवळ शेतकरी असा आपला पक्का समज असल्यामुळे त्या त्या खेड्यांच्या रहाळामध्ये व्यापारउदीम वाढला नाही. आणि सावकारी मात्र पोसली गेली. त्यासाठी सहेतूक प्रयत्न करण्याची गरज आहे.



## ८) नावीन्यपूर्ण उपजीविकेची साधने

या सगळ्या वर्गीकरणाच्या पलीकडे जाऊन प्रत्येक गाव आणि पाणलोट हा वेगळा असतो, त्याची संरचना वेगळी असते. त्यामुळे त्यातून एखादा नवीन चांगला उद्योग जन्माला येऊ शकतो. म्हणजे ज्या अजिंठ्याच्या डोंगरामध्ये पळसाची लालजर्द चादर डोंगराला पांघरली असे वाटते त्यातून वेगळी रंग निर्मिती घडू शकते. एवढे कशाला अगदी कवडीमोल किंमतीने विकली जाणारी करवंदे असो की सीताफळ यांना चांगले पॅकिंग दिले तर त्याची किंमत वाढू शकते. जशी काजूची चिक्की बनते त्यापेक्षा किती तरी पौष्टिक अशी गोडंबीची चिक्की बनू शकते. पाणलोट विकासातून कृषी पर्यटन उभे राहू शकते. त्या त्या पाणलोटातील तरुणाई ज्या वेगळेपणाने विचार करील आणि जवळचे शहर हे आपली बाजारपेठ समजून त्याच्याशी वेगळे नाते जोडण्याचा प्रयत्न करेल त्या त्या ठिकाणी नावीन्यपूर्ण उपजीविकेची साधने उभी राहू शकतात. शेवटी आपल्या भागाचे मार्केटिंग आपण कसे करतो यावर हे सगळे अवलंबून आहे.

नावीन्यपूर्ण उपजीविकेची निर्मिती बऱ्याच वेळा स्थानिक परिस्थितीतून होते आणि त्यातून एक उद्योग उभा राहतो. बीड जिल्ह्यातील मसाजोग या गावात एकाने जाड पोहे आणि चांगले शेंगदाणे वापरून पोहे केले. येणाऱ्या जाणाऱ्या बसेस अस्सल ग्रामीण पोहे खाण्यासाठी थांबू लागल्या. या घडीला मसाजोग म्हणजे जिल्ह्यातील महत्त्वाचे पोहे स्टेशन झाले आहे. या व्यवसायात अनेक जण उतरले पण पोह्याचे नावीन्य जपल्यामुळे सर्व जणच फायद्यात आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यातील कुंथलगिरीचा पेढा हा महाराष्ट्रातील तमाम मंदिरांचा प्रसाद झाला आहे. या पेढ्यांची रेसिपी नावीन्यपूर्ण आहे आणि इतर अनेक शहरी मंडळी किती तरी स्पर्धेत आले तरी कुंथलगिरीच्या पेढ्यांची गोडी अजूनही कायम आहे. त्याच जिल्ह्यातील जळकोटवाडी या गावाने शेंगदाण्याची वेगळी चटणी केली. प्रारंभी चटणी-भाकरी खाण्यासाठी या जळकोटला महत्त्व होते. पण आता जळकोटवाडीची चटणी स्वतःचे वेगळेपण जपून आहे. उपजीविकेच्या विविध प्रकारच्या साधनांचा मागोवा घेतल्यावर सहजच लक्षात येते की या सगळ्या 'सुगीच्या वाटा' आहेत.

# सब सेक्टर विश्लेषण पद्धती
## अर्थात
## सुगी आपल्या हाती

### सब सेक्टर विश्लेषण पद्धती

जगामध्ये उपजीविकेच्या संधीचा शोध घेताना अनेक प्रकारच्या पद्धती प्रचलित आहेत. पण या पद्धती मुख्यतः एखाद्या विशिष्ट उत्पादनाच्या अथवा सेवेच्या संबंधात मर्यादित आहेत. पण सब सेक्टर विश्लेषण मात्र उत्पादन, प्रक्रिया आणि सेवेच्या संबंध अंगांचे विश्लेषण करते. सब सेक्टर म्हणजे काय हे समजून घेण्यापूर्वी सेक्टर म्हणजे काय आणि ती कोणती हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

अर्थव्यवस्थेत मुख्यतः तीन सेक्टर मानले जातात.

१) शेती (Agricultural Sector) उदा. सर्व प्रकारच्या पिकांचे उत्पादन, शेती आधारित व्यवसाय, पशू पालन.

२) औद्योगिक (Industrial Sector) उदा. रासायनिक उद्योग, कपडा उद्योग

३) सेवा (Service Sector) उदा. हॉटेल,

या मुख्य सेक्टरच्या उपविभागांना सब सेक्टर संबोधता येईल.

### सब सेक्टर म्हणजे काय?

एखादी वस्तू तयार करण्यासाठी, किंवा एखादे उत्पादन घेण्यासाठी किंवा एखादी सेवा पुरविण्यासाठी गरजेच्या असणाऱ्या कृती साखळीला सब सेक्टर म्हणतात.

उदाहरणार्थ, बाजारामध्ये आपल्याला सोयापनीरचे पाकीट मिळते. पण सोयाबीनपासून सोयापनीर तयार करण्याच्या प्रक्रियेचा आणि कृती साखळीचा म्हणजेच सबसेक्टरचा पुढीलप्रमाणे अभ्यास महत्त्वाचा असतो.

१) सोयाबीन उत्पादनांसाठी आवश्यक असणाऱ्या विविध साधन सामुग्रीचा (बी, खत, पाणी, मजूर इत्यादी) विचार करावा लागतो.



२) उत्पादन झालेले सोयाबीन व्यापाऱ्यापर्यंत पोहचविले जाते आणि तिथून सोयावर आधारित प्रक्रिया उद्योगांना ते विकले जाते.

३) प्रक्रिया उद्योजक त्यावर प्रक्रिया करून तेल, दूध, पीठ, दही, पनीर इत्यादी वस्तू बनवतात.

४) या उत्पादनांना योग्य ते वेष्टन (पॅकेजिंग), लेबलिंग केले जाते.

५) नंतर तयार माल हा बाजारपेठेत विविध व्यापाऱ्यांच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहचविला जातो.

सोयापनीर हा व्यवसाय करावयाचा असल्यास वरील पाचही कृती साखळींचा अभ्यास / विश्लेषण गरजेचे ठरते.

### सबसेक्टर विश्लेषण म्हणजे काय?

सबसेक्टर विश्लेषण म्हणजे एखाद्या वस्तूचे उत्पादन, त्यावरील प्रक्रिया, त्यासाठीच्या सेवा यानुसार प्रत्येक टप्प्यावरील मुख्य भूमिका करणाऱ्या व्यक्ती (शेतकरी, छोटे व्यापारी, मध्यम व्यापारी, मोठे व्यापारी, प्रक्रिया उद्योजक इत्यादी) यांचा साकल्याने विचार करणे. तसेच त्या त्या टप्प्यांवर संबंधितांना येणारा खर्च, मिळणारा नफा तसेच प्रत्येक टप्प्यावरील बलस्थाने आणि संधीचे मुद्दे, मर्यादा, धोके आणि त्यावरील उपाययोजनांचा अभ्यास होय. थोडक्यात असे विश्लेषण आपण करणे म्हणजेच 'सुगी आपल्या हाती.'

| विवरण | मुख्य भूमिका कोणाची? | अंदाजीत खर्च | वाढणारे मूल्य (नफा) | मर्यादा व धोके | मर्यादेवरील उपाययोजना |
|---|---|---|---|---|---|
| सुरुवातीच्या टप्प्यातील साधन सामुग्री (Input / Raw Material) | ✔ | ✔ | x | ✔ | ✔ |
| उत्पादन (Production) | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ |
| प्रक्रिया (Process) | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ |
| प्रक्रिया पश्चात गुणवत्तापूर्ण उत्पादन (Value added) | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ |
| ग्राहक | ✔ | ✔ | x | ✔ | ✔ |

प्रत्येक विश्लेषणाच्या टप्प्यावर कुणाची भूमिका आहे हे ओळखून एखादे उत्पादन घेण्यासाठी त्याला कुठली साधनसामुग्री लागते, त्याचा अंदाजित खर्च काय आहे, खर्च वजा जाता निव्वळ नफा किती मिळतो आणि त्या टप्प्यावरील बलस्थाने आणि संधीचे मुख्य मुद्दे, संभाव्य धोके आणि मर्यादा तसेच त्यावरील उपाययोजना या विश्लेषणाच्या माध्यमातून समोर येतात.

शिवाय सबसेक्टर विश्लेषण करत असताना खालील तीन बाबींचा प्रामुख्याने विचार करावा.

१) ग्राहकांपर्यंत पोहचणारे उत्पादन विविध टप्प्यांतून जात असते. म्हणून या टप्प्यांना अनुसरून असणाऱ्या मूल्यवर्धित साखळीचे (Value Chain) विश्लेषण.

२) काही कृती या अधिक फायदेशीर असतात किंवा मूल्यवर्धनातून त्यावर अधिक फायदा मिळू शकतो. यामुळे त्या त्या टप्प्यावरील मुख्य भूमिका करणाऱ्यांना (शेतकऱ्यांपासून ते व्यापाऱ्यांपर्यंत) उत्पादन अथवा सेवेची योग्य किंमत मिळू शकते.

३) मूल्यवर्धित साखळीतील काही घटक (मुख्यतः व्यापारीच-Lead Player) हे त्या संबंध साखळीला प्रभावीत करू शकतात. त्यामुळे विविध टप्प्यांवरच्या भूमिका करणाऱ्यांना नफा वा तोटा होतो. मूल्यवर्धित साखळीतील हे प्रमुख घटकच (Lead Player) त्या उत्पादनाची, प्रक्रियेची, सेवेची अलिखीत नियमावली ठरवितात. ही बाब आपल्याला सबसेक्टर नकाशा (Sub Sector Map) च्या माध्यमातून समजून घेता येते.

यावरून सबसेक्टरल विश्लेषण म्हणजे विविध टप्प्यांवरील मुख्य घटक (Lead Player) आणि इतर घटक यांचे संबंध जाणून घेऊन संधी, मर्यादा आणि उपाययोजनांचा शोध घेत एखाद्या टप्प्यावर स्वतःची जागा निर्माण करणे होय.

वरील विश्लेषण सोयापनीर या उत्पादनासंदर्भात सोयाबीन या सबसेक्टरच्या माध्यमातून समजून घेता येईल.

सोयापनीर उत्पादन उद्योग व्यवसायापर्यंत पोहोचण्यासाठी सोयाबीन उत्पादनापासून



सुरुवात करावी लागेल. यामध्ये मुख्यतः जमिनीची निवड, खतांची निवड, पाणी व्यवस्थापन, मजूर या साधन सामुग्रीचा (Input / Raw Material) अभ्यास करावा लागेल. सोयाबीनचे योग्य प्रमाणावर उत्पादन झाल्यासच त्यावर आधारीत प्रक्रिया उद्योगांना आवश्यक तो माल मिळू शकेल. सद्य परिस्थिती खत, पाणी आणि मजूर यावर अवाढव्य खर्च होतो. शिवाय जमिनीची निवड माती परीक्षणाशिवाय केली जाते. परिणामी खर्च अधिक व उत्पादन कमी अशी अडचण निर्माण होऊन शेतकरी तोट्यात जातो. शिवाय सोयाबीनची गुणवत्ताही यथायोग्य नसते. त्यामुळे त्याच्या मालाला भाव मिळत नाही. या टप्प्यामध्ये कमी खर्चांत जास्त उत्पादन कसे होईल याची उपाययोजना तयार करता येते.

एकदा उत्पादनाला सुरुवात केल्यानंतर कीड व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन कसे होते यावर उत्पादन आणि त्याची गुणवत्ता अवलंबून असते. प्रत्यक्ष उत्पादन आल्यानंतर सोया काढणीसाठी लागणारे मजूर, विकण्यासाठीचे दळणवळण खर्च, त्यावेळेस असणारा हमी भाव या सर्व गोष्टी शेतकऱ्यांना नफा किंवा तोटा मिळवून देतात. म्हणून विश्लेषणाच्या माध्यमातून येणारे संभाव्य धोके, अडचणी यावर उपाययोजना ठरविता यऊ शकतात.

एकदा शेतकऱ्याने माल विकला की तो व्यापारी तो माल विविध घटकांना उदा.अन्न प्रक्रिया उद्योग कंपनी, कृषी उत्पन्न बाजार समिती, महिला बचत गट, बी-बियाणे कंपनी यांना विकतो. यातील आपण महिला बचत गट या घटकांचा विचार करू. या महिला बचत गटांच्या माध्यमातून आपल्याला प्रक्रिया उद्योग उभे करणे शक्य आहे. त्यांना आवश्यक असणारे प्रशिक्षण, मशिनरी मिळाल्यास सोयाबीन वरील प्रक्रिया उद्योग उभा राहू शकतो. या प्रकारात सोयाबीनपासून सोयापीठ, दूध-दही, पनीर, डाळ, स्नॅक्स, बेसन इत्यादी उत्पादन घेता येवू शकते. एकच उत्पादन अनेक बचत गटांमार्फत घेतल्यास रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात. त्यापुढील टप्पा म्हणजे पॅकेजिंग आणि लेबलिंगचा होय. हे काम देखील काही बचत गटांच्या माध्यमातून केल्यास त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध

होऊ शकतात. एकदा पॅकेजिंग, लेबलिंगसह उत्पादन तयार झाल्यास त्याच्या मार्केटिंगसाठी महिलांचा गट कार्यरत होऊन तिथेही उद्योग व्यवसाय निर्माण होऊ शकतो. तेथून हा माल विविध व्यापारी आणि त्यानंतर ग्राहकांपर्यंत पोहचविला जाऊ शकतो. अथवा महिला स्वतः एखादे विक्री व्यवस्थेचे दुकान टाकू शकते.

पण हे करीत असताना तत्कालीन उत्पादन किती, व्यापारी त्यांना किती रुपयांत माल विकू शकतो, तो त्यांना परवडणारा आहे का? हे सर्व सबसेक्टर विश्लेषणाच्या माध्यमातून समोर येते. महिला बचत गटांनी मालाला योग्य खरेदी किंमत न दिल्यास व्यापारी हाच माल कृषी उत्पन्न बाजार समिती, अन्न प्रक्रिया उद्योग यांनाही विकू शकतो. या दृष्टीकोनातून व्यापारी हा लीड प्लेअर आहे. सोयाबीन उत्पादनाची संधी, बलस्थाने, व मर्यादा यांच्या विश्लेषणातून त्या बाबी व त्यावरील उपाययोजना खालीलप्रमाणे असू शकतील.

| बलस्थाने/ संधी | मर्यादा | उपाययोजना |
|---|---|---|
| ♦सोया हे प्रोटीन अधिक असल्याने मानवी आरोग्याला हितकारक आहे.<br>♦भारतीय बाजारपेठेत सोयाला प्रचंड मागणी आहे.<br>♦सोयापासून जनावरांच्या खाद्याची निर्मिती करता येते.<br>♦सोयापासून औषध निर्मिती होते.<br>♦सोयापासून बनणाऱ्या तेलासाठी ८० टक्याहून अधिक माल विकला जातो.<br>♦सोयापासून बनणाऱ्या इतर उत्पादनांच्यासाठी (डाळ, दही, पनीर, दूध) अनेक संधी उपलब्ध आहेत. | ♦उत्पादन घेताना सुविहीत पद्धतीचा अवलंब नसल्याने खर्च अधिक व उत्पादन कमी.<br>♦पाणी, जमीन, कीड, खते विशेष करून रासायनिक खते यांचे अयोग्य व्यवस्थापन.<br>♦सोयाबीनच्या साठवणुकीसाठी गोडावून नसणे.<br>♦शेतकऱ्यांना शासनाकडून हमीभाव नसणे.<br>♦केवळ सोयातेलाकडेच जास्त उत्पादन विकले जाते.<br>♦प्रक्रियेशिवाय सोया खाता येत नाही.<br>♦बँकांकडून सोया उत्पादनासाठी यथायोग्य कर्जाची सोय नाही. | ♦सोया उत्पादनासाठीच्या सुविहीत पद्धतीचे शेतकऱ्यांना प्रशिक्षण.<br>♦सोयाबीन प्रक्रिया आधारीत उद्योगांचे (डाळ, दूध, पनीर, दही) महिलांना प्रशिक्षण.<br>♦पॅकेजिंग, लेबलिंग, मार्केटिंग याचेही महिलांना प्रशिक्षण.<br>♦प्रोड्यूसर कंपनीची स्थापना<br>♦गोडावूनची निर्मिती.<br>♦सरकारी योजनांचा शेतकरी व महिलांना लाभ मिळवून देणे.<br>♦बँकांकडून कर्ज मिळवून देणे.<br>♦सोयाबीन प्रक्रिया आधारीत उद्योगांच्या (डाळ, दूध, पनीर, दही) मालासाठी मार्केट निर्माण करणे. |



# उपजीविका विकासासाठी पीआरए
## अर्थात
## गावाचा एक्सरे

### उपजीविका कार्यक्रमाधारीत ग्रामीण सहभागीय मूल्यावलोकन

**ग्रामीण** सहभागीय मूल्यावलोकान (पीआरए) ही १९७० च्या दशकात सर्वेक्षणाची एकात्मिक व शास्त्रीय संशोधन पद्धती म्हणून विकसीत झाली. ग्रामीण विकास कार्यात या पद्धतीचे महत्त्व अनन्य साधारण आहे. नियोजन कर्ता व समाज यांच्यामध्ये अनौपचारीक पद्धतीने माहितीची देवाण घेवाण करण्याचा पद्धतशीर मार्ग म्हणून पी.आर.ए.कडे पाहिले जाते. या माहितीच्या देवाण-घेवाणीतून माहितीचे संकलन व पृथःकरण व त्यातून समाजाच्या निश्चित प्रश्नांची उकल करण्याचे पीआरए हे प्रभावी माध्यम म्हणून ओळखले जाते. थोडक्यात असा पीआरए म्हणजे 'गावाचा एक्सरे' असतो.

### पीआरए कशासाठी?

- एखादा विशिष्ट प्रश्न समजून घेणेव तो सोडविण्यासाठी त्याचे विश्लेषण करणे.
- लोकांच्या गरजांचा शोध घेण्यासाठी.
- प्रकल्पाच्या योग्यतेचा अभ्यास करण्यासाठी.
- विकास कामांचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी.
- विकासकामांचे संनियंत्रण व मूल्यांकन करण्यासाठी.
- गटागटामधील अथवा गटातील सदस्यांमधील परस्पर स्पर्धा व हेवेदावे ओळखण्यासाठी.

पी.आर.ए. प्रक्रियेतून मिळालेली माहिती इतर अन्य प्रकारच्या सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीसाठी अचूक असते. याचे कारण एखाद्या विशिष्ट विषयावर गावातील आणि गावाबाहेरच्या घटकांसोबत तसेच गावातीलच महिला-पुरुषांच्या साक्षीने माहितीची देवाण-घेवाण होत असल्याने चुकीची माहिती पुढे येण्यास फारच कमी वाव असतो. कारण

एखादी चुकीची माहिती एखाद्या विशिष्ट हेतूने कोणी मांडली, तर लगेचच इतरांपैकी कोणी ती खोडून काढून योग्य ती माहिती पुढे करतो. त्यामुळे अचूक माहिती पुढे येते.

पीआरएमध्ये छोट्या गटचर्चा, मोठ्या गटचर्चा तसेच काही वेळा आवश्यक वाटल्यास वैयक्तिक स्तरावरील चर्चाही घडवून आणता येतात. एकच प्रश्न अथवा मुद्दा विविध प्रकारच्या बैठकीतून चर्चेला घेतल्यास त्याचे विविध पैलू समोर येतात व प्रश्नांची निश्चित जाण अथवा उकल होते. याशिवाय सुलभकर्त्यांला त्याने घेतलेल्या वेगवेगळ्या मुलाखती, घडवून आणलेल्या चर्चा, त्याची निरीक्षणे व लोकांनी काढलेली चित्रे व रांगोळ्या यातूनही पुष्कळशा गोष्टी जाणवता येतात. काही वेळा एखाद्या घटनेतून काही लोकांचा अबोलासुद्धा बराच बोलका असतो. मात्र हे पीआरएमधून आवश्यक ते साध्य काढण्यासाठी प्रशिक्षित व अनुभवी सुलभकर्त्यांची उत्तम फळी पीआरए प्रक्रियेत असणे फार आवश्यक आहे.

पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनासारख्या कार्यक्रमाच्या नियोजन, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी करावयाच्या पीआरएमध्ये विविध विषयांतील तज्ज्ञांची फळी असणे आवश्यक आहे. कारण यामध्ये सामाजिक स्थिती, नैसर्गिक संसाधने, आर्थिक व्यवस्था, संस्था संघटनांमधील परस्पर संबंध यासारख्या वेगवेगळ्या विषयांतील माहितीचे संकलन, पृथक्करण व विश्लेषण करावे लागते. त्यासाठी त्याक्षमतेच्या तज्ज्ञांचा सहभाग प्रक्रियेतील चर्चा पुढे नेण्यास उपयोगी ठरतो. तसेच पीआरए प्रक्रियेमध्ये स्थानिक महिला व पुरूषांचा गटही असावा लागतो.

पीआरए प्रक्रियेतून सर्व सहभागींना नवीन माहितीबरोबरच पुष्कळशा नव्या गोष्टी शिकायला मिळतात. पीआरएमुळे संख्यात्मक माहितीपेक्षा लोकांमधील वेगवेगळे विचार आणि त्यामधील मतभेद याचा गुणात्मक अंदाज येतो. त्यामुळे पीआरएमधून सांख्यिकीय माहितीच्या अपेक्षेपेक्षा लोकांची अनुषंगिक मते, प्रतिक्रिया, अभिप्राय आणि प्रश्नाच्या अनुषंगाने त्यांना वाटणारी संभाव्य भीती व काळजी या गोष्टी प्रकर्षाने गोळा करता येतात.



## नियोजन प्रक्रियेतील मुख्य पायरी -

विकासात्मक प्रकल्पाच्या एकूण पायरीतील एक महत्त्वाची पायरी म्हणून पीआरएकडे पाहिले जाते. अनौपचारिक पद्धतीने व लोकांना सोप्या वाटणाऱ्या संसाधनांचा तथा साहित्याचा वापर करून चर्चेसाठी लोकांना प्रवृत्त करावे लागते. या चर्चेतून माहितीची देवाण-घेवाण व समस्यांचा अंदाज येतो. या समस्या सोडविण्यासाठी आजपर्यंत करण्यात आलेले प्रयत्न किंवा यापुढे अवलंबावयाचे संभाव्य मार्ग कोणते असू शकतात, यावर लोकांची वेगवेगळी असलेली मते आजमावता येतात. यातून सर्वानुमते योग्य असलेल्या मार्गांची व उपाययोजनांची निश्चिती होते. त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी करण्यासाठी नियोजन करता येते. अशा प्रकारे सहभागी पद्धतीने नियोजन झालेल्या प्रकल्पाची अंमलबजावणी व प्रकल्प पश्चात उपक्रमामध्ये लोकांच्या सहभागाची खात्री असते. अशा प्रक्रियेत काही तडजोड केल्यास लोकांचा सहभाग फारसा सक्रिय राहत नाही.

## मूल्यावलोकनाचे ठळक वेगळेपण

पारंपरिक पीआरएमध्ये लोकांच्या गरजा, लोकांच्या इच्छा, आकांक्षा आणि गावाची परिस्थिती याचा विचार केला जातो. या पीआरएमध्ये लोकांच्या गरजांपेक्षा उपजिविकेचे माध्यम निवडण्यासाठी आवश्यक असणारी कोणती परिस्थिती या गावात आहे, त्या दृष्टीने गावातील मंडळींमध्ये कोणती कौशल्ये उपलब्ध आहेत याची माहिती घेणे आवश्यक आहे. एकंदर उपजीविकेच्या साधनांचा या पीआरएतून आवाका येणे गरजेचे आहे. गावातील साधन संपत्तीच्या आधारे त्या गावाचे बलस्थान कोणते हे लक्षात घेऊन उपजीविकांच्या वर्गीकरणातील कोणती गोष्ट या ठिकाणी चपखलपणे बसू शकते याची मांडणी करणे आवश्यक आहे.

पीआरए हा गावाचा एक्सरे असतो. पीआरएतून लोकसहभागाद्वारे गुणात्मक माहिती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होते. तथापि, या पीआरएचा उद्देश हा उपजिविकांच्या साधनांचा

शोध घ्यावयाचा असल्यामुळे पारंपरिक पीआरएपेक्षा आपला दृष्टिकोन वेगळा हवा. जसे नैसर्गिक साधन संपत्ती नकाशामध्ये उपलब्ध सर्व साधनसंपत्तीपैकी कोणत्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा प्रक्रिया उद्योगामध्ये उपजीविका म्हणून समावेश होऊ शकतो या दृष्टीने लक्ष केंद्रित करून माहिती घेणे आवश्यक आहे.

नैसर्गिक साधनसंपत्ती नकाशामध्ये इतर कार्यक्रमांच्या प्रस्तावित उपचारामध्ये मोठ्या प्रमाणावर मृद व जलसंधारणाची माहिती गोळा केली जाते. पण उपजीविका कार्यक्रम उद्दिष्ट ठेवून त्या भागातील घेतली जाणारी पिके, अस्तित्वात असणारा झाडझाडोरा तसेच जमिनीचा दर्जा व पाण्याचा दर्जा जो काही प्रक्रिया उद्योगांमध्ये उपयुक्त ठरू शकतो हीच माहिती संकलित करणे गरजेचे आहे. अशी संकलीत केलेली काही माहिती यापूर्वी जर कोणत्या कार्यालयामध्ये उपलब्ध असेल तर त्याचीही पडताळणी करून पाहणे इष्ट ठरते. काही वेळेला गावकऱ्यांतर्फे अशा प्रकारे प्रक्रिया उद्योग किंवा इतर काही व्यवसाय उपजीविकेसाठी सुरू केले जातात. पण त्यावेळी उपयुक्त अशा नैसर्गिक कच्च्या मालाचा पुरवठा नसेल तर असे व्यवसाय टिकाव धरू शकत नाही. या गोष्टीचीही माहिती पीआरएद्वारे संकलित करणे गरजेचे आहे. फक्त यशस्वी झालेले उद्योग, यशोगाथा याशिवाय काही प्रमाणात अयशस्वी ठरलेले पण प्रयोग म्हणून केलेले उपजीविकेचे विविध व्यवसाय याची एकत्रित माहिती गोळा केल्यास त्याचे पृथक्करण जास्त उपयोगी ठरते.

शामाजिक नकाशामध्ये जसे गावातील घरांची रचना, मोकळ्या जागा यांचा समावेश होतो. उपजीविकेच्या प्रस्तावित उपाय योजनेसाठी या नकाशामध्ये गावामध्ये कोणत्या जाती-जमातींचे लोक राहतात व त्यांचा कोणता पारंपरिक व्यवसाय आहे हे जाणून घेतले तर काही परंपरागत उद्योग उभे करणे सोयीचे ठरते. सामाजिक नकाशामध्ये जशी गावठाणाची पूर्ण माहिती डोळ्यांसमोर येते, त्याचबरोबर गावठाण भागामध्ये कोणत्या ठिकाणी मोकळ्या जागा आहे जिथे काही प्रक्रिया उद्योग सुरू करायचे झाल्यास जागेच्या क्षेत्रफळाचा अंदाज येणे सोयीचे होते.



चपाती नकाशामध्ये गावातील एकंदर कार्यरत असणाऱ्या संघटना, मंडळे किंवा काही बंद पडलेल्या संघटना याची माहिती मिळते. या मंडळांचे गावाच्या विकासासाठी काय योगदान आहे हे समजून घेण्यासाठी काही संघटनांनी जर उपजीविकेसाठी प्रयत्न केले असतील तर त्यालाच पुन्हा जिवंत करणे शक्य आहे का? हे पीआरए दरम्यान पडताळून पाहता येते. गावामधील कार्यरत संघटनांमध्ये कोणते लोक पुढाकार घेऊन गावाच्या विकासात महत्त्वाचे योगदान देतात याचीही माहिती मिळते. त्यामुळे भविष्यकाळात अशा लोकांना काही जबाबदारी देऊन त्यांचे बळ वाढविणे शक्य होते. काही संघटनांची माहितीची देवाण-घेवाण होत असल्यास काही उपजिविकेबाबत एक प्रकारची साखळी तयार होऊन गावाच्या विकासास त्याची निश्चितच मदत होते. अस्तित्वात असणाऱ्या संघटना कोणत्या कारणांमुळे बंद झाल्या किंवा त्यांचे कार्य ठळकपणे दिसू शकले नाही ही माहिती सखोलपणे घेणे गरजेचे आहे. उपजीविकेसाठी आवश्यक अशा कौशल्य विकासामध्ये या संघटना पुढाकार घेऊन लोकांना पाठबळ देऊ शकतात. उपजीविकेसाठी करण्यात येणाऱ्या चपाती ड्रायग्राममध्ये काही संभाव्य संघटनांचा विचार देखील करावा लागेल. जसे काही आर्थिक पाठबळ देणाऱ्या संघटना, बँकांचा सहभाग तसेच बाजारपेठ उपलब्ध करून देणाऱ्या काही संस्था याची चर्चाही नियोजनादरम्यान लोकांसोबत केली तर बरीच माहिती मिळू शकते. एरव्ही पीआरएमध्ये बँका आणि इतर आर्थिक संस्थांना फारसे महत्त्व दिले जात नाही. उपजीविकेच्या मूल्यावलोकनामध्ये या संस्थांचा प्राधान्यक्रमाने उल्लेख असणे आवश्यक आहे.

# उपजीविका कार्यक्रमासाठीची जीवन कौशल्ये
## अर्थात
## सुखाचे रस्ते

**आपल्याकडे** एक म्हण आहे 'न बोलणाऱ्याचा गहूसुद्धा विकला जात नाही, पण बोलणाऱ्या माणसाचे हुलगेही विकले जातात'. खरं म्हटलं तर शहरी भागामध्ये आलेली उपजीविकेची अनेक साधने ही मूलतः खेड्यांतीलच आहेत. पण त्याला आधुनिकतेचा वेगळा वर्ख चढविण्यात आला. हा साज चढविणे नवीन युगामध्ये तसं आवश्यकही आहे. खेड्यातील माणसे ही मुळातच लाजरी-बुजरी असतात. आपण काय काम केलं आहे ते सांगत नाहीत. त्यांची अपेक्षा अशी असते की, आपले कामच बोलेल. पण सध्याची स्थिती अशी की, जो बोलतो त्याचेच काम दिसते. याचा अर्थ या कार्यक्रमातून बोलके शंख किंवा पोपट तयार करणे हा नाही पण जे उत्पादन आपण करतो त्याबद्दल बोलण्याइतके जीवन कौशल्य निर्माण होणे आवश्यक आहे.

खेड्यातील मंडळींना त्यांचे निसर्गदत्त पारंपरिक कौशल्य मिळालेले असते. त्यामुळे शेती कशी करावी, पेरणी कशी करावी अथवा बांधाचा सांडवा कुठे असावा या बद्दल कोणत्याही तज्ज्ञाने मार्गदर्शन करण्याची गरज नाही. पण या सांडव्याचे महत्त्व त्याला इतरांच्या गळी उतरविता येत नाही, ही खरी अडचण आहे. जीवन कौशल्यामध्ये पहिला टप्पा असा की, त्याची जीवनशैली बदलली पाहिजे. म्हणजे एखादे काम चोख वेळेत करणे आवश्यक आहे. बदलत्या जगामध्ये गुणवत्तेला महत्त्व आहे. कोणी तरी एखाद्या पदार्थात भेसळ करून फायदा मिळवतो तो त्याच्यासाठी आदर्श बनता कामा नये. गुणवत्तेतून यश मिळते पण गुणवत्ता हे भांडवल आहे हे लोकांना कळायला वेळ लागतो. शेवटी खेड्यांतील माणसे काही भांडवलदार नाहीत. त्यांच्याकडे असलेली नैसर्गिक साधनसंपत्ती, त्यावर होणारी किंचितशी प्रक्रिया यापेक्षाही खेड्यातील माणसे गुणवत्तापूर्वक काम करतात हेच त्यांचे भांडवल आहे. म्हणजे धान्य तसे मोंढ्यावर मिळते पण एखाद्या शेतकऱ्याने मी



पिकवलेला गहू सेंद्रिय खतावरचा असून त्यामध्ये एकही खडा नाही, आपण थेट हा गहू पिठाच्या गिरणीत पाठवू शकता अशी हमी दिली तर या गुणवत्तेच्या आधाराने मोंढ्याच्या गव्हापेक्षा शंभर, दोनशे रुपये निश्चितच जास्त मिळतात. तेव्हा या सगळ्या गोष्टींचे प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. खेड्यांमधील पापडाला बाजारपेठ मिळत नाही आणि लिज्जतचे पापडच विकले जातात यामध्ये लिज्जतच्या पापडाचा एकसारखेपणा, त्याची गुणवत्ता, पॅकिंग यासर्व गोष्टी खेड्यातील मंडळींच्या लक्षात आणून द्याव्या लागतात.

खेड्यातील माणसं संभाषण चतुर असतात पण त्यांचे धाडस कमी पडते. आपल्या खेडवळ भाषेबद्दलचे वेगळे न्यूनत्व त्याला आलेले असते. त्यामुळे मिळेल त्या ठिकाणी इंग्रजी शब्द वापरण्याचा तो प्रयत्न करतो. त्यामुळे या माणसाची भाषा ना शुद्ध खेड्याची राहते ना शहराची. खरं तर भाषेवर कोणताही संस्कार करण्याची गरज नाही. त्याला जे वाटते ते त्याने त्याच्या भाषेत स्पष्टपणे सांगितले पाहिजे. पण खेड्यातील माणसाला आपल्याच भाषेत हा संवाद चालू ठेवा हे कोणी तरी सांगण्याची गरज आहे. अनेक



जणांच्या संभाषणामध्ये बरेच दोष असतात. म्हणजे वाक्याची सुरूवात ते जोरात करतात, पण नंतर सगळेच उच्चारण इतके ढेपाळते की समोरच्याला पहिले चार शब्द तेवढे कळलेले असतात. असे सदोष संभाषण हे सुद्धा अडचणीचे ठरू शकते. या सर्व बाबी उपजीविकेच्या प्रशिक्षणामध्ये संबंधितांच्या लक्षात आणून देणे गरजेचे आहे.

जीवन कौशल्याचा विकास करताना कोणत्याही खेड्यातील माणसासमोरचा आदर्श हा राजकारणातील जवळची व्यक्ती किंवा एखादा सावकारच असतो. पण बडे उद्योजक कसे प्रयत्नातून उभे राहिले याचा वस्तुपाठ त्यांना सांगण्याची गरज आहे. म्हणजे धीरुभाई अंबानी पेट्रोलपंपावर लोकांच्या गाड्यात पेट्रोल भरत असताना पेट्रोल निर्मितीचा विचार करीत होते, स्वतःच्या खिशात दीडकी नव्हती पण दुसऱ्या माणसांचा पैसा आणि दुसऱ्या माणसांचे प्रयत्न याचा दुवा साधून त्यांनी रिलायन्सचे वेगळे जग निर्माण केले. उद्योग क्षेत्रातील अशी अनेक माणसे आहेत. मॅकडोनॉल्डपासून टाटापर्यंत आणि बद्रीनारायण बारवालेपासून भंवरलाल जैनपर्यंत अनेक उद्योजक कसे उभे राहिले, त्यांनी कोणते आदर्श निर्माण केले हे या लोकांच्या समोर आवर्जून सांगणे आवश्यक आहे. जीवनविषयक कौशल्यात देहबोली, भाषा, थोडासा अभिनय, शब्दांचा चढउतार या सर्व गोष्टींचे उचित प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. प्रशिक्षण जेव्हा गरजेनुसार दिले जाते तेव्हा ते अतिशय उपयुक्त ठरते. जीवनकौशल्य विकास ही काळाची गरज असल्याने योजनाबद्ध व शास्त्रशुद्धरीत्या हे प्रशिक्षण झाले तर उपजीविकेच्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने एक वेगळी नवीन ऊर्मी ग्रामीण जनतेला मिळेल. किंबहुना ते त्यांचे 'सुखाचे रस्ते' ठरतील.



# विविध योजना एकत्र सांधणे
## अर्थात
## सुखी सांगड

**जसे** जीवन एकांगी असू शकत नाही त्याचप्रमाणे उपजीविका विकास हा एखाद्या विभागाचा कार्यक्रम असू शकत नाही. कप्पेबंद पद्धतीने काम केल्यामुळेच उपजीविका विकासाच्या विविधांगांचा साकल्याने विचार केला गेला नाही. आतापर्यंत उपजीविका विकास म्हणजे दारिद्र्य रेषेखालील लोक आणि त्याचे सर्व दायित्व हे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा किंवा तत्सम यंत्रणेशी जोडले गेले. मुळामध्ये उपजीविका विकास हा एक जीवनाचा ध्यास आहे. कौशल्याला आकार देण्याचा वेगळा प्रयत्न आहे.

### दारिद्र्याकडून समृद्धीकडे

दारिद्र्याकडून किंवा नेहमीच्या जीवनाच्या रहाटगाडग्याकडून समृद्धीकडे जाण्याचा मार्ग आहे. उपजीविका विकासाचा संबंध व्यक्तित्वाशी आहे आणि या व्यक्तिमत्त्वाचा विकास प्रशिक्षण आणि ज्ञानार्जनाने होऊ शकतो. बदलत्या काळात ज्ञान हे भांडवल आहे. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचे ज्ञान अवगत असणे आणि प्रक्रियेच्या माध्यमातून त्याला उन्नत करणे उपजीविका विकासामध्ये आवश्यक असते. त्यामुळे उपजीविका विकास कार्यक्रम हा केवळ कृषी विभागाशी किंवा वन खात्याशी बांधला गेलेला नाही. पण प्रत्येक विभागाशी त्याचा सांधा मात्र जोडला गेला आहे. उपजीविका विकासातून मोठा साखर कारखाना उभा राहणार नाही पण गाव पातळीवर उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीवर छोटीशी प्रक्रिया करून त्याला बाजारपेठ मिळवून देण्याची ही धडपड आहे.

अर्थातच उपजीविका विकास हा कार्यक्रम अनेक विभागांशी जोडला गेला आहे. ही सांगड घालणे झापडबंद दृष्टिकोनामुळे आतापर्यंत आपल्याला जमले नाही. सर्वांनी समरस होऊन एकात्मिक विचार न केल्यामुळे हे घडले. त्यातल्या त्यात उपजीविका विकासाच्या मुख्य प्रवाहापासून बँक नावाची व्यवस्था नेहमीकरिता दूर राहिली. शासकीय योजनांतील

सबसिडीपुरता त्यांचा संबंध राहिला. पण उपजीविकेचा थेट संबंध हा अर्थकारणाशी आहे आणि जोपर्यंत शासनाच्या विविध विभागांची सांगड बँकांबरोबर घातली जात नाही तोपर्यंत उपजीविकेच्या कार्यक्रमाला व्यापक स्वरूप येणार नाही. बँकांना हा कार्यक्रम म्हणजे ओझे न वाटता बँकेच्या विकासाचा एक अनुभाग समजला तर हे सहज घडू शकते.

दिलासा संस्थेने अंब्रेला प्रोजेक्ट फॉर नॅचरल रिसोर्स मॅनेजमेंट या नाबार्डच्या कार्यक्रमातून अनेक शेतकऱ्यांना ठिबक सिंचनासाठी कर्ज दिले. पण कर्जदाता आणि कर्ज वसुली करणारा असा व्यवहार न ठेवता त्याला एकात्मिक कीड नियंत्रण, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन या गोष्टींपासून पिकांच्या वाढीच्या प्रत्येक टप्प्यावर तांत्रिक मार्गदर्शन केले. यामुळे कापसाचे दर एकरी उत्पादन सरासरी बावीस क्विंटलवर तर वाढलेच पण सर्व शेतकऱ्यांनी आपल्या कर्जाचा हप्ता न चुकता परत केला. हा कार्यक्रम आता चांगली गती घेत आहे. पण हा कार्यक्रम राबविताना आंतरपिकाच्या व्यवस्थापनापासून व्हेंचुरीच्या माध्यमातून लिक्विड फर्टिलायझर कसे वापरायचे हे सांगण्यात आले. प्रत्येक टप्प्यावर खर्च कमी करण्यात आला. अवर्षणाच्या परिस्थितीतही शेतकऱ्यांना उपजीविकेची चिंता राहिली नाही. महाराष्ट्रामध्ये पाणलोटाचा कार्यक्रम सर्वत्र यशस्वीपणे राबविला गेला. पण कोणताही पाणलोटोत्तर कार्यक्रम दिला गेला नाही. त्यामुळे काही पाणलोटांमध्ये दुग्ध व्यवसाय वाढला तर कोठे शेडनेटचा व्यवसाय. शेतकऱ्यांनी आपापल्या स्तरावर त्यांचे प्रयत्न चालू ठेवले. पण पाणलोट विकासाच्या बरोबरीने उपजीविका साधनांचा जर एकात्मिकपणे विकास केला गेला, तर शाश्वत विकासाचा मार्ग सहज सापडू शकेल. जर गावामध्ये पशुसंवर्धनाला संधी असेल तर त्याची सांगड डेअरीबरोबर घालणे आवश्यक आहे.

उपजीविका विकासासाठी सध्या केंद्र सरकारची देशभर सुरू असणारी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजना ही सांगड घालण्यासाठी सगळ्यात महत्त्वाची योजना आहे. या योजनेमधील बारकावे जाणून घेऊन त्यानुसार नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास गावामध्ये करून घेता येतो व या साधनसंपत्तीच्या वाढीमुळेच पुढे उपजीविकेची साधने निर्माण होतात. ही केवळ शंभर दिवसांचा रोजगार  देण्याची योजना नाही तर त्यामध्ये शाश्वत उपजीविका गावकऱ्यांसाठी उपलब्ध व्हावी इतकी ताकद आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या



विकासामध्ये केवळ नव्यानेच सर्व काही निर्माण करायचे असे नसून अस्तित्वातील स्ट्रक्चर्स, बंधारे व त्याची दुरुस्ती, गाळ काढणे यासारख्या काही उपक्रमामुळेदेखील गावातील जमिनीचे आरोग्य व पाण्याची स्थिती सुधारू शकते. एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमामध्येदेखील सर्वच अनुदान फक्त पाणलोट व उपजीविकेसाठी एका क्लस्टरसाठी उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामध्ये प्रकल्प अहवालामध्येच तयार करताना मूळ योजनेतून किती रक्कम येणे अपेक्षित आहे व मनरेगासारख्या योजनेतून किती रकमेची सांगड घालता येऊ शकते याचा विचार करावा लागेल. त्यामुळे एकंदर शाश्वत उपजीविकेसाठीचा विचार प्रकल्प अहवाल निर्मितीपासूनच करणे योग्य ठरते.

केंद्र शासनाच्या अन्नसुरक्षा कायद्यामध्ये देखील उपजीविका विकासाचा प्राधान्याने विचार केलेला आहे. शासनाच्या आकडेवारीप्रमाणे २०५०  मध्ये अन्नधान्याचा सर्वात जास्त तुटवडा आपल्या देशात जाणवणार आहे. हवामान बदल, शेतकऱ्यांची शेती करण्याबाबतच असलेली उदासीनता आणि बाजारभावांचा चढउतार यामुळे २०५० मध्ये नेमके किती जण शेती व्यवसायात असतील ही भीती निर्माण झालेली आहे. त्यामुळेच अन्नसुरक्षेमध्ये लोकांना पुरेसे अन्न मिळावे हा तर उद्देश आहेच पण त्यातून एका कुटुंबाच्या उत्पन्नाचा व खर्चांचा योग्य तो ताळमेळ असावा याचा विचार केला गेला आहे. जागतिक हवामान बदलामुळे नेहमीची रोख पैसा देणाऱ्या पिकांवरच शेतकऱ्यांनी अवलंबून न राहता काही नवीन पिकांतून प्रक्रिया करून त्यापेक्षा जास्त उत्पन्न मिळविण्यासाठी कसा प्रयत्न करता येईल हा विचार अन्नसुरक्षेच्या बिलामध्ये केला आहे. केवळ शासनच नव्हे तर नाबार्डअंतर्गत आदिवासी भागामध्ये घेण्यात आलेला वाडी प्रकल्प हा उपजीविका विकासाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. या प्रकल्पाचा कित्ता इतरत्र गिरविता येतो का याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

प्रत्येक गावामध्ये दरवेळी नवीन योजना घेण्यापेक्षा निर्माण करून ठेवलेली सार्वजनिक मालमत्ता साधने (कॉमन प्रॉपर्टी रिसोर्सेस) किती प्रमाणात करून ठेवली आहेत याचा विचार प्राधान्यक्रमाने करणे गरजेचे आहे. ही साधने म्हणजे उपजीविकेच्या साधनांचा एक मूलगामी स्रोत आहेत. मग ते गावातील समाजमंदीर असो की पाझर तलाव, नाला बडिंग

असो की सिमेंट बांध, या सर्व सार्वजनिक मालमत्ता साधनांचा विचार हा केला जात नाही. दिलासा संस्थेच्या वतीने अनेक ठिकाणच्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या गेटची दुरवस्था लक्षात घेऊन कायमस्वरूपी दगडी भिंत बांधण्यात आली. अत्यंत कमी पैशांमध्ये दोन खांबांमध्ये ही चार ते पाच फूट उंचीची भिंत उभारण्यात आली. त्यामुळे निरुपयोगी होत चाललेला कोल्हापूर पद्धतीचा बंधारा हा उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत झाला. त्यामुळे निर्माण करून ठेवलेल्या सार्वजनिक मालमत्ता साधनांतून काय घडू शकते याचा विचार होणे आवश्यक आहे.

## वाटेतील काटे

आज शासनाचे विविध विभाग अनेक योजनांमध्ये काम करीत असतात. पण एका विभागाचा दुसऱ्याशी मेळ नसतो. प्रत्येकाची उद्दिष्टपूर्ती वेगळी असते. लाभधारक वेगळे असतात. गावामध्ये दोन प्रकारची माणसं असतात, एक 'करणारे' आणि दुसरे 'फिरणारे'. गावातील करणारी माणसं कधीही शासनाच्या कोणत्या विभागाकडे जात नाहीत. आपापल्या स्तरावर ते श्रमातून, कौशल्यातून मार्ग काढत असतात. गावातून सहसा ही मंडळी बाहेर पडतच नाहीत. पण फिरणारी माणसं मात्र शासकीय योजनांचा सातत्याने अंदाज घेत असतात. दुर्दैवाने अनेक योजना या फिरणाऱ्या मंडळींच्या तडाख्यात सापडतात आणि योजनांचे दैव फिरते. वस्तुतः उपजीविका विकास हा कार्यक्रमच मुळात सर्व विभागांशी सांगड घालणारा कार्यक्रम आहे. एखादा गट किंवा समूह जेव्हा काही इच्छाशक्तीने पुढे येतो तेव्हा त्याला एक तर दिशा सापडत नाही आणि मदतीचा दिलदार हात पुढेही केला जात नाही. आपल्याकडे मदत याचा अर्थ केवळ अनुदान असा घेतला जातो. उपजीविका विकास ही काही शासकीय योजना होऊ शकत नाही. लोकांच्या ऊर्मीतून आपल्या कौशल्याला वेगळी वाट करून देऊन उद्यमशीलतेचा स्वीकार करून उपजीविका विकास ही एक वेगळी धडपड आहे. अलीकडे खेड्यामध्ये कुछ स्किमा लाये क्या? असा प्रश्न ज्या पद्धतीने हेल काढून विचारला जातो त्याचा अर्थ खिमा करनेका है क्या? असाच दुर्दैवाने घ्यावा लागतो. एखाद्या माणसाची प्रकृती गुबगुबीत दिसली, गाल



फुगलेले दिसले याचा अर्थ तो माणूस प्रकृतीने सुदृढ आहे असा होत नाही. प्रकृतीला आलेली सूज म्हणजे प्रकृती सुधारली असा जसा होत नाही तसाच इष्टांकपूर्ती झाली म्हणजे उपजीविका विकास झाला असा अर्थ धरता येत नाही. उपजीविकेला सबसिडीची नव्हे तर कष्टाच्या शिडीची गरज आहे.

आपल्याकडे अनिवासी भारतीयांना एनआरआय असे म्हणतात. अलीकडे असाच एक वर्ग तयार झाला आहे आणि त्याला अनिवासी ग्रामीण म्हणजेच नॉन रेसिडेंट व्हिलेजर्स (एनआरव्ही) असे म्हणतात. परिस्थितीच्या रेट्यात अनेक जण तालुक्याच्या ठिकाणी किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी राहतात. ते शहरी नसतात पण ग्रामीण भागाशी त्यांचा संबंध केवळ त्या ठिकाणची जमीनजुमला आणि घरादारापुरता मर्यादित असतो. पण वारे कोणत्या दिशेने वाहत आहेत याचा त्यांना अंदाज येतो. नवीन योजना कुणाकडे आहे आणि ती कशी लाटावी याचे ज्ञान त्यांना शहरात बसून मिळते. म्हणायला हे ग्रामीण असतात. कळवळ्याने बोलतात पण ना त्यांना ग्रामीण भागाबद्दल प्रेम असते ना ग्रामविकासाबद्दल. खेड्याच्या नावावर त्यांची उपजीविका चालते. हा बांडगुळासारखा वाढलेला वर्ग अलीकडे प्रत्येक योजनांच्या आड येत असतो. जर ही मंडळी उपजीविकेच्या साधनांमध्ये उतरली तर उपजीविका सेक्टरचा विकास दूरच पण त्याला विकृत स्वरूप प्राप्त करून दिल्याशिवाय राहणार नाहीत. या एनआरव्ही मंडळींपासून उपजीविका विकासाची योजना चार हात दूर ठेवणे आवश्यक आहे.

उपजीविका विकासाची योजना ही गावासाठी, गटासाठी की समूहासाठी हे अजून स्पष्ट झालेले नाही. एखादी ग्रामसभा घेऊन कोणाला उपजीविकेतून कसा विकास हवा आहे असा प्रश्न केला तर परस्परांमध्ये वाद झाल्याशिवाय काहीही घडणार नाही. मुळामध्ये उपजीविका विकास हा मागणी आधारित कार्यक्रम नाही. तो कौशल्याधारित कार्यक्रम आहे. त्यामुळे एकजिनसी, एकदिलाचा एखादा गटच या योजनेत पुढे घेऊन जाऊ शकतो. त्यामुळे नेहमीच्या साचेबद्ध पद्धतीने लाभधारकाचा शोध घेतला तर लाभ एकाला आणि योजनेचा धारक दुसराच असे होऊन बसल्याशिवाय राहणार नाही.

# प्रकल्प अहवाल आणि नवीन स्वयंरोजगाराचा शोध
## अर्थात
## गाव पांढरीचे खळे

**एकात्मिक** पाणलोट विकास कार्यक्रमातून उभा राहणारा स्वयंरोजगार ही सुरूवात आहे. तो काही शेवट होऊ शकत नाही. त्यामुळे कोणताही छोटा उद्योग करायचा असेल तरी आर्थिक क्षमता, तांत्रिक ज्ञान, उपलब्ध बाजारपेठ या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. बहुतेक करून सर्वसाधारण उद्योजक अस्तित्वात असलेल्या वस्तूंमधून एखादी वस्तू उत्पादनासाठी निवडत असतो. किंवा त्याच वस्तूच्या समांतर अधिक उपयुक्त वस्तू, उत्पादन खर्चांत काटकसर करून व कमी किंमतीत विकून अस्तित्वात असलेल्या उद्योजकांशी स्पर्धा करतो. स्वयंरोजगाराची निवड करताना खालील गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. ♦सध्या स्थानिक बाजारात वस्तूंची मागणी किती आहे? ♦वस्तूंची मागणी परदेशांत आहे का? व किती? ♦बाजारातील सरासरी मालाची किंमत काय? ♦मागणीत किती वाढ होण्याची शक्यता आहे ♦वस्तू बाजारात कोठून येते व तिची किंमत काय? ♦ही वस्तू आयात वस्तूला पर्याय ठरू शकेल काय ?

या सर्व बाबींची माहिती आपण निरनिराळ्या ठिकाणांहून, नियतकालिकांतून, बाजारपेठांतून गोळा करणे आवश्यक आहे. वस्तूंच्या उत्पादनांची तसेच उत्पादनातील निरनिराळ्या प्रक्रियांची, विक्रीची बाजारपेठांची माहिती स्वतः घेणे योग्य होईल. कमी गुंतवणुकीत उद्योगाची सुरुवात करता येऊ शकेल काय? गुंतवणूक कमी आणि खेळते भांडवल जास्त असे आपल्या उपजीविकेच्या साधनांचे स्वरूप आहे का? यंत्रसामुग्री चांगली आहे का? कच्चा माल कसा उपलब्ध होईल? बाजारपेठ स्थानिक आहे का? नफ्याचे प्रमाण किती आहे आणि वस्तूंची मागणी किती? आपल्याला कोणत्या स्पर्धकाला तोंड द्यावे लागेलया सर्व गोष्टींचा विचार करण्यास आवश्यक आहे. एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमातून थोडेसे बीज भांडवल मिळाले तरी स्वतःचे भांडवल किती आणि बँकांकडे धाव घ्यायची झाली तर त्यामध्ये अडसर किती या बाबीला सुद्धा महत्त्व आहे. या सर्व



गोष्टींबाबत विचार प्रवृत्त करणे हे कोणताही उपजीविकेचा कार्यक्रम हाती घेण्याच्या अगोदर आवश्यक आहे. निरनिराळ्या मार्गानी माहिती मिळविल्यानंतर आणि उपजिविकेचा, स्वयंरोजगाराचा प्रकल्प अहवाल तयार करणे आवश्यक आहे. प्रकल्प अहवाल हा शब्द मोठा असला तरी आपल्या खेड्याच्या भाषेत खळे केल्याशिवाय बाजारात जाता येत नाही त्याप्रमाणे प्रकल्पाचा पूर्ण लेखाजोखा केल्याशिवाय पुढील कोणतेच काम करता येत नाही. थोडक्यात ते असते 'गाव पांढरीचे खळे'. आपण कशाचे उत्पादन करणार आहोत, कुठे उत्पादन करणार आहोत, आपल्या उपजीविकेच्या उपक्रमांत एकंदर भांडवली गुंतवणूक किती, मनुष्यबळ किती लागणार, विक्रीची व्यवस्था काय करणार, नफा आणि तोटा परतफेडीची काय व्यवस्था आहे याचे साध्या सरळ भाषेत शब्दचित्र मांडणे म्हणणे प्रकल्प अहवाल आहे.

या प्रकल्प अहवालासाठी पहिला टप्पा असतो तो म्हणजे सर्वेक्षणाचा. यामध्ये मालाची कोठे विक्री होते, किती होते, बाजारपेठा, एखाद्या स्वयंरोजगारासाठी कोठे उपलब्ध आहेत, बाजारपेठेचे आकलन कसे करता येईल, सध्या माल कोठून येतो, काय भावाने येतो, किती दिवसांची उधारी द्यावी लागेल. कमिशन किती द्यावे लागेल. पॅकिंग कोणत्या प्रकारचे लागेल किंवा नाही या सगळ्या बाबींचा विचार करणे आवश्यक असते. हे सर्वेक्षणामध्ये फार मोठा पुस्तकीपणा न करता एकंदर परिस्थितीचा अंदाज घेणे या प्रक्रियेतून आवश्यक असते. त्यानंतर कच्चा माल कोठे उपलब्ध होईल, त्यावर प्रक्रिया करता येईल, खेड्यामध्ये कोणती बाजारपेठ मिळेल, याचा विचार करणे गरजेचे आहे. या सगळ्या गोष्टीतून प्रकल्प अहवालाची निर्मिती होते.

नमुन्यादाखल आवळा चहा प्रकल्पाची रूपरेषा आपण बघूया.

## प्रकल्पाची रूपरेषा : आवळा चहा

**ओळख :** आवळ्यापासून तयार केलेला चहा हा 'क' जीवनसत्त्वयुक्त असतो. तसेच तो पाचक, कफनाशक व पित्तनाशकही आहे. हा चहा नैसर्गिक असल्यामुळे याच्या सेवनाने कोणतीही बाधा होत नाही.

**बाजारपेठ :**

आवळ्याच्या चहाला बाजारात चांगली मागणी आहे. हा चहा पावडरच्या रूपात किराणा दुकाने जनरल स्टोअर्स चहा विक्रते यांच्याकडे विक्रीला ठेवता येईल. याशिवाय यात्रा, जत्रा, आठवडी बाजार, प्रदर्शने, देवस्थाने अशा गर्दीच्या ठिकाणीही हा चहा विकायला ठेवता येईल. स्वयंसहायता बचत गटांच्या सभांमध्ये जाऊन या पावडरचा गरम चहा लोकांना प्यावयास देऊन प्रचार केला तर अधिक योग्य ठरेल. असे केल्याने एकाच वेळी वीस-वीस जणांकडे प्रचार करणे शक्य होईल. तसेच गावातील वैद्य, डॉक्टरांची विक्री प्रचारासाठी मदत घेता आली तर अधिक योग्य होईल.

**निर्मिती प्रक्रिया :**

आवळे उन्हात वाळवून घ्यावेत. ते तडकायला सुरुवात झाल्यावर त्यातील बिया काढून टाकाव्यात. आवळे पल्वरायझरमध्ये टाकून दळून घ्यावेत. यामुळे आवळीकाठी तयार होते. यामध्ये त्रिफळा, ज्येष्ठमध, जटामासी, दालचिनी, सुंठ, तळस पावडर रूपात मिसळाव्यात. हे मिश्रण एकजीव होण्यासाठी पावडर मिक्सर वापरावा. आवळा चहा तयार झाल्यावर 100 ग्रॅमच्या पॉलिथीन पिशव्यांत पॅक करून विक्रीस पाठवावा.

**अ) अंदाज :**

मनुष्यबळ - 1

वर्षात किती दिवस काम चालेल - 200, (100 दिवस उत्पादन 100 दिवस विक्री)

श्रमिक दिवस - 200

निर्मिती क्षमता - 700 कि.ग्रॅ.

**ब) भांडवली खर्च (रु.) :**

पल्वरायझर (2 हॉ.पॉ.सिंगल फेज) - 1300

पावडर मिक्सर इ. - 2500

भांडी डबे इ. - 2500



विद्युतीकरण - 1000

भांडवली गुंतवणुकीचा विमा - 60

नावाची पाटी - 60

**क) उत्पादन खर्च :**

| तपशील | संख्या | प्रमाण | दर रु. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| आवळे | 2500 | कि.ग्रॅ. | 20 | 50000 |
| त्रिफळा | 100 | कि.ग्रॅ. | 180 | 18000 |
| ज्येष्ठमध | 25 | कि.ग्रॅ. | 100 | 2500 |
| जटामासी | 10 | कि.ग्रॅ. | 400 | 4000 |
| सुंठ | 25 | कि.ग्रॅ. | 105 | 2625 |
| जायफळ | 10 | कि.ग्रॅ. | 280 | 2800 |
| तुळस | 25 | कि.ग्रॅ. | 100 | 2500 |
| दालचिनी | 10 | कि.ग्रॅ. | 100 | 1000 |
| पॅलिथिन पिशव्या लेबल | 7000 | नग | 0.5 | 3500 |
| वीज | 596 | युनिट | 6 | 3581 |
| जागेचे भाडे | | | | 2400 |
| देखभाल | | | | 980 |
| व्यवस्थापन व विक्री खर्च | | | | 6475 |
| **एकूण** | | | | **100361** |

**ड) बँकेचे कर्ज**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भांडवली खर्च | | 19560 | | |
| खेळते भांडवल | | 15054 | | |
| एकूण | | 34614 | | |
| वजा अनुदान 30 टक्के | | 7500 | | |
| बँकेचे कर्ज | | 27114 | | |
| **इ) आवक** | | | | |
| **तपशील** | **संख्या** | **प्रमाण** | **दर** | **रक्कम रु.** |
| आवळा चहाची विक्री | 700 | कि.ग्रॅ. | 185 | 129500 |
| | | | **एकूण** | **129500** |

**सूचना :**

- आवळ्याच्या बियांची रोपे करून रोपवाटिका तयार करता येईल.
- उद्योजकाकडे गुंतवणूक करण्यासाठी कोणतीही अडचण असेल तर त्यांनी 100 ग्रॅम वजनाची तयार चहाची पाकिटे ठोक भावात विकत घेऊन विकावीत. याद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नातून बीजभांडवल मिळले तसेच बाजारपेठेचा चांगला अंदाज येईल. काही चहा स्टॉलशी संपर्क साधून तयार गरम चहा विकण्याचा प्रयत्न करावा. सरासरी रोजची विक्री 1 ते 32 किलो झाल्यावर उत्पादनासाठी प्रकल्पाद्वारे गुंतवणूक करणे अधिक योग्य होईल. असे सुचविण्याचे कारण की सवय लवकर बदलणे थोडे अवघड असते. खाद्यपदार्थ व पेये यांच्या संदर्भात चव आणि स्वाद खूप महत्त्वाचे असतात.
- योग्य भावाची खात्री करून खरेदीमध्ये बचत जरूरी आहे.



- खेळत्या भांडवलाची रक्कम मोसम संपल्यावर पुढच्या मोसमासाठी जपून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.
- हे पैसे उधारीत अडकून पडले असतील तर ते लवकर वसूल करून बँकेत भरावेत.
- नावाच्या पाट्या, जाहिरातीचे फलक तसेच भिंतीवर रंगवलेल्या जाहिराती इत्यादी द्वारा प्रचार करणे उपयुक्त होईल.
- केबल टीव्हीद्वारे जाहिरात, स्थानिक वृत्तपत्रांतील जाहिराती व हॅण्डबिलांद्वारे आपल्या उत्पादनाची माहिती जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोहचवणे महत्त्वाचे ठरते. यासाठी जाहिरात संस्थांची मदत घ्यावी. शक्य असल्यास काही खर्च धंद्यातील घाऊक विक्रेते व एजंट यांच्याकडून घ्यावा.
- हीच उपकरणे वापरून मसाले, मेतकूट, पिठे, आवळा सुपारी करून विकल्यास नफा वाढेल.
- टाकाऊ पदार्थ वापरून गांडूळ खत कचऱ्यापासून बगीचा करता येईल.
- कच्च्या मालाचे पुरवठादार हे स्थानिक व्यापारी असतील.

# जीवनाधाराचे मिशन
## अर्थात
## संधींच्या नव्या वाटा

**स्त्रियांनी** मानाने जगावं, एकजुटीने राहावं, पैशाचं बळ वाढवावं, हिम्मत धरावी, स्वतःची परिस्थिती सुधारावी यासाठी गावोगाव महिला बचत गट स्थापन झाले. एकजुटीच्या पाठबळातून बचत गटांची वेगळी चळवळ उभी राहिली. बचत गट करणे तसे सोपे आहे पण ते टिकविणे हे किती जिकिरीचे आहे हे महिलांना कळून चुकले. गटाच्या कामावरच गटाचे यशापयश आहे याची उपरती झाली. त्या निमित्ताने महिलांना बचत गटाच्या नोंदीची, जमा खर्चांच्या पुस्तकाची माहिती झाली. पण बचत गटाच्या विकासातील हा पहिला टप्पा आहे. जसजसा गट स्थिर होतो, मजबूत होतो, एकमेकांवरचा विश्वास वाढतो त्यावेळी बँकांचे कर्ज घेऊन जेव्हा गट उद्योग उभा करतो तेव्हा तो उद्योग गट बनतो.

बचत गटांतील लक्ष्मी उद्योगलक्ष्मी बनते. पाणलोटाच्या उपचाराच्या निमित्ताने आसपासचे शेतकरी सुद्धा उपभोक्ता गट निर्माण करतात. उपभोक्ता गट हा पाणलोटाचा कणा समजला जातो. या गटाच्या एकीतूनच उपजीविकेच्या उपक्रमाला बळ मिळणार आहे. हे उपक्रम राबविताना झालेल्या चुकांची व दोषांची चर्चा होणे आवश्यक आहे. शेवटी अपयशातूनच यशाचा मार्ग निघतो. यशोगाथेपेक्षा अपयशाची गाथा बारकाईने तपासली तरच या शासकीय कार्यक्रमात अगदी सकसपणे उपजीविकेच्या उपक्रमाला जे महत्त्वाचे स्थान मिळाले आहे त्याचे चीज करता येईल.

### राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान

एकूणच बचत गटांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण करण्याचे उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना १९९९ पासून राबविण्यात आली. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिलांचे बचत गट तयार करणे



त्यांना आर्थिक उत्पन्न मिळविण्यासाठी कर्ज व अनुदान उपलब्ध करून देणे, बचत गटांच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि यासाठी आवश्यक कौशल्य विकास आणि क्षमता बांधणीसाठी प्रशिक्षण देणे यावर प्रामुख्याने भर होता. या योजनेअंतर्गत अडीच कोटी दारिद्र्य रेषेखालील महिलांचे २० लाख बचत गट स्थापन करण्यात आले. १.५२ कोटी महिलांना बँकेतर्फे कर्ज व अनुदान देण्यात आले. या योजनेचा प्रा. राधाकृष्ण समितीने २००८ मध्ये अभ्यास करून काही शिफारशी केल्या.

या योजनेतील गुणदोषांचे विश्लेषण व शिफारशी लक्षात घेऊन आता सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेऐवजी नॅशनल रुरल लाईव्हलीहूड्स मिशन (एनआरएलएम) अर्थात राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान केंद्र शासनातर्फे हाती घेण्यात आले आहे. सामाजिक संघटन, संघटनांची बांधणी, वित्तीय तरतूद आणि शाश्वत उपजीविका साधनांचा संच याद्वारे गरिबीचे निर्मूलन करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. सध्याच्या तेवीस हजार रुपये प्रतिकुटुंब प्रतिवर्ष उत्पन्नाच्या दारिद्र्य रेषेकडून अशा प्रत्येक कुटुंबाला किमान रु. ५० हजार प्रतिवर्ष प्रत्कुिटुंब या स्तरापर्यंत नेणे हे अंतिम दृष्टीपथावरील साध्य आहे. हे साधण्यासाठी सुमारे ७ कोटी ग्रामीण, गरीब कुटुंबांशी कालबद्ध पद्धतीने संपर्क स्थापून त्यांच्याशी उद्दिष्ट साध्य होईपर्यंत सतत संपर्कात राहणे हे योजनेतील महत्त्वाचे कार्य आहे.

गरीब महिलांना बचत गटांमध्ये समाविष्ट करणे, त्यांच्या सशक्त संघटना बांधणे व हे घडवून आणण्यासाठी सक्षम, समर्पित, जबाबदारी निश्चित केलेले, व्यावसायिक साहाय्यता छत्र निर्माण करणे ही या योजनेची वैशिष्ट्ये आहेत. या अभियानाची पथदर्शी सुरुवात देशातील चाळीस जिल्ह्यांतील शंभर तालुक्यांमध्ये करण्यात आली आहे. या अनुभवावरून देशव्यापी अंमलबजावणी प्रस्तावित आहे. महिला बचत गटांसाठी नाबार्डच्या धर्तीवर एक राष्ट्रीय बँक सुरू करण्याचेही उद्दिष्ट आहे. 'संधीच्या नव्या वाटा' एनआरएलएमसारख्या योजनेतून उपजीविका विकासासाठी निर्माण झाल्या आहेत.

# नाविन्यपूर्ण उद्योगाचा पायंडा
## अर्थात
## उद्यमशीलतेची उर्मी

### उद्योजकता ते उपजीविका -

भारताच्या निमशहरी व ग्रामीण भागात जो पर्यंत उद्योजकतेची बीजे रुजत नाहीत तोपर्यंत उपजीविकेची असंख्य साधने निर्माण होणार नाहीत. ग्रामीण भागाचा शाश्वत विकास खऱ्या अर्थाने करायचा असेल तर तिथे प्रत्येक ठिकाणी उद्योजकीय संस्कृती रुजवणे अत्यंत गरजेचे आहे, उद्योजकता जर रुजली तरच तिथल्या स्थानिक लोकांना वेगवेगळ्या प्रकारच्या संधी आपोआप दिसतील. अगदी साधे उदाहरण द्यायचे झाले तर गव्हासारखे एखादे उत्पादन जर घेतले तर त्या उत्पादनापासून अनेक प्रकारचे उद्योग चालू होऊ शकतात. उदा. गव्हाचे ग्रेडिंग करून २५ किलो, ५० किलो पॅक करून जवळच्या शहरांत विकणे. बाजारपेठेत ताज्या मालाला फार मोठी मागणी आहे व अशा उत्पादन करणाऱ्या व्यवसायात कितीतरी उपजीविका निर्माण होऊ शकतात. जर प्रत्येक गावात शेतीत गहू लावण्यापासून ते पोळी विक्री करणे या साखळीचा अभ्यास करून त्याची अंमलबजावणी केली तर यामध्ये उपजीविका तर निर्माण होतीलच पण त्या गावचा शाश्वत विकास पण होईल. त्याचप्रमाणे प्रत्येक गावात चहाची छोटी-छोटी हॉटेल्स खूप असतात, जर आपण त्या बाजारपेठेचा काळजीपूर्वक अभ्यास केला तर चहाची विक्री फार मोठ्या प्रमाणात होऊ शकते. गावातली तरुण मुले एकत्र आली व चहा रिपॅकिंग करून त्याची विक्री केली तर कितीतरी मोठ्या प्रमाणात उपजीविका कायमस्वरूपी निर्माण होतील. तसेच, जर साध्या बडीशोपचा विचार केला तर तुम्हाला लक्षात येईल की साध्या बडीशोपची पाकिटं पानटपरीवर ५० पैशाला विकली जातात त्यात फक्त २ ग्रॅम बडीशोप असते. म्हणजे या प्रमाणामध्ये १ किलो बडीशोपची किंमत २५० रुपये होते. म्हणजे आपण बडीशोप ज्या ठिकाणी सहजपणे येऊ शकते. अशा ठिकाणी आंतरपीक म्हणून बडीशोप घेऊन काश्मिरी शोपसारखे किती तरी युनिट अगदी लहान प्रमाणात चालू करता



येऊ शकतात. या उद्योगाद्वारे शेकडो जणांची उपजीविका कायमस्वरूपी चालू होऊ शकते.

अशा प्रकारे आपण प्रत्येक ब्लॉकचा किंवा त्या त्या गावचा शास्त्रोक्त अभ्यास करून कितीतरी संधी उपजीविकेसाठी निर्माण करू शकतो. प्रत्येक गावाचे स्पॉट ॲनेलेसिस करून आपण त्या गावात एका ॲक्टिव्हिटीवर कितीतरी उपजीविका निर्माण करू शकतो. उदा. नंदुरबार हा एक आदिवासी प्रधान जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यातही धडगाव हे गाव अगदी सातपुड्याच्या सर्वात टोकावरचे गाव आहे. तिथे निसर्गाने मुक्तहस्तपणाने उधळण केलेली आहे. तिथे आंब्याची झाडे (गावरान) मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. ही झाली त्या जागेची बलस्थाने किंवा जमेची बाजू. ही जमेची बाजू लक्षात ठेवून या गावरान आंब्यांवर प्रक्रिया करून आमचूर पावडर खूप मोठ्या प्रमाणात उत्पादित केली जाते व ती चांगल्या भावात दिल्लीचे व उत्तर प्रदेशातील व्यापारी विकत घेतात. ही आमचूर पावडर विकण्यासाठी काही शिक्षित आदिवासी तरुण एजंट म्हणून पण काम करत आहेत. म्हणजे निसर्गनिर्मित आंब्याच्या झाडापासून आमचूर पावडर निर्मिती या छोट्याशा उद्योगाने किती तरी जणांच्या उपजीविकेचा प्रश्न सोडवला आहे. अधिक व्यवस्थित अभ्यास करून हा उद्योग वाढवला, व आमचूर निर्मिती करणारे उद्योग चालू केले तर शेकडो लोकांचा उपजीविकेचा प्रश्न सोडवला जाऊ शकतो. एक चांगल्या प्रकारे आमचूर पावडरीचे क्लस्टर निर्माण होऊ शकते. त्याचप्रमाणे प्रत्येक गावात हरभरा डाळ, फरसाण उत्पादन अशा साखळीमध्ये पण भरपूर उपजीविका निर्माण होऊ शकतात.

सिल्लोडमध्ये एका छोट्या उद्योजकाने फरसाण उत्पादन करण्याची छोटी फॅक्टरी चालू केली आहे व तो रोज एक टन फरसाण विक्री करतो. त्याने त्याच्या उद्योगात उत्पादन करण्याकरिता ७ ते ८ लोकांसाठी उपजीविका निर्माण केली. तीन ते चार गाडीवाल्यांना त्याच्यामुळे काम मिळाले व जवळपास १० ते १५ तरुणांना विक्रीमार्फत उपजीविका निर्माण केली. म्हणजे एका छोट्या गावातल्या तरुणाने, एका छोट्या उद्योजकाने २५ ते २७ स्थानिक लोकांसाठी उपजीविका निर्माण करून दिली असे म्हणता येईल.

त्यामुळे जर आपण बॅकवर्ड इंटिग्रेशन केले तर हरभरा डाळीच्या लागवडीपासून ते

फरसाण उत्पादन अस जर एक क्लस्टर केल तर जवळ जवळ शेकडो स्थानिक लोकांना उपजीविका सहज मिळू शकेल.

त्याचप्रमाणे बेकरीची जवळपास सगळी उत्पादने ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात विकली जातात. त्यामुळे ग्रामीण भागातल्या तरुणांना व्यवस्थितपणे योग्य प्रशिक्षण दिले तर त्या त्या स्थानिक ठिकाणी छोटे छोटे बेकरी उद्योग चालू होतील. कोल्हापूरच्या गणेश बेकरीने लातूरच्या जवळ एका छोट्याशा गावात ही छोटी बेकरी चालू केली व आज लातूरपासून पैठणपर्यंत त्यांच्या बेकरी उत्पादनांची विक्री होते. बेकरीची उत्पादने मोठ्या प्रमाणात छोट्या गावातूनच विकली जातात. तसेच सोलापूर-उस्मानाबादपासून ते बीड-गेवराई-पाचोडपर्यंत बेंगलोर - अय्यंगार बेकरीची स्वतःची अगदी छोट्या छोट्या गावांत दुकाने आहेत. ही सगळी दुकाने छान चालतात. त्या उद्योजकाने या स्थानिक बाजारपेठेचा फायदा घेऊन स्वतःचे बाजारपेठेत अस्तित्व निर्माण केले व अगदी वितरण व्यवस्था, वाहतूक व्यवस्था याद्वारे शेकडो स्थानिक तरुणांचा उपजीविकेचा प्रश्न सोडवला आहे.

त्यामुळे तिथे मोठी बाजारपेठ आहे तिथल्या जिओग्राफीचा अभ्यास करून तिथे एक बेकरीचे क्लस्टर निर्माण करून छोटे छोटे उद्योग चालू केले तर शेकडो लोकांसाठी उपजीविका सहजपणे निर्माण होऊ शकते.

काही काही ठिकाणी तर जी छोटी गावे मोठ्या शहरापासून जवळ असतील तिथे वेगवेगळ्या उत्पादनांचे क्लस्टर निर्माण करून उपजीविका निर्माण होऊ शकते. काही ठिकाणी असे प्रयत्न झालेले आहेत. उदा. लातूरजवळचे उजनी हे गाव बासुंदीसाठी प्रसिद्ध आहे. त्या गावची ८० टक्के उपजीविका ही बासुंदी या उद्योगावर चालते पण ते त्याच ठिकाणी विक्री करतात. त्याला आणखीन जर मोठं स्वरूप दिलं गेलं व व्यवस्थितपणे त्याला संघटित उद्योगात आणले तर ती बासुंदी पहिल्या टप्प्यात सोलापूर व दुसऱ्या टप्प्यात पुणे बाजारपेठेत विकली जाऊ शकेल. असे शास्त्रोक्त पद्धतीने जर काम केले तर त्या गावातल्या पुढच्या पिढ्यांना पण याच उद्योगात काम मिळेल व किती तरी लोकांच्या उपजीविकेचा प्रश्न सोडविता येईल.



हा प्रयत्न तमिळनाडूतील कोईम्बतूरजवळील तिरपूर या छोट्या गावाने करून भारतामध्ये व जगात उत्कृष्ट आदर्श निर्माण केला. तिरपूर व त्याच्या आसपासच्या गावांतल्या जवळपास ८० टक्के प्रत्यक्ष उपजीविका 'होजियरी' या उद्योगाने व २० अप्रत्यक्ष उपजिविका निर्माण करून ते पूर्ण गाव व आसपासची ५० गावे फक्त एका होजिअरी उद्योगामुळे निर्माण झालेली आहे. एका तिरपूरहून जवळपास ४०० ते ५०० कोटींची निर्यात होते.

या सगळ्या उदाहरणांचा अभ्यास केला तर आपल्याला पण असे असंख्य उद्योगाचे वेगवेगळ्या ठिकाणी छोटे पार्क करता येतील. तुम्ही आयटी पार्क, ई चौपाल ऐकले असेल पण तुम्ही अगदी बेकरी पार्क, फरसाण पार्क, मसाला पार्क, प्लास्टिक खेळणी पार्क कधी ऐकले नसेल व ते आता आपल्याला करावे लागेल व त्यातून असंख्य लोकांसाठी उपजीविका निर्माण होऊ शकतील. उपजीविका निर्माण करण्याची ताकद ही फक्त उद्योजकतेत आहे. त्यामुळेच नावीन्यपूर्ण उद्योगाचा पायंडा घालून 'उद्यमशीलतेची ऊर्मी' सर्वदूर पसरविता येऊ शकेल.

अशा यशस्वी उपक्रमांना इच्छुक उद्योजकांच्या भेटी आयोजित केल्यास स्वतः यशस्वी उद्योग बघणे व यशस्वी उद्योजकांबरोबर प्रत्यक्ष चर्चा करणे यामुळे चांगली प्रेरणा मिळू शकते.

शेतीवर आधारित असो किंवा बिगरशेती उद्योग असो, कोणताही नवीन उपक्रम हाती घेण्यापूर्वी बाजारपेठेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## बाजारपेठ म्हणजे काय?

व्यक्ती आणि संस्था पैशांच्या मोबदल्यात माल आणि सेवा पुरवितात. एखाद्याला टॉयलेट सोप घ्यायचा असल्यास तो किराणा मालाच्या दुकानात जातो. परंतु बॉयलर विकत घ्यायचा असल्यास त्याला बॉयलरचे उत्पादन करणाऱ्याकडे किंवा त्यासंबंधी व्यवहार करणाऱ्याकडे जावे लागते. पेट्रोल खरेदी करण्यासाठी तेल उत्पादकाकडे न जावे

लागता, बाजारपेठेत तेलाचे व्यवहार करणाऱ्याकडे न जावे लागता बाजारपेठेत तेलाचे व्यवहार करणाऱ्या एजंटाकडे जावे लागते. अशा तऱ्हेने बाजारपेठेचे विविध गुणधर्म आहेत.

## २) बाजारपेठेचे प्रकार कोणते?

बाजारपेठेचे स्थूलमानाने दोन विभागात वर्गीकरण करता येते.

१) कन्झ्युमर बाजारपेठ २) औद्योगिक बाजारपेठ




### १) कन्झ्युमर बाजारपेठ

कन्झ्युमर बाजारपेठेच्या बाबतीत ग्राहक वस्तूचा उपयोग करतो. उदाहरणार्थ इलेक्ट्रॉनिक बल्ब, स्टीलची भांडी, भेटवस्तू इ. वस्तू खरेदी वैयक्तिक उपयोगासाठी खरेदी केल्या जातात. या बाजारपेठेचे गुणधर्म पुढीलप्रमाणे आहेत.

अ) विकत घेतलेल्या वस्तूची किंमत कमी असते.

ब) संख्येच्या दृष्टीने विचार केल्यास ही बाजारपेठ मोठी आहे.

क) या बाजारपेठेत किंमत, दर्जा इत्यादीपेक्षा ब्रॅण्ड आणि ग्राहकांच्या भावनांना जास्त



महत्त्व असते. म्हणजे या बाजारपेठेत उपयुक्ततेच्या मूल्याचा विचार असतो.

### २) औद्योगिक बाजारपेठ

याउलट औद्योगिक बाजारपेठेत तयार मालाचे उत्पादन करण्याच्या हेतूने कच्चा माल आणि त्यासोबतची उत्पादनाला अंतिम स्वरूप देणारी आवश्यक सामुग्री विकत घेतात. औद्योगिक उत्पादनाचे मुख्य गुणधर्म पुढीलप्रमाणे आहेत.

१) वस्तूच्या किंमती खूप जास्त असतात.

२) संख्येच्या दृष्टीने विचार करता ही बाजारपेठ छोटी असते.

३) आकर्षक पॅकेजिंग वगैरेपेक्षा या बाजारपेठेत किंमत आणि दर्जाला जास्त महत्त्व आहे.

## बाजारपेठेची रचना

बाजारपेठ ही मूलतः ग्राहक आणि विक्रेता यांच्यामध्ये ज्या वस्तूसाठी व्यवहार होतो त्या उत्पादीत वस्तूंची बनलेली असते. कोणताही व्यवहार होण्यासाठी खरेदीचे निकष असले पाहिजेत. भोवतालच्या परिस्थितीचा बाजारपेठेवर परिणाम होत असतो.

### ग्राहक

व्यवहार झाल्यावर मालाचा ताबा घेणारी किंवा सुविधांचा लाभ घेणारी व्यक्ती म्हणजे ग्राहक. उदा. इमारत बांधणीसाठी ग्राहक विटा, सिमेंट, इलेक्ट्रिक सामान इत्यादी वस्तू खरेदी करतो. त्याचप्रमाणे गवंडी, सुतार इत्यादीच्या सेवाचाही लाभ घेतो.

### विक्रेता

जो ग्राहकांना माल किंवा सेवा पुरवितो त्याला विक्रेता म्हणतात. विक्रेता हा स्वतः उत्पादक असू शकतो किंवा उत्पादकाचा एजंट किंवा दोन्ही असू शकतो. अशा तऱ्हेने पुस्तक आणि मासिके थेट प्रकारकांकडून किंवा जवळच्या पुस्तकाच्या दुकानातूनही खरेदी करता येतात. विक्रेत्यांची निवड ही सर्वसाधारणपणे वस्तूंची किंमत, दर्जा, उपलब्धता पैसे देण्याची पद्धत, डिलीव्हरी डेट इत्यादी गोष्टींच्या आधारावर केली जाते.

**उत्पादित वस्तू (प्रॉडक्ट)**

फॅक्टरीतून बाहेर येणाऱ्या आणि पैशाच्या मोबदल्यात विकता येऊ शकणाऱ्या तयार मालाला उत्पादित वस्तू असे म्हणतात. उत्पादित वस्तूचे स्थूलमानाने एकदाच खरेदी केल्या जाणाऱ्या वस्तू, अधूनमधून खरेदी केल्या जाणाऱ्या वस्तू आणि वारंवार खरेदी केल्या जाणाऱ्या वस्तू असे वर्गीकरण करता येते. एकदाच खरेदी केल्या जाणाऱ्या वस्तूंसाठी अत्याधुनिक जिग वेअरिंग मशिन, पेपर प्लान्ट इत्यादीचे उदाहरण देता येते. अधूनमधून खरेदी कराव्या लागणाऱ्या वस्तूचे आयुष्य कमी असते. मोटारी, सर्वसाधारण उपयोगासाठी फाऊंड्रीमधील डाईज इत्यादी उदाहरणे आहेत. वारंवार खरेदी कराव्या लागणाऱ्या वस्तूमध्ये ग्राहकोपयोगी वस्तू तसेच फॅक्टरीमध्ये लागणारा कच्चामाल इत्यादीचा अंतर्भाव आहे.

बाजारपेठ पाहणीसाठी खालील पायऱ्या महत्त्वाच्या आहेत.

१) प्रश्नाचे स्वरूप स्पष्ट करणे.

२) अभ्यासाचा उद्देश काय आहे हे नक्की करणे.

३) पाहणीच्या प्रकाराची निवड करणे

४) नमुना यादी तयार करणे.

५) प्रश्नपत्रिका तयार करणे.

६) पाहणी तयार करण्यासाठी चमू तयार करणे व त्यांना पाहणीविषयी पूर्ण माहिती देणे.

७) काही बदल आवश्यक असेल तर तो करणे.

८) मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण व जुळणी करणे.

९) बाजारपेठ पाहणी अहवाल तयार करणे व त्यातून मिळालेले संशोधन स्पष्ट करणे.

## बाजारपेठ पाहणीसाठी प्रश्नावली

नवीन उद्योजकाने बाजारपेठेचा अंदाज घेण्यासाठी बाजारपेठ पाहणी करावी. पुढील



प्रश्न आणि माहितीच्या आधारे तयार बाजारपेठ पाहणी करणारे सुलभ होईल.

**कच्च्या मालांसाठी**

अ) कच्च्या मालाचे मुख्य उत्पादक आणि पुरवठादार कोण आहेत?

ब) मागणी केल्यानंतर किती दिवसांत कच्चा माल मिळतो. कच्चा माल घेताना कोणकोणत्या सवलती मिळतात?

क) कमीत कमी किती माल घ्यावा लागतो?

ड) हा कच्चा माल खुल्या बाजारात मिळतो का?

ई) वर्षातील ठराविक दिवसात कच्चा मालांचा नैसर्गिक तुटवडा वगैरे तयार केला जातो का?

फ) मागील दोन वर्षांत मालाच्या किंमती काय होत्या व कसा बदल होत गेला व होत आहे?

ज) शासनाचे एखादे धोरण किंमतीवर परिणाम करते का?

**यंत्र सामुग्रीविषयी**

अ) ही यंत्र पुरविणारे कोण आहेत? व त्यांचे पत्ते

ब) कोणत्या क्षमतेची, ठळक वैशिष्ट्ये असलेली यंत्रसामुग्री बाजारात उपलब्ध आहे?

क) यंत्रसामुग्रीची किंमत किती? (कर, वाहतूक, त्याबरोबर आणणे फायद्याचे आहे का)

ड) वीज, मोटार, स्टार्टर, स्विच इत्यादी काय काय आवश्यक आहे?

फ) दरवर्षी दुरुस्तीसाठी सर्वसाधारण किती खर्च येतो? कोणते सुटे भाग जास्त प्रमाणात व नेहमी लागतात?

ग) मशिन खरेदीसाठी रक्कम अगोदर भरावी लागते का? कळविल्यानंतर किती दिवसांत मशिन मिळते?

ह) मशिन कारखान्यातून पाठविण्यापूर्वी त्याची चाचणी घेतली जाते का?

ट) या मशिन उत्पादकाची बाजारात काय प्रतिमा आहे? आजपर्यंत किती ठिकाणी या मशिनरी दिलेल्या आहेत?

ज) वाहतुकीची खास काळजी किंवा हाताळण्यासाठी खास दक्षता घ्यावी लागते का? मशिन नाजूक आहे का दणकट?

ल) उत्पादनाचा जास्तीत जास्त चांगला दर्जा व किती प्रमाणात उत्पादन हे मशिन करते?

## बाजारपेठेविषयी :


**अ) उत्पादन करणारे स्पर्धक**

१) कारखान्याचा आकार व जागा किती वापरली आहे?

२) त्यांची उत्पादन क्षमता आणि विक्रीची किंमत?

३) कारखान्याची वाढ याविषयी भविष्यातील योजना काय आहेत?

४) त्यांच्या व्यवसायातील अटी






५) तांत्रिक कला, पैसा आदींविषयी ?

६) त्यांचे बाजारपेठेचे क्षेत्र आणि सराव?

७) काही खास प्रश्न त्यांना भेडसावतात का?

**ब) पुरवठा करणारे / साठा करणारे**

१) सध्या या विशिष्ट वस्तूचे कोण महत्त्वाचे पुरवठादार आहेत, त्यांची क्षमता व वाटा किती आहे?

२) त्यांचे बाजारपेठ क्षेत्र आणि वार्षिक उलाढाल किती?

३) कालावधी आणि प्रकार व मुख्य व्यक्ती बरोबर त्यांचे संबंध

४) त्याच्याबरोबर राहून मालाच्या विक्रीची शक्यता आणि त्याच्या अपेक्षा

५) तो किती माल ठेवू शकतो आणि साठा करण्यात त्याच्या काही अडचणी आहेत का?

६) तसेच भविष्यातील विचार, शक्यता वगैरे.

**क) ग्राहक**

१) सर्वसाधारण वार्षिक गरज किती आणि वापर किती?

२) सध्या कोठून विकत घेता?

३) तुम्ही कशाला महत्त्व देता, नाव, किंमत, दर्जा, व्यवहार इत्यादी.

४) सध्याच्या उत्पादन वस्तू व पुरवठ्याच्या बाबतीत तुम्ही समाधानी आहात काय?

५) खरेदीचा प्रकार लक्षात घेता त्या वस्तूचा वापर कसा होतो?

६) गरज लक्षात घेता त्या वस्तूचा वापर कसा होता?

७) यापुढे किती माल लागणार आहे वा अपेक्षित आहे? क्षमता, दर्जा, तंत्रज्ञानाच्या बदलामुळे काही अपेक्षा.


८) किती प्रमाणात माल खरेदी व कोणत्या वेळी व किती वेळा?

# शेतीमाल प्रक्रिया उद्योग- शाश्वत उपजीविकेकडे
## अर्थात
## अशाश्वततेतून समृद्धीकडे

### पार्श्वभूमी

शेती हा एक उद्योगच! ग्रामीण भागातील निम्याहून अधिक कुटुंबे शेतीवरच अवलंबून आहेत. त्यापैकी निम्याहून अधिकांची शेती कोरडवाहू स्वरूपाची-पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. काही अपवाद सोडले तर बहुतेकांची शेती करण्याची पद्धती पारंपरिकच असल्यामुळे शेतीचा रिझल्ट जेमतेमच. सारांश एकच, कुटुंबाचा जगण्याचा वार्षिक खर्च आणि शेतीतून येणारा वार्षिक नफा (खरे तर हे गणित अजून बहुतेक शेतकऱ्यांनी आयुष्यात एकाही वर्षी केलेच नाही) यात कायमच अंतर. परेशानी काही संपेना. कुणी गरजेच्या चार आणे कमी पडतोय, कुणी आठ आणे, कुणी त्याहून अधिक तर कुणी विदर्भात शेवटचं टोक गाठतोय याचच दुसरं नाव शेतकऱ्यांची उपजीविकेसाठी लढाई. शेतीत वापरण्याचं ज्ञान अपुरं, तंत्र जुनाट, छोटे क्षेत्र असल्याने मानवी श्रम जास्त, निसर्ग अवकृपा, अपुरं उत्पादन, बाजारभाव अनिश्चितता, नासाडी व साठवणुकीचा प्रश्न... असंख्य प्रश्नांची मालिका सुरूच. कसा भरून काढणार उद्दीष्टांचा गॅप? पूरक पर्यायांची जोड द्यावी लागणारच, तसेच संपूर्ण बोजादेखील त्यावर ढकलता येणार नाही. गॅप इतकीच अपेक्षा त्यात ठेवायची म्हणजे जमवायला सोपे जाऊ शकते. मुख्य कामाला धक्का न लावता पर्याय जोडावा लागेल. विविध पर्यायांपैकी एक भाग शेतीमाल प्रक्रिया. मूळचे कच्च्या स्वरूपाचे उत्पादन अंतिम वापरासाठी सोयीचे, सुटसुटीत, आकर्षक व हाताळण्यायोग्य स्वरूपामध्ये उपलब्ध करणे असा त्याचा ढोबळ अर्थ. हे करण्याचा एक प्रकारचा व्यवसायच केल्याने त्याचा लाभ म्हणून मिळवलेले पैसे हा त्यावरील हक्काचा नफा की जो आपल्याला परेशानीचे गणित जुळवायला मदत करेल.






फळे, भाजीपाला इत्यादींवर प्रक्रिया करण्याच्या उद्योगांचे व उत्पादनांचे स्वरूप स्थूलमानाने खालील पद्धतीने वर्णन करता येईल.

### फळे, भाजीपाला प्रक्रिया उद्योग - उत्पादने वर्गीकरण

| | |
|---|---|
| १) भौतिक स्थिती | अ) द्रवरूप (पातळ) उदा. रस, सरबत |
| | ब) चिकट (ओलसर) उदा. सॉस, जॅम, चटण्या |
| | क) कोरडे उदा. आमचूर, कॅण्डी. |
| २) निर्मिती दृष्टीकोन | अ) किचकट, रासायनिक अंतर्भाव, साठवणुकदृष्ट्या काळजीचे, विशिष्ट पॅकींग आवश्यक. |
| | ब) साधारण, रासायनिक अंतर्भाव नसणे, साठवणूक सोपी, सामान्य पॅकींग. |
| ३) गुंतवणूक दृष्टीकोन | अ) विशिष्ट यंत्रसामुग्री, मोठी गुंतवणूक |
| | ब) साधारण हत्यारे, मोजकी गुंतवणूक |

४) उत्पादने उपलब्धता दृष्टीकोन — अ) सर्वत्र उपलब्ध

ब) अद्याप दुर्मिळ

५) विक्री दृष्टीकोन — अ) विक्रीसाठी स्पर्धा, दरांची विशिष्ट पातळी

ब) स्पर्धामुक्त, दर स्वातंत्र्य

साधारणपणे कोणताही प्रक्रिया उद्योग स्थापन करताना खालील प्रमुख कामे करावी लागतात.

**प्रक्रिया उद्योग स्थापन करण्याची प्रमुख कामे**

**(एकदा करण्याची)**

♦ उत्पादन निवड

♦ आर्थिक उभारणी (स्वःगुंतवणूक / कर्ज प्रकरण)

♦ जागा, इमारत निवड / उभारणी

♦ यंत्रसामुग्री, हत्यारे जुळवणी

♦ इंधन - वीजपुरवठा जुळवणी

♦ मनुष्यबळ जुळवणी

♦ कामकाजाची रूपरेषा निश्चिती

**प्रक्रिया उद्योग चालविण्याची प्रमुख कामे (दैनंदिन)**

♦विविध खर्चांसाठी पैशाची उपलब्धता

♦योग्य दर्जा / संख्येने कच्चा माल शोध व खरेदी

♦ मनुष्यबळ उपलब्धता, देखरेख

♦यंत्रसामुग्रीपासून योग्य कामकाज

♦उत्पादन दर्जा, संख्या, वेळ मोजमाप

♦विक्रीदरासाठीचे अर्थशास्त्रीय गणित

♦विक्रीसाठीचे विविध प्रयत्न

♦विविध दैनंदिन अडचणींवर उपाय



**उत्पादन / अर्थशास्त्र आराखडा**

♦अपेक्षित वार्षिक नफा किती? रक्कम व टक्केवारी?

♦एकूण वार्षिक उत्पादन संख्या किती?

♦त्यासाठी काय काय व किती प्रमाणात कसे लागेल?

♦गुंतवणूक किती?

♦खेळता खर्च किती?

♦तितकी विक्री होण्यासाठी काय काय मार्ग वापरावे लागतील?

**कामकाजाच्या विविध पायऱ्या**

सर्वसाधारणपणे कार्यवाहीच्या खालील विविध पायऱ्या महत्त्वाच्या आहेत.

१) उत्पादनाची निवड

२) स्वयं पडताळणी

३) उत्पादन निर्मितीचे ज्ञान

४) आर्थिक नियोजन / कर्ज प्रकरण

५) अनुदान

६) शहरी ग्राहकवर्ग मानसिकता

७) मार्केटिंग

थोडक्यात शेतीमाल प्रक्रिया उद्योग शाश्वत उपजीविकेकडे जाण्याचा राजमार्ग आहे.

# उपजीविका कृती आराखडा
## अर्थात
## वाटचाल अंमलबजावणीकडे

**केंद्र** शासनाच्या पाणलोट विकास कार्यक्रम २००८ च्या सुधारित आवृत्ती २०११ च्या सामायिक सूचनेनुसार एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (आयडब्ल्यूएमपी) राबविला जात आहे. या सामूहिक सूचनांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या कार्यक्रमामध्ये एकूण मंजूर अंदाजपत्रकातील १९ टक्के रक्कम ही उपजीविका विकासासाठी वापरायची आहे. त्यापैकी १० टक्के रक्कम ही सूक्ष्म उद्योग व उत्पादनवर्धक उपक्रमांसाठी अनुदान स्वरूपात उपलब्ध आहे तर ९ टक्के रक्कम ही बचतगट व मत्ताहीन लाभधारकांसाठी सूक्ष्म उद्योग हाती घेण्यास फिरता निधी म्हणून उपलब्ध आहे. वरील ९ टक्क्यांचे विश्लेषण खालीलप्रमाणे -

३० टक्के रक्कम ही बचत गट व फेडरेशनसाठी अनुदान स्वरूपात मदत म्हणून वापरली जाईल व ७० टक्के ही रक्कम मत्ताहीन व बचत गटांसाठी फिरता निधी म्हणून वापरली जाईल. मत्ताहीनांसाठी जास्तीत जास्त ९ टक्क्यामधून १० टक्के रकमेची तरतूद यामध्ये आहे, उर्वरित रक्कम ही बचत गटासाठी वापरण्यात येऊ शकते.

पाणलोट क्षेत्रात विकसीत झालेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा अधिकाधिक उपयोग करून घेताना पाणलोट क्षेत्रात शाश्वत उपजीविका निर्माण करणे आणि आर्थिक उत्पन्न वाढविणे हे या घटकाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मालमत्ता निर्मितीसाठी केलेली गुंतवणूक, उत्पन्न व उत्पादकतेत झालेली वाढ, सामायिक साधन संपत्ती वापरण्याची गरिबांना मिळालेली संधी आणि कुटुंब स्तरावर उपजीविका उपलब्ध करून देण्यासाठीचे तंत्र कौशल्य याचा एकत्रित परिणाम म्हणून गरिबांना खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक उपजीविकेची साधने उपलब्ध होतील.

शासनाच्या एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाअंतर्गत दिलासा



जनविकास प्रतिष्ठान संस्थेने महाराष्ट्रातील ४ जिल्ह्यांतील प्रत्येकी एका समूहासाठी उपजीविका कृती आराखडा बनविण्याचे पथदर्शी काम हाती घेतलेले आहे. प्रथम दिलासा संस्थेद्वारे सर्व पाणलोट विकास पथक सदस्यांची एक दिवसीय कार्यशाळेद्वारे क्षमता बांधणी करण्यात आली. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील समूह (क्लस्टर) क्र.४ चा उपजीविका कृती आराखडा नमुन्यादाखल आपण बघूया. हा आराखडा तयार करण्याची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे आहे.

पाणलोट विकास पथकाद्वारे जी माहिती गोळा करण्यात आली होती त्याचे मूल्यांकन व विश्लेषण करून पुढची रूपरेषा ठरविण्यात आली. सहा गावांत हे काम करण्याचे नियोजन दिलासा संस्थेने केले. त्यानुसार सहाही गावांमध्ये तारखा ठरविण्यात आल्या व गावातील संबंधित मंडळींना त्या कळविण्यात आल्या. पाणलोट विकास पथकाच्या मदतीने गावातील अल्पभूधारक, मत्ताहीन लोक व बचत गट यांना वेगवेगळ्या वेळेत चर्चेला / सभेला येण्याबाबत निरोप देण्यात आले. त्यातील अल्पभूधारकांना, मत्ताहीन लोकांना, बचत गट सदस्यांना चर्चेसाठी नियोजित वेळेत आणि सोयिस्कर ठिकाणी बोलावण्यात आले. तसेच गावातील शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत व इतर कार्यालयांना भेट देऊन तेथून आवश्यक ती माहिती उपलब्ध केली गेली. आवश्यकतेनुसार अधिकच्या माहितीसाठी गावांना पुन्हा भेटी देण्यात आल्या.

आराखडा तयार करताना कौटुंबिक सर्वेक्षण, ग्रामीण सहभागीय मूल्यावलोकन (पीआरए), गटचर्चा, कुटुंबाचे आर्थिक वर्गीकरण इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला. कुटुंबाचे आर्थिक वर्गीकरण (Wealth Being Ranking (WBR)) क्षेत्राची आर्थिक परिस्थिती लक्षात ठेवून योग्य निकष लावण्यात आलेले आहेत. जमीन, जनावरे, उपजीविकेचे साधन, मूलभूत सेवापर्यंत पोहोचण्याचा मार्ग (ॲक्सेस), उत्पन-खर्चाची स्थिती, घराचा प्रकार इत्यादी निकषांच्या आधारावर गरीब, मध्यम व सुखवस्तू कुटुंबाची वर्गवारी प्रत्यक्षात ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यात आली. (सूचक WBR निकष-जोडपत्र-१) तसेच चर्चेतून परिसरातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीची व अस्तित्वात

असलेल्या उपजीविका साधनांची माहिती गोळा केली गेली. यातून गावात काय उद्योग चालू आहेत व कोणत्या उद्योगांची गरज आहे हे समजणे सोपे झाले. अशा रीतीने आराखडा बनविण्यासाठी आवश्यक व उर्वरित माहिती गोळा करण्यात आली.

चर्चेमध्ये गावातील सर्व समुदायांमधून प्रतिनिधित्व असावे याची खात्री करण्यात आली. त्यानुसार सर्वांना चर्चेत सहभागी करून घेण्यात आले. त्यामध्ये वेगवेगळया जाती-धर्माचे, गावात वेगवेगळ्या ठिकाणी राहणारे, असे सर्वच स्तरातील लोक आवर्जून या चर्चेमध्ये सहभागी करण्यात आले. सोबत सरपंच, पाणलोट समिताचे सभासद व पाणलोट विकास पथक हे या चर्चेमध्ये सहभागी असायचे. चर्चेतून उपजीविकाविषयक बरीचशी माहिती बाहेर आली. चर्चेदरम्यान आर्थिक वर्गीकरणावर विशेष भर दिला गेला. यातून योग्य लाभार्थी निवडीसाठी वाव मिळाला. त्यानुसार गावामध्ये उद्योग करण्यासाठी इच्छुक लाभधारकांची नावे व संबंधित आवश्यक उद्योग याची माहिती चर्चेतून बाहेर आली. निवडलेल्या उद्योगांची सविस्तर माहिती तक्त्यांद्वारे दर्शविण्यात आली आहे.

उपजीविका कृती आराखडा बनविण्यासाठी आवश्यक असलेली सगळी माहिती गोळा केल्यानंतर समोर आलेल्या उद्योगांना प्रत्यक्षात त्या भागात वाव आहे का? त्या उद्योगाला बाजारपेठ उपलब्ध आहे काय? उद्योग आर्थिकदृष्ट्या परवडणारा आहे काय? इच्छुक लाभधारक खरंच तो उद्योग करू शकेल काय? लाभधारकाला संबंधित उद्योगाचे थोडेतरी ज्ञान आहे काय? इत्यादी बाबींचा अभ्यास करण्यात आला. त्यानंतरच सुयोग्य लाभधारकांची नावे व त्यांचे संबंधित उद्योग उपजीविका कृती आराखड्यात समाविष्ट करण्यात आले. सदरील प्रस्तावित आराखड्यातील लाभधारक व त्यांनी निवडलेला उद्योग याची गावनिहाय यादी सामाजिक लेखाअहवालाचा एक भाग म्हणून संबंधित ग्रामपंचायतीच्या कार्यालयामध्ये लावण्यात आली. गावकऱ्यांना सूचना देण्यात आल्या की पंधरा दिवसांमध्ये काही त्रुटी आढळून आल्यास किंवा त्यामध्ये काही बदल सुचवायचे असल्यास ते सूचवू शकतात. अशा रीतीने गावकऱ्यांच्या सूचना आणि पाणलोट विकास पथकाची मदत घेऊन सविस्तर उपजीविका कृती आराखडा तयार करण्यात आला व तो कृषी विभागातील संबंधित



अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आला.

हा आराखडा तयार करताना केवळ गाव हा घटक विचारात न घेता समूह (क्लस्टर) हा घटक विचारार्थ घेतला गेला. एका समूहामध्ये एकापेक्षा जास्त गावे असू शकतात. जसे गेवराई तालुक्यातील समूह (क्लस्टर) क्र.४ मध्ये ६ गावे आहेत व एकूण पाणलोट क्षेत्र ३९०५ हेक्टर होते. हा आराखडा तयार करताना लाभधारकानुसार त्यांनी निवडलेले उद्योग व त्यासाठी लागणारे भांडवल तक्त्यामध्ये समाविष्ट केले जाते. तसेच त्या एकूण भांडवलापैकी एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (आयडब्ल्यूएमपी) अंतर्गत उपलब्ध निधी, स्वतःचे भांडवल, बँक कर्ज व शक्य तेथे काही योजनांशी सांगड याबाबतची माहिती या तक्त्यात समाविष्ट केली गेली. अशा रीतीने पूर्ण पाणलोट क्षेत्रातील लाभधारकांची माहिती असलेला तक्ता तयार केला गेला. यानंतर एकूण पाणलोट क्षेत्रातील पुढे आलेल्या उद्योगांचे, उद्योगनिहाय एकत्रित संकलन दुसऱ्या तक्त्यात केले गेले. उदा. एखाद्या मत्ताहीन कुटुंबातील लाभधारकाला बांगडी व्यवसाय सुरू करायचा असल्यास त्या उद्योगाला एकूण खर्च २० हजार रुपये येतो. त्यापैकी १० हजार रुपये एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातून (आयडब्ल्यूएमपी) फिरता निधी म्हणून मिळतील व उरलेले १० हजार रुपये तो स्वतः भरेल किंवा बचत गटाद्वारे कर्ज घेईल.

**जोडपत्र -१ : सूचक WBR निकष**

| अ. क्र. | निकष | वर्गीकरण | | |
|---|---|---|---|---|
| | | **गरीब** | **मध्यम** | **सुखवस्तू** |
| | **जमीन** | | | |
| 1. | वहितीयोग्य जमीन | 2 एकरपेक्षा कमी | 2-5 एकर | 5 एकरपेक्षा जास्त |
| 2 | सिंचनाची उपलब्धता | उपलब्ध नाही | काही प्रमाणात | मुबलक |
| | **पशुधन** | | | |
| 1 | एकूण जनावरे | 2 पेक्षा कमी | 2 ते 4 जनावरे | 4 पेक्षा जास्त |
| 2 | दुभती जनावरे | उपलब्ध नाही | 1 ते 2 जनावरे | 2 पेक्षा जास्त |

| अ. क्र. | निकष | वर्गीकरण | | |
|---|---|---|---|---|
| | | गरीब | मध्यम | उच्च मध्यम |
| | **उपजीविकेचे साधन** | | | |
| 1 | व्यवसाय | कुटुंबात कोणीही नाही | कुटुंबातील एक व्यक्ती | एकापेक्षा जास्त व्यक्ती |
| 2 | मजूर | शेतमजूर | कारखानी मजूर | मजूर नाही |
| 3 | कौशल्य | कौशल्य नाही | फक्त कौशल्य | कौशल्यपूर्वक कार्य |
| | **मूलभूत सेवा** | | | |
| 1 | शासकीय योजना | पोहोचण्याचा मार्ग नाही | मर्यादित | सुलभ पोहोचण्याचा मार्ग |
| 2 | आरोग्य | पोहोचण्याचा मार्ग नाही | मर्यादित | सुलभ पोहोचण्याचा मार्ग |
| 3 | स्वस्त धान्य | पोहोचण्याचा मार्ग नाही | मर्यादित | सुलभ पोहोचण्याचा मार्ग |
| 4 | कृषी सेवा | पोहोचण्याचा मार्ग नाही | मर्यादित | सुलभ पोहोचण्याचा मार्ग |
| 5 | पशुचिकित्सा सेवा | पोहोचण्याचा मार्ग नाही | मर्यादित | सुलभ पोहोचण्याचा मार्ग |
| | **निवारा** | कच्चा निवारा | कच्चा-पक्का | पक्का |
| | **इतर (स्पष्ट करावे)** | | | |

**टिप :** वरील निकष हे सुचनार्थ आहेत व परिस्थितीनुसार योग्य त्या ठिकाणी बदल करता येतो.

अशा रीतीने गेवराई तालुक्यातील समूह (क्लस्टर) क्र. ४ साठीचा सविस्तर उपजीविका कृती आराखडा तयार करण्यात आला. या आराखड्याचे संक्षिप्त विवरण पुढीलप्रमाणे तक्त्याद्वारे दर्शविण्यात आलेले आहे.

## प्रकल्प गोषवारा

**जिल्हा :** बीड | **तालुका :** गेवराई | **क्लस्टर क्र. :** ०४

**ग्रामपंचायतीची संख्या :** ०६ | **गावांची संख्या :** ०६

**गावांची नावे :** १. मादळमोही, २. मुलूकवाडी, ३.मानमोडी, ४.वंजारवाडी, ५.एकतूर, ६.कुंभारवाडी

**लोकसंख्या :** १२०५६ | **पुरुष :** ६१६९ | **महिला :** ५८८७ | **एकूण :** १२०५६

**कुटुंबांची संख्या :** २०३४ | **अनु.जाती :** १९७ | **अनु.जमाती :** **१३** | **इतर :** १८२४

**एकूण भौगोलिक क्षेत्र (हे) :** ४१४१.३७ | **पिकाखालील क्षेत्र (हे) :** **३७७३.०५**

**नांगरणीयोग्य पडीक जमीन (हे) :** १३.५६ | **कायमस्वरूपी पडीक जमीन :** ३३ | **कायमस्वरूपी गायरान :** ६.५

**उपचारासाठी प्रस्तावित क्षेत्र (हे) :** ३९०५.००



## एकूण प्रकल्प निधी

| अ. क्र. | उपक्रम / घटक | टक्केवारी | रक्कम (रु.लाखात) |
|---|---|---|---|
| 1. | मत्ताहीन लोकांसाठी उपजीविका कार्यक्रम | 9% | 41.98 |
| 2. | सूक्ष्म उद्योग आणि उत्पादन वृद्धी पद्धती | 10% | 46.65 |
| | **एकूण** | 19% | 88.63 |

## १) निवडलेले उपक्रम, लाभार्थी संख्या व अंदाजपत्रक (१० टक्के)

| अ. क्र. | उपक्रम | वर्गवारी | | एकूण संच | संच रक्कम (रु.) | एकूण रक्कम (रु.) | हिस्सेदारी (रु.) | | | | | डब्ल्यूडीएफ कडे जमा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खुला | अजा /अज | | | | प्रकल्प निधी रु.२४०००/- पर्यंत | लाभार्थींची जमा रक्कम (रु.) | बँक कर्ज | सांगड | एकूण | खुला | अजा /अज |
| १ | बैलगाडी | 10 | 0 | 10 | 30000 | 300000 | 150000 | 150000 | 0 | 0 | 300000 | 30000 | 0 |
| २ | दुग्ध (२ म्हशी) | 49 | 3 | 52 | 70000 | 3640000 | 1248000 | 358800 | 2033200 | 0 | 3640000 | 235200 | 7200 |
| ३ | दुग्ध (२ गाई) | 4 | 0 | 4 | 80000 | 320000 | 96000 | 33600 | 190400 | 0 | 320000 | 19200 | 0 |
| ४ | ठिबक सिंचन (१ एकर) | 100 | 17 | 17 | 41000 | 4797000 | 2398500 | 2398500 | 0 | 0 | 4797000 | 41000 | 34850 |
| ५ | शेळीपालन | 10 | 0 | 10 | 50000 | 500000 | 240000 | 39000 | 2210000 | 0 | 500000 | 48000 | 0 |
| ६ | लिंबू मशिन | 2 | 0 | 2 | 40000 | 80000 | 40000 | 40000 | 0 | 0 | 80000 | 8000 | 0 |
| ७ | गांडूळखत | 32 | 0 | 32 | 30000 | 960000 | 480000 | 480000 | 0 | 0 | 960000 | 96000 | 0 |
| | **एकूण** | **207** | **20** | **227** | | **10597000** | **4652500** | **3499900** | **2444600** | **0** | **10597000** | **846400** | **42050** |

## गावनिहाय खर्चाचा तक्ता

| अ.क्र. | गाव | तरतूद | आराखड्यानुसार खर्चाची आवश्यकता (रु.) | शिल्लक |
|---|---|---|---|---|
| 1 | मुकूलवाडी | 454700 | 454500 | 200 |
| 2 | मादळमोही | 2086700 | 2077500 | 9200 |
| 3 | मानमोडी | 241300 | 241000 | 300 |
| 4 | एकतूर | 244100 | 242500 | 1600 |
| 5 | कुंभारवाडी | 921400 | 921000 | 400 |
| 6 | वंजारवाडी | 716700 | 716000 | 700 |
| | **एकूण** | **4664900** | **4652500** | **12400** |

## एकूण गोषवारा (१० टक्के)

| खर्चाचा गोषवारा (१० टक्के) | रुपये |
|---|---|
| एकूण रक्कम | 10597000 |
| प्रकल्प हिस्सा | 4652500 |
| लाभार्थी हिस्सा | 3499900 |
| बँक कर्ज | 2444600 |
| शिल्लक रक्कम | 12400 |

शिल्लक रक्कम रु. 12400/ ही पाणलोट समितीच्या परवानगीने भविष्यात योग्य त्या उपक्रमासाठी वापरता येऊ शकते.

## २) निवडलेले उपक्रम, लाभार्थी संख्या व अंदाजपत्रक (९ टक्के)

| अ. क्र. | महिला बचत गटाचे (मबग) नाव | गाव | उपक्रम | संख्या | प्रति संख्या (रु.) | एकूण रक्कम (रु.) | हिस्सेदारी (रुपये) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | प्रकल्प (फिरता निधी रु.२५०००/- | बचत गटाचा हिस्सा (रु) | बँक कर्ज | प्रकल्पाशी सांगड |
| 1 | किर्ती मबग | कुंभारवाडी | पिठाची गिरणी | 1 | 25000 | 25000 | 25000 | | 0 | 0 |
| 2 | मोहटादेवी मबग | मादळमोही | मिरची कांडप | 1 | 60000 | 60000 | 25000 | 35000 | 0 | 0 |
| 3 | जयमल्हार मबग | मादळमोही | घोंगडी शिवणे | 1 | 40000 | 40000 | 25000 | 15000 | | 0 |
| 4 | गायत्री मबग | मादळमोही | पापड मशिन | 1 | 115000 | 115000 | 25000 | 90000 | 0 | 0 |
| 5 | साधना मबग | मादळमोही | पल्वरायझर | 1 | 35000 | 35000 | 25000 | 10000 | 0 | 0 |
| 6 | जिजामाता मबग | मादळमोही | पापड मशिन | 1 | 115000 | 115000 | 25000 | 90000 | 0 | 0 |
| 7 | अहिल्याबाई मबग | मादळमोही | कॅन्डी बनविणे | 1 | 20000 | 20000 | 20000 | 0 | 0 | 0 |
| 8 | सावतामाळी मबग | मादळमोही | दालमिल | 1 | 110000 | 110000 | 25000 | 85000 | 0 | 0 |
| 9 | विश्वकर्मा मबग | मादळमोही | कॅन्डी बनविणे | 1 | 20000 | 20000 | 20000 | 0 | 0 | 0 |
| 10 | आदर्श मबग | मादळमोही | अगरबत्ती | 1 | 20000 | 20000 | 20000 | 0 | 0 | 0 |
| 11 | खोलेश्वर मबग | मादळमोही | अगरबत्ती | 1 | 20000 | 20000 | 20000 | 0 | 0 | 0 |
| 12 | अहिल्यादेवी मबग | मादळमोही | कॅन्डी बनविणे | 1 | 20000 | 20000 | 20000 | 0 | 0 | 0 |
| 13 | राणी मबग | मादळमोही | बॅकयार्ड पोल्ट्री | 1 | 25000 | 25000 | 25000 | 0 | 0 | 0 |
| 14 | गोयरी मबग | मादळमोही | पिठाची गिरणी | 1 | 25000 | 25000 | 25000 | 0 | 0 | 0 |
| 15 | भूमिका मबग | मादळमोही | कृषी सेवा किट | 1 | 25000 | 25000 | 25000 | 0 | 0 | 0 |
| 16 | संतसखाराम मबग | मादळमोही | मजुर पुरविणारा | 1 | 25000 | 25000 | 25000 | 0 | 0 | 0 |
| 17 | नरेंद्र महाराजमबग | मादळमोही | कापूस मशिन | 1 | 120000 | 120000 | 25000 | 95000 | 0 | 0 |
| 18 | रमाबाई मबग | मादळमोही | ब्रूम बनविणे | 1 | 30000 | 30000 | 25000 | 5000 | 0 | 0 |



## प्रस्तावित बचत गट

| अ. क्र. | गाव | प्रति संच (रु.) | एकूण स्थापन केलेले बचत गट | एकूण अपेक्षित खर्च (रु.) | निधी उपलब्ध (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुकूलवाडी | 25000 | 10 | 250000 | 257815 |
| 2 | मादळमोही | 25000 | 5 | 125000 | 136817 |
| 3 | मानमोडी | 25000 | 5 | 125000 | 138405 |
| 4 | एकतूर | 25000 | 14 | 350000 | 356369 |
| 5 | कुंभारवाडी | 25000 | 18 | 450000 | 472434 |
| 6 | वंजारवाडी | 25000 | 31 | 775000 | 783159 |
| | **एकूण** | | **83** | **2075000** | **2144998** |

## गावनिहाय खर्चाचा गोषवारा (बचत गट - फिरता निधी)

| अ. क्र. | गाव | तरतूद | उपजीविका कृती आराखड्यानुसार | शिल्लक (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1 | मुकूलवाडी | 257815 | 250000 | 7815 |
| 2 | मादळमोही | 136817 | 125000 | 11817 |
| 3 | मानमोडी | 138405 | 125000 | 13405 |
| 4 | एकतूर | 406369 | 400000 | 6369 |
| 5 | कुंभारवाडी | 522434 | 500000 | 22434 |
| 6 | वंजारवाडी | 1183159 | 1175000 | 8159 |
| | **एकूण** | **2644998** | **2575000** | **69998** |

## मत्ताहीन कुटुंबासाठी (७० टक्के रकमेतून)

| अ. क्र. | उपक्रम | एकक | एकूण संख्या | प्रति संख्या (रु.) | एकूण रक्कम (रु.) | हिस्सेदारी (रुपये) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रकल्प (फिरता निधी रु.२५०००/- | लाभार्थी हिस्सा (रु.) | एकूण |
| 1 | शेळीपालन | 2 शेळया | 5 | 15000 | 7500 | 50000 | 25000 | 75000 |
| 2 | बांगडी व्यवसाय | संख्या | 1 | 20000 | 20000 | 10000 | 10000 | 20000 |
| 3 | ब्युटी पार्लर | संख्या | 1 | 15000 | 15000 | 10000 | 5000 | 15000 |
| 4 | कॉस्मेटिक दुकान | संख्या | 2 | 20000 | 40000 | 20000 | 20000 | 40000 |

| अ.क्र. | उपक्रम | एकक | एकूण संख्या | प्रति संख्या (रु.) | एकूण रक्कम (रु.) | हिस्सेदारी (रुपये) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रकल्प (फिरता निधी रु.२५०००/- | लाभार्थी हिस्सा (रु.) | एकूण (रु.) |
| 5 | पिठाची गिरणी | संख्या | 1 | 20000 | 20000 | 10000 | 10000 | 20000 |
| 6 | किराणा दुकान | संख्या | 1 | 15000 | 15000 | 10000 | 5000 | 15000 |
| 7 | शिवणकाम | संख्या | 8 | 15000 | 120000 | 80000 | 40000 | 120000 |
| 8 | इलेक्ट्रिशियन | संख्या | 1 | 15000 | 120000 | 10000 | 10000 | 15000 |
| 9 | फॅक्स मशिन | संख्या | 1 | 20000 | 20000 | 10000 | 10000 | 20000 |
| 10 | केश कर्तनालय | संख्या | 1 | 15000 | 15000 | 10000 | 5000 | 15000 |
| 11 | मालवाहतूक | संख्या | 1 | 35000 | 35000 | 10000 | 25000 | 35000 |
| 12 | वेल्डींग दुकान | संख्या | 1 | 15000 | 15000 | 10000 | 5000 | 15000 |
| 13 | बँड साहित्य | संख्या | 1 | 15000 | 15000 | 10000 | 5000 | 15000 |
| 14 | बार्बर दुकान | संख्या | 1 | 15000 | 15000 | 10000 | 5000 | 15000 |
| 15 | भांडी बनविणे | संख्या | 1 | 15000 | 15000 | 8000 | 7000 | 15000 |
| | **एकूण** | | **27** | | **450000** | **268000** | **182000** | **450000** |

## गावनिहाय निधीचा गोषवारा (स्वतंत्र लाभार्थी)

| अ.क्र. | गाव | तरतूद (रु.) | उपजीविका आराखड्यानुसार (रु.) | शिल्लक (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1 | मुकूलवाडी | 28646 | 28000 | 646 |
| 2 | मादळमोही | 131462 | 130000 | 1462 |
| 3 | वंजारवाडी | 45152 | 40000 | 5152 |
| 4 | एकतूर | 15378 | 10000 | 5378 |
| 5 | कुंभारवाडी | 58048 | 50000 | 8048 |
| 6 | मानमोडी | 15202 | 10000 | 5202 |
| | **एकूण** | **293889** | **268000** | **25889** |

## बचत गट / फेडरेशनसाठी (३० टक्के रक्कम) (अनुदानित मदत)

| अ.क्र. | महिला बचत गटाचे (मबग) नाव | गाव | उपक्रम | संख्या | प्रति संख्या रक्कम (रु.) | एकूण रक्कम (रु.) | एकूण निधीचा ताळेबंद | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | प्रकल्प (५० टक्के / रु.२०००००/- | बँक कर्ज (रु.) | प्रकल्पाशी सांगड |
| 1 | हरिओम मबग | मादळमोही | ॲग्रो सर्व्हिस सेंटर | 1 | 500000 | 500000 | 200000 | 130000 | 170000 |
| 2 | एकता मबग | मादळमोही | ॲग्रो मशिनरी दुकान | 1 | 600000 | 600000 | 200000 | 300000 | 100000 |
| 3 | वंदना मबग | मादळमोही | ट्रॅक्टर व साहित्य | 1 | 300000 | 300000 | 150000 | 100000 | 50000 |
| 4 | क्रिश्नाई मबग | एकतूर | थ्रेशर | 1 | 72000 | 72000 | 36000 | | 36000 |
| 5 | शिवशक्ती मबग | कुंभारवाडी | ॲग्रो सर्व्हिस सेंटर | 1 | 600000 | 600000 | 200000 | 340000 | 60000 |
| | **एकूण** | | | | | **2072000** | **786000** | **870000** | **416000** |



## गावनिहाय निधीचा गोषवारा बचत गट / फेडरेशनसाठी (अनुदानित मदत)

| अ.क्र. | गाव | तरतूद (रु.) | उपजीविका आराखड्यानुसार (रु.) | शिल्लक (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1 | मुकूलवाडी | 122769 | 0 | 122769 |
| 2 | मानमोडी | 65151 | 0 | 65151 |
| 3 | एकतूर | 65907 | 36000 | 29907 |
| 4 | वंजारवाडी | 193509 | 0 | 193509 |
| 5 | कुंभारवाडी | 248778 | 200000 | 48778 |
| 6 | मादळमोही | 563409 | 550000 | 13409 |
| | **एकूण** | **1259523** | **786000** | **473523** |

उपजीविका या विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन ग्रामीण भागातील विकासाच्या सर्व योजनांमध्ये उपजीविका साधनांची संधी व विकास हा घटक येणे आता अपरिहार्य बनले आहे. यादृष्टीने उपजीविका म्हणजे काय, उपजीविकेचे स्वरूप, व्याप्ती, संवर्धन आणि त्याची स्थानिक नैसर्गिक संसाधनांशी घातलेली सांगड यादृष्टीने हे पुस्तक अभ्यासक, प्रत्यक्ष काम करणारे कर्मचारी व तांत्रिक अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते यांना उपयुक्त ठरावे.

***